सोलापूर तरुण भारत

# आसमंत



लोकसभा निवडणुकीनंतर हवेत असलेली ठाकरे सेना, शरद राष्ट्रवादी आणि काँग्रेस पक्षांना महाराष्ट्राच्या जनतेनेच जमीनीवर आणण्याचे काम या विधानसभा निवडणुकीच्या निकालाच्या माध्यमातून केले आहे. महाविकास आघाडीच्या फेक नॅरेटिव्हला भाजपासह शिंदे व अजित पवार यांनी जशास तसे उत्तर दिले. २०१९ च्या निवडणुकीत मी पुन्हा येईन म्हणणारे देवेंद्र यावेळी महाविकास आघाडीला जबरदस्त दणका देत महाराष्ट्राचे चाणक्य ठरले आहेत. नाद करायचा पण देवेंद्र फडणवीसांचा कुठे? असाच संदेश विधानसभा या निकालाने दिला आहे.

## मी पुन्हा येईन!

## दणका देऊन आलोय!

**सत्ताकारण**

प्रशांत माने, मुख्य संपादक
भ्र. ९८८११९१४४३

गत २०१९च्या विधानसभा निवडणुकीत 'मी पुन्हा येईन' असा नारा देत देवेंद्र फडणवीस यांनी भाजपाचे १०५ आमदार विजयी करत युतीचे सरकार आणले देखील परंतु मुख्यमंत्रीपदाच्या लालसेने तत्कालीन शिवसेनेचे उध्दव ठाकरे यांनी जनतेचा युती सरकारचा कौल नाकारून काँग्रेस-राष्ट्रवादी बरोबर नवा घरोबा करत भाजपाला पाठ दाखवली. काँग्रेस आणि राष्ट्रवादीने देखील पक्ष जीवंत ठेवण्यासाठी उध्दव ठाकरे यांना घोड्यावर बसवत मुख्यमंत्री केले. अडीच वर्षाच्या सत्ता कालावधीत कोरोनासारखा जीवघेणे संकट जगासह महाराष्ट्रावर आले. या काळात ठाकरे यांनी घरातूनच सरकार चालवले. मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात ठाकरे अवघे काही दिवसच मंत्रालयात आले. शिवसेनेत होत असलेली घुसमठ सहन होत नसल्याने एकनाथ शिंदे यांनी ४० आमदारांसह सुरतमार्गे गुहाटी गाठली अन् ठाकरेंना जोर का झटका दिला. भाजपाने देखील शिंदेंच्या धाडसा इतकेच मोठे पद म्हणजे त्यांना मुख्यमंत्रीपद देवून महाराष्ट्रात पुन्हा सरकार स्थापन केले. एकनाथ शिंदे यांचे बंड यशस्वी झाल्याचे दिसताच पूर्वी बंड फसलेले अजित पवार देखील पुन्हा काका शरद पवारांना कात्रजचा घाट दाखवत भाजप व शिंदे सेनेच्या सरकारमध्ये सहभागी होत उपमुख्यमंत्रीपदावर विराजमान झाले. अजित पवारांच्या सोबत देखील खासदार व आमदार आल्याने आयोगाने त्यांना देखील राष्ट्रवादी पक्ष व घड्याळ चिन्ह बहाल केले. उध्दव ठाकरे आणि शरद पवार या दोन दिग्गजांना त्यांच्या जवळच्यांनीच दणका दिल्याने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली.

१०५ आमदार असतानाही सत्तेपासून बाजूला सारल्या गेलेल्या भाजपाने फडणवीसांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या साथीने सरकार तर स्थापन केलेच पण अडीच वर्षाच्या काळात केंद्रातील मोदी सरकारच्या सहकार्याने अन् अमित शहा यांच्या रणणितीखाली महाराष्ट्राला विकासाच्या वाटेवर गतीमान केले. महाराष्ट्रात विकासाच्या अनेक योजना राबविल्या. दरम्यानच्या काळात मे २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपा महायुतीला मोठा फटका बसला आणि महाविकास आघाडीला मोठे यश मिळाले. महाराष्ट्रातील लोकसभेच्या ४८ जागांपैकी ३० जागांवर महाविकास आघाडीला यश मिळाले. या यशाने हुरळलेल्या महाविकास आघाडीतील शरद राष्ट्रवादी व ठाकरे सेना आणि काँग्रेसला हे यश पचवता आले नसल्याचे विधानसभा निवडणुकीच्या निकालाने स्पष्ट केले आहे.

विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीने महाराष्ट्रातील महिलांसाठी मोठी योजना आणली. मध्य प्रदेशातील भाजप सरकारच्या 'लाडली बहन योजने'नंतर महाराष्ट्रातील महायुती सरकारनेही 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' सुरू केली आणि वेगाने रेटली. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १,५०० रुपये दिले जात आहेत. इतकेच काय तर ऐन दिवाळी सणापूर्वी महाराष्ट्रातील अडीच कोटी महिलांच्या बँक खात्यावर थेट रकमा जमा झाल्या. पाच महिने या योजनेचे पैसे महिलांना मिळाले. महिलांना साडेसात हजार आपल्या हक्काचे मिळाल्याचा आनंद लपून राहिला नाही. इतकेच काय तर विधानसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यात महायुतीने लाडक्या बहिणींना निवडणुकीनंतर दरमहा २१०० रुपये देण्याची घोषणा केली. महायुतीने अगोदर पाच महिने पैसे दिलेत आणि निवडणुनंतर दरमहा २१०० रुपये मिळणार या अपेक्षेने महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींनी कमालच केली. महाराष्ट्राच्या एकूण मतदार संख्येत निम्मी संख्या महिला मतदारांची आहे. तरी देखील महिला दुर्लक्षितच होत्या. परंतु महायुतीने महिलांना सन्मान मिळावा यासाठी लाडकी बहिण योजना आणली आणि ती यशस्वीरित्या राबविल्याने महिलांचा आत्मविश्वास वाढला. महिलांना स्वावलंबी होण्याची संधीच जणू महायुती सरकारने उपलब्ध केली. भाजपच्या दणदणीत विजयात या घटकाचाही मोठा वाटा असल्याचे मानले जात आहे. विरोधकांनी या योजनेला मोठा विरोध केला. काही दिवसांमध्येच महिलांना पैसे मिळणे बंद होईल, सरकारची ही महत्त्वाकांक्षी योजना बंद होईल, असे म्हणत एकीकडे त्यांनी अपप्रचार केला तर दुसरीकडे महाविकास आघाडीतील मोठ्या राजकीय पक्षांनी आपल्या प्रचारादरम्यान जाहिर केलेल्या जाहीरनाम्यामध्ये आपले सरकार सत्तेत आल्यास महिलांच्या खात्यात दरमहा तीन हजार रुपये जमा करण्याच्या घोषणा केल्या. ही बाबही चाणाक्ष नागरिकांच्या नजरेतून सुटली नाही. खेरीज महाविकास आघाडीचा भाग असलेली काँग्रेस, उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांनी महागाई, बेरोजगारी या मुद्द्यांवर राज्यातील महायुती सरकारला कोंडीत पकडण्याचा केलेला प्रयत्नही तोकडा पडला.

इतकेच काय तर महायुती सरकारने लाडक्या बहिणींप्रमाणे लाडका भाऊ यांनाही सन्मान देत त्यांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून दिला. शेतकऱ्यांसाठी देखील सन्मान योजना यशस्वीपणे राबवली. समाजातील प्रत्येक घटकाचे समाधान होईल यासाठी महायुती सरकारने प्रयत्न केले. महायुती सरकारच्या यशस्वी कारभारासह केद्रातील मोदी सरकारकडून सुरु असलेल्या देश विकासाच्या कार्याची पावती देत विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेने सर्व मतदानपूर्व आणि मतदानोत्तर चाचण्यांना तोंडघशी पाडत महायुतीला सत्तेत आणले. दोनशेहून अधिक जागा महायुतीच्या पारड्यात टाकून महाविकास आघाडीला आत्मपरीक्षणाचा सल्ला दिला. शरद पवार यांच्यासारख्या योद्ध्याला विधानसभेच्या निवडणुकीतील लढाईत आतापर्यंतच्या सर्वात वाईट पराभवाला सामोरे जावे लागले आहे. काँग्रेसला सत्ता गेल्यानंतरही शहाणपण येत नाही, हे या निवडणुकीच्या निकालाने पुन्हा दाखवून दिले आहे. गटबाजी, पाडापाडी, एखाद्या विजयाने येणारा उन्मत्तपणा, मित्रपक्षांवर कुरघोडी करण्याचे राजकारण हे कायम यश मिळवून देत नसते, याचा धडा आता तरी काँग्रेसने घ्यायला हवा. एखाद्या निवडणुकीत एक फेक नॅरेटिव्ह चालले, म्हणजे नंतरच्या निवडणुकीतही तेच चालत नसते. बहुसंख्य आमदार निवडून आणायचे; परंतु त्यांच्या भावना जाणून घ्यायच्या नाहीत, असे केले तर काय होते, हे आता काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार गटाच्या चांगलेच लक्षात आले असेल. अजित पवार काका शरद पवारांना सातत्याने सांगत होते की, आपले वय झाले असून आता राष्ट्रवादी पक्ष माझ्या ताब्यात द्या. पण शरद पवारांनी पुतण्याच्या मागण्याकडे दुर्लक्ष करत आपणच सूत्रधार ही भूमिका कायम ठेवली. अजित पवारांनी वारंवार शरद पवारांना निवृत्तीचा सल्ला दिला पण तो पवारांना मानला नाही. आता महाराष्ट्राच्या जनतेनेच जणू शरद पवारांना निवृत्त होण्याचे संकेत दिल्याचे जाणवत आहे. आता तरी शरद पवार काय भूमिका घेणार याकडेही महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणावर मजबूत पकड असलेले हुशार आणि अभ्यासू नेते देवेंद्र फडणवीस यांनी आपणच राजकारणातील चाणक्य असल्याचे विधानसभा निवडणुकीतील निकालाने दाखवून दिले आहे. महाराष्ट्राचा विकास करावयाचा असल्यास भाजपा महायुतीशिवाय पर्याय नसल्याचे दिसून आले आहे. महाराष्ट्रातील चाणाक्ष जनतेनेही जाती-पातीच्या राजकारणाला थारा न देता केंद्र व राज्यातील डबल इंजिनच्या सरकारलाच प्राधान्य दिलेले आहे. शरद पवार-उध्दव ठाकरे आणि थेट राहुल गांधी यांनाच मोठा दणका देत देवेंद्र फडणवीस पुन्हा महाराष्ट्राच्या सत्तेवर सन्मानाने आले अन् ते देखील विरोधकांना मोठा दणका देवून आलेले आहेत.

विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळवताना फडणवीस यांनी विरोधी महाविकास आघाडीला पुढील पाच वर्षे केवळ विरोधी पक्ष नेत्याचे काम तिघांना एकत्रित करावे लागेल असाच संदेश दिला आहे. सक्षम विरोधी पक्षनेतेपद मिळेल अशीही आमदारांची संख्या विरोधी पक्षाकडे नसल्याची शोकांतिका आहे. हे करत असताना फडणवीस यांनी मित्र पक्षांनाही मुख्यमंत्रीपदासाठी हट्ट चालणार नसल्याचा छुपा संदेश दिला आहे. नाद करायचा पण देवेंद्र फडणवीसांचा कुठे असाच संदेश विधानसभा निकालाच्या माध्मातून दिला आहे.





राष्ट्ररक्षा

ब्रि. हेमंत महाजन

भ्र. ९०९६७०१२५३

# नवीन प्रकारचा दहशतवाद

## बॉम्बच्या खोट्या धमक्यांचा भारतातील विमान प्रवासावर मोठा परिणाम

गेल्या आठवड्यामध्ये भारताला एका नवीन प्रकारच्या दहशतवादाला सामोरे जावे लागले. विमाने किंवा विमानतळावर बॉम्ब ठेवला असल्याच्या धमक्यांमुळे विमान कंपन्यांना पंधराशे ते दोन हजार कोटी एवढा अतिरिक्त खर्च करावा लागला. झालेले नुकसान सोशल मीडिया कंपनी आणि धमक्या देणाऱ्यांकडून वसूल केले पाहिजे. भारत हा जगातील सर्वाधिक वेगानं विस्तारणाऱ्या हवाई वाहतूक बाजारपेठांपैकी एक आहे. विमानात बॉम्ब असल्याच्या खोट्या धमक्यांद्वारे भारतातील विमान कंपन्यांना लक्ष्य करण्याच्या घटनांमध्ये अभूतपूर्व वाढ झाल्यामुळे विमान उड्डाणांना आणि व्यवसायाला प्रचंड फटका बसला आहे.

बॉम्ब अफवांच्या संख्येत गंभीर वाढ गेल्या आठवड्यात कॅनडातील इकॉलुएट या एअर इंडियाचे विमान उतरले होते. प्रवाशांना घेऊन मुंबईहून शिकागोला जाणाऱ्या बोईंग ७७७ विमानाला १५ ऑक्टोबरला बॉम्ब असण्याची धमकी मिळाल्यामुळे मार्ग बदलावा लागला होता. कित्येक तासांनंतर या खोळंबलेल्या प्रवाशांना शिकागोला नेलं; मात्र ही धमकी खोटी होती. भारतातील विमान कंपन्यांना लक्ष्य करत या महिन्यात आतापर्यंत अनेक खोट्या धमक्या देण्यात आल्या आहेत. गेल्या एका आठवड्यातच अशा किमान ९० धमक्या देण्यात आल्या होत्या. जून महिन्यात एकाच दिवशी ४१ विमानतळांना ई-मेलद्वारे विमानात किंवा विमानतळावर बॉम्ब ठेवण्यात आल्याच्या खोट्या धमक्या देण्यात आल्या. यामुळे विमानतळांवरील सुरक्षेत मोठी वाढ करण्यात आली. निम्म्या धमक्या दिल्ली आणि मुंबई या देशातील दोन सर्वांत मोठ्या विमानतळांच्या बाबतीत होत्या.

अलिकडच्या काळात भारतीय विमान कंपन्यांना लक्ष्य करून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमान उड्डाणांमध्ये व्यत्यय निर्माण करणाऱ्या या घटनांमुळे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे. गेल्या काही दिवसांत या धमक्यांना बळी पडलेल्या कोणत्याही मोठ्या विमान कंपनीने या विषयावर भाष्य केलेले नाही. हा सर्वांत जास्त सणासुदीचा गर्दीचा हंगाम आहे आणि त्यांना प्रवाशांमध्ये भीती निर्माण करायची नाही. एअरलाईन्सविरुद्ध हा एक प्रकारचा आर्थिक दहशतवाद आहे आणि त्यावर कठोर कारवाई केली गेली पाहिजे. खोट्या धमक्यांचा वाईट हेतू विमान कंपन्यांना लक्ष्य करण्यासाठी देण्यात येणाऱ्या बॉम्बच्या खोट्या धमक्यांचा संबंध अनेकदा वाईट हेतू, लक्ष वेधून घेणं, मानसिक आरोग्याच्या समस्या, व्यवसायात व्यत्यय आणण्याचा प्रयत्न किंवा खोडसाळपणा करणे इत्यादी बाबींशी आहे.

गेल्या वर्षी बिहारमधील एका विमानतळावर चेक-इनची प्रक्रिया चुकल्यानंतर निराश झालेल्या प्रवाशानं असाच खोडसाळपणा केला आणि स्पाईस जेटच्या विमानाला उड्डाणाला विलंब करण्यासाठी बॉम्ब असल्याची खोटी माहिती दिली. भारतातील हवाई सेवा क्षेत्रात प्रचंड विस्तार मागील काही वर्षांपासून भारतातील हवाई सेवा क्षेत्रात प्रचंड विस्तार होतो आहे. भारत ही जगातील सर्वाधिक वेगानं विस्तारणारी विमान वाहतूक बाजारपेठ आहे. नागरी उड्डाण मंत्रालयाच्या माहितीनुसार, गेल्या वर्षी भारतात देशांतर्गत विमान उड्डाणांमधून १५ कोटींहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला. देशातील ३३ आंतरराष्ट्रीय विमानतळांसह १५० हून अधिक कार्यरत विमानतळांवर भारतात दररोज ३,००० हून अधिक विमानं येतात आणि जातात.

गेल्या आठवड्यात बॉम्बसंदर्भातील अफवा शिगेला पोहोचल्या असताना १४ ऑक्टोबरला भारतातील विमान कंपन्यांनी ४,८४,२६३ प्रवाशांची वाहतूक केली. देशात एकाच दिवसात इतक्या प्रवाशांची वाहतूक करण्याचा हा एक विक्रम आहे. भारतात ७०० व्यावसायिक प्रवासी विमानं सेवेत आहेत. तर १,७०० हून अधिक विमानांच्या ऑर्डर प्रलंबित आहेत. भारत ही नक्कीच व्यावसायिक विमानांची सर्वात वेगानं विस्तारणारी बाजारपेठ होईल. मात्र अशा प्रकारच्या खोट्या बॉम्ब माहितीमुळे किंवा अफवांमुळे या क्षेत्राला फटका बसत आहे. विमान कंपन्यांना आलेल्या बॉम्बच्या धमक्यांमुळे प्रवाशांची गैरसोय होते. खोट्या धमकीचा काय परिणाम होतो? बॉम्ब असल्याची धमकी किंवा माहिती मिळाल्यानंतर जर विमान आकाशात असेल तर त्याला लगेचच जवळच्या विमानतळाकडे न्यावं लागतं. धोक्याची माहिती दिलेल्या विमानांना सुरक्षित ठिकाणी नेण्यासाठी लढाऊ विमानांचाही वापर करावा लागतो.

एकदा का विमान विमानतळावर उतरलं की, प्रवासी विमानातून उतरतात. त्यानंतर विमानातील सर्व सामान, माल आणि खाद्यपदार्थांची कसून तपासणी केली जाते. या प्रक्रियेसाठी कित्येक तास लागू शकतात. विमानातील पायलट असो किंवा इतर कर्मचारी असो त्यांच्या कामाचे तास ठरलेले असतात. त्या मर्यादेपेक्षा अधिक तास ते काम करू शकत नाही. परिणामी विमानातील सर्व कर्मचाऱ्यांच्या जागी दुसऱ्या कर्मचाऱ्यांची व्यवस्था करावी लागते. यातून विमानाच्या उड्डाणास आणखी विलंब होतो. या सर्व प्रक्रियेसाठी मोठा खर्च होतो आणि विमान वाहतुकीवर त्याचा नकारात्मक परिणाम होतो. नियोजित मार्गावरून इतरत्र वळवण्यात आलेल्या किंवा विलंब झालेल्या विमानामुळे, विमानतळावर उभे असलेल्या विमानामुळे, विमान कंपनी महसूल कमावत नसते, तर त्यांचा अतिरिक्त खर्च करते. त्यामुळे ते विमान उड्डाण कंपनीसाठी पैसे गमावणारं ठरतं. विमान उड्डाणास विलंब झाल्याने त्याचा वेळापत्रकावर मोठा परिणाम होतो.

धमक्यांसाठी सोशल मीडियाचा वापर सोशल मीडियावरील निनावी अकाऊंटवरून टाकण्यात येणाऱ्या बॉम्ब अफवांमध्ये नाट्यमयरीत्या वाढ झाल्यामुळे यासाठी जबाबदार असणाऱ्या गुन्हेगारांची ओळख पटवणं कठीण झालं आहे. या धमक्या एखाद्या व्यक्तीनं दिली आहे की संघटनेनं दिली आहे की कोणीतरी याची नक्कल करत आहे, याबद्दल स्पष्टता नाही. गेल्या आठवड्यात भारतीय अधिकाऱ्यांनी एका १७ वर्षांच्या शाळा सोडलेल्या मुलाला अटक केली होती.

सोशल मीडियावरील या पोस्ट कुठून टाकण्यात आल्या, याचा तपास करताना आयपी अॅड्रेस (IP addresses) चा शोध घेतला असता, काही पोस्टचा उगम लंडन आणि जर्मनीहून झाला आहे. बॉम्ब असल्याच्या अशा खोट्या धमक्यांमागे कोण आहे, याचा छडा लावणं हे एक मोठं आव्हान आहे. सरकारने सोशल मीडिया कंपन्यांना ताकीद दिली आहे की, अशा प्रकारचे पोस्ट किंवा मेसेजेस सोशल मीडियावर लगेच ब्लॉक झाले पाहिजे आणि अशा पोस्ट व्हायरल होऊ देऊ नये. कारवाई न केल्यास सरकार सोशल मीडियावर कारवाई करेल. विमानतळांच्या सुरक्षेला धोका पोहोचवणं किंवा विमानांच्या उड्डाणांमध्ये व्यत्यय आणणं या प्रकारच्या गुन्ह्यांसाठी भारतीय कायद्यात जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद आहे. एअरलाईन्स विविध कारणांमुळे तोट्यात हा लिहून पूर्ण होत असताना अजून एक बातमी आली की, आता काही मोठ्या शहरातील मोठ्या हॉटेल्सना धमकी मिळत आहे की, त्या हॉटेलमध्ये बॉम्ब ठेवण्यात आले आहे. म्हणजे आपण एका दहशतवादाच्या प्रकाराला सामोरे जात असताना, दुसरा दहशतवादाचा प्रकार पुढे येत आहे. म्हणून सरकारने आक्रमक कारवाई करून अशा सगळ्यांना लवकरात लवकर पकडून त्यांना अत्यंत कडक अशी शिक्षा द्यायलाच पाहिजे, नाहीतर अशा प्रकारच्या धमक्या आणि अफवा पसरविणे थांबणार नाही.

काही वर्षांपूर्वी प्रसिद्ध विनोदी यूट्यूबर जसपाल भट्टी यांचा SOS (Shortage of staff) नावाच्या एअरलाईन्सवर व्हिडिओ व्हायरल झाला होता. यामध्ये एअरलाईन्सचा एकच कर्मचारी (जसपाल भट्टी) सगळ्या प्रकारची कामे करताना दिसत होता. कारण जास्त कर्मचारी ठेवणे त्यांना परवडणारे नव्हते. आता नेमके तेच केले जात आहे. मागच्या आठवड्यामध्ये प्रयागराजवरून विमानाने पुण्याला येत असताना, प्रयागराज विमानतळावर दोन कर्मचारी सगळ्या प्रकारची कामे करत होते. कारण सध्या सगळ्या एअरलाईन्स विविध कारणांमुळे तोट्यात चालल्या आहेत.

फसव्या कॉलसाठी कठोर शिक्षा जरूरी एखाद्या खोट्या धमकीसाठी किंवा बॉम्ब असल्याचा फसव्या कॉलसाठी सरकार अशा गुन्हेगारांचा समावेश नोफ्लाय लिस्टमध्ये म्हणजे त्यांना विमान प्रवास करण्यास प्रतिबंध करण्याबरोबरच या गुन्ह्यांसाठी पाच वर्षांच्या तुरुंगवासाची तरतूद करणारे नवीन कायदे आणण्याचा विचार करत आहे. सरकारने अनेक अशा अफवा पसरवणाऱ्या व्यक्तींना अटक केली आहे. आशा करूया यामुळे अशा प्रकारच्या धमक्या देणे, अफवा पसरवणे आणि भारताचे नुकसान करणे थांबवले जाईल. रेल्वे रुळावर दगड ठेवणे, सिमेंटचे पेव्हर ब्लॉक ठेवणे किंवा लाकडाचे मोठे स्लीपर ठेवणे हासुद्धा घातपाताचा दहशतवाद आहे. यावरसुद्धा आपण लक्ष ठेवायला पाहिजे आणि दोषींना शिक्षा द्यायला पाहिजे. (लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)





संत प्रबोधन

प्रा. डॉ. हरिदास आखरे

# संतांचा भक्ती प्रेम विचार

परमेश्वराविषयी असलेला नितांत आदर व प्रेम, त्याच्या सहवासातून फुललेला आनंदरंग हा भक्तीतून प्रकट होताना दिसतो. संतांचा भक्ती प्रेम विचार म्हणजे आनंदाचा सोहळा. प्राणसखा पांडुरंग, परमप्रिय श्रीकृष्ण, मर्यादापुरुषोत्तम श्रीरामाला आळवताना त्यांचे भक्त एकरूप झालेले दिसतात. 'तुज मज नाही भेद' अशी अवस्था त्यांची झालेली असते. ही अवस्था म्हणजेच त्या साक्षात भगवंताविषयीची भक्ती प्रेमाची भावना होय.



भक्ती प्रेम म्हणजे काय? जगातील सर्वांच्या ठायी चैतन्यरूपाने ओतप्रोत भरलेल्या परमेश्वराच्या चरणी नितांत असणारी प्रेमभावना म्हणजे भक्ती प्रेम होय. भक्ती प्रेमासारखे दुसरे सुख कशातच नाही. परमेश्वराबद्दल असणारी प्रेमभावना शब्दातीत आहे. ती शब्दांमध्ये व्यक्त करता येत नाही. एखाद्या मुक्या माणसाने ज्याप्रमाणे साखर खावी; त्याचे वर्णन तो जसा करू शकत नाही, परंतु त्याचा आनंद त्याच्या मनातच अवर्णनीय असतो. भक्ती ही शांतिमय असून परम आनंद देणारी आहे. भक्ती प्रेम भावनेने भगवंताची साधना केली तर तो भक्ताला भेटतो. भक्ती प्रेम कसे आहे? तर, संत तुकाराम सांगतात.

**भक्तीप्रेम नेणवे आणिकां।**
**पंडित वाचकां ज्ञानियांसी।।**
**आत्मनिष्ठ जरी जाले जीवन्मुक्त।**
**तरी भक्ती सुख दुर्लभ त्यां।।**
**तुका म्हणे कृपा करिल नारायण।**
**तरि च हें वर्म पडे ठायीं।।** (तु. गा. ३०३९) भक्ती प्रेमाचा आनंद अवर्णनीय असून त्यामध्ये असणारे जे सुख आहे, ते शब्दातीत आहे. भगवंताच्या भक्ती प्रेमाला कशाचीही उपमा देता येत नाही. ते अनुपम आहे. त्याचा ज्याला अनुभव येईल तो धन्य धन्य होईल. भक्ती प्रेम ही एक अनुभूती आहे. ईश्वराला प्राप्त करण्यासाठी ती एक साधना असून ती भावना निर्माण झालेल्या मनामध्ये पवित्र संस्काराचे रोपण होत असते. संत तुकारामांनी भक्तीचा अवर्णनीय असा आनंद व्यक्त केला आहे-

**गोड लागे परी सांगताचि न ये। बैसे मिठी सये आवडीची।। वेधले वो येणे श्रीरंगे। मी माझी अंगे हारपली।। परते चि ना दृष्टी बैसली ते ठायी। विसावोनि पायी ठेले मन।। तुक्याच्या स्वामीसवे जाली भेटीड। तेव्हा जाली तुटी मागिल्यांची।।** (तु. गा. ३९८) सर्वव्यापक ईश्वराविषयी असणारी प्रेमभावना म्हणजे भक्ती प्रेम होय. ईश्वर साक्षात्काराच्या उद्देशाने ही क्रिया केली जाते. संत तुकारामांनी केलेल्या भक्तीच्या विविध व्याख्या अशा **भक्ती ते नमावे जीव जंतु भूत। शांतवूनि ऊत कामक्रोध।।** (तु. गा. २६५६) भक्ती ते नमन ।। (तु. गा. ३८५०) विनम्रता म्हणजे भक्ती, अशी साधी-सोपी व्याख्या संत तुकाराम करतात.

**हेचि थोर भक्ती आवडती देवा। संकल्पावी माया संसाराची ।।** (तु. गा. ३३३५) संसारावरील आसक्ती टाकणे म्हणजेच भक्ती, ही भक्तीची दुसरी व्याख्या संत तुकारामांनी केली आहे. नारद भक्तिसूत्रात आलेल्या भक्तीच्या व्याख्या अशा **पूजादिवनुराग ईति पराशर्या:।। पाराशर ऋषींचे पुत्र श्री व्यासमहर्षी यांच्या मते परमेश्वराच्या पूजेमध्ये प्रेम असणे म्हणजे भक्ती. कथादिष्विति गर्ग:।।** श्री गर्गाचार्यांच्या मतानुसार, भगवंताच्या कथा, गोष्टी, पराक्रम याविषयी प्रेम असणे म्हणजे भक्ती. आत्म**रत्याविरोधेनेति शांण्डिल्य।।** (शाण्डिल्य ऋषी) आत्मप्रेमाविषयी अनुकूल असणाऱ्या विषयात प्रेम असणे ही भक्ती होय. **नारदश्तु तदर्पिताखिलाचारता तद्विस्मरणे परम व्याकुलतेति।।** सर्व कर्मे ईश्वरार्पण करणे आणि परमेश्वराचे थोडेही विस्मरण झाले असता अत्यंत व्याकूळ होणे म्हणजे भक्ती.

**द्रुतस्य भगवद्धर्माद् धारावाहिकतां गता । सर्वेशे म नसो वृत्तिः भक्तिरित्यभिधीयते ।। (ज्ञानेश्वरी प्रस्तावना-भक्तिरसायनकार) सर्वेंद्रियांच्या मनोवृत्ती अत्यंत चढत्या-वाढत्या प्रेमाने ईश्वराकडे धावणे म्हणजे भक्ती. सात्वस्मिन् परमप्रेमरुपा।।** -(देवर्षी नारद) भक्ती म्हणजे परम्यात्म्याच्या ठिकाणी नितांत प्रेम **सा परानुरक्तिरीश्वरे।।** ईश्वराच्या ठिकाणी नीरतिशय प्रेम असणे यालाच भक्ती म्हणतात.

**ता ऐष्वर्याणां काश्यपः परतत्वात ।। (कश्यपमुनी) सर्वसमर्थ परम्यात्म्याच्या षडैश्वर्याचे ध्यान करणे, नामसंकीर्तन करणे, हेच भक्ती लक्षण आहे. आत्मैकपरा बादरायणः ।। (बादरायण व्यास) आपल्या आत्मचैतन्याचे अखंड स्मरण असणे, हेच उत्तम भक्ती लक्षण आहे. उभयं परां शाण्डिल्य:।।** (शाण्डिल्य) आत्मतत्त्व व ईश, सामर्थ्य-ऐश्वर्य या दोहोचे ध्यान, पूजन, अनुसंधान असणे हेच श्रेष्ठ भक्ती लक्षण आहे.

**मोक्षकारण सामग्-यां भक्तिरेव गरीयसी । स्वस्वरूपानुसंधान भक्तिरित्यभिधियते।।** (विवेकचुडामणी) मोक्षसाधनात भक्ती हेच श्रेष्ठ साधन आहे व स्वस्वररूपानुसंधान म्हणजेच भक्ती होय, अशी भक्तीची व्याख्या शंकराचार्य करतात.

**परि तेचि भक्ति ऐसी। पर्जन्याची सुटिका जैसी।। धरावाचुनी अनारिसी। गतीचि नेणे।। तैसे सर्वभावसंभारे । न धरत प्रेम एकसरे। मजमाजी संचरे। मीचि होऊनि।।** (ज्ञाने. ११/६८६, ८८) पावसाच्या धारेला पृथ्वीवर येण्याशिवाय दुसरी गतीच नाही. त्याचप्रमाणे सर्वभावपूर्णरीतीने मी होऊन माझ्यात एकरूप होणे म्हणजे भक्ती. ज्ञानेश्वर महाराजांप्रमाणे एकनाथ महाराजसुद्धा भक्तीची व्याख्या करतात.

**काया वाचा मनसा। माझे भक्तीचा पडिला ठसा। भजता नाठवे दिवस निशा। भक्तीची दशा या नावे।।** (ए. भा. ११/१११०) **काया, वाचा, मने, रात्रंदिवस प्रेमयुक्त अंतः करणाने हरिचरणी अखंड निष्ठा म्हणजे भक्ती. एरव्ही तिजी ना चौथी। हे पहिली ना सरती । पै माझिये सहजस्थिती। भक्ति नाव।।** (ज्ञाने. १८/१११३) परमेश्वराच्या सहजरूप स्थितीला भक्ती हे नाव आहे. **उत्तममध्यमाधमा भूती। भगवद्भावअहोराती या नावे मुख्य भगवद्भक्ती। स्वप्न सुषुप्तीं भगवंत ।।** (भावार्थ रामायण, अ. २४, युद्धकांड ) भक्ती प्रेम हा अलौकिक विचार संतांनी समाजाला दिलेला आहे.

भक्ती प्रेमामध्ये जे सुख आहे ते अनन्य कुठेही पाहायला मिळत नाही. साक्षात भगवंताविषयी प्रीती, लडिवाळपणा आणि त्याच्या सहवासातून फुललेला हा भक्तिरंग अवघ्या महाराष्ट्राला, अवघ्या जगाला एक आनंदाची, समाधानाची शिकवण देत असतो. भक्तीत तल्लीन झालेले संत नामदेव, संत गोरा कुंभार, भक्तीत तल्लीन झालेली संत मीराबाई, जनाबाई, भक्त प्रल्हाद ही सर्व उदाहरणे त्यांच्या जीवनामध्ये भक्तीच्या अतिउच्च शिखरावर पोहोचलेले पाहायला मिळतात.

सिनेजगत

देवेंद्र प्रभुणे

# हिंदी चित्रपटातील वार्ताहर

## 'ये खबर छपवा दो अखबार में...!'

आधुनिक लोकशाहीत वृत्तपत्रांना 'चौथा स्तंभ' असे संबोधले जाते. भारतात पूर्वापार वृत्तपत्रांना शिक्षित वर्गात आदराचे व जिव्हाळ्याचे स्थान आहे. जरी वृत्तपत्रांचा मूळ उद्देश वार्ता-प्रेषण करण्याचा असला, तरीही समाजाच्या सुशिक्षित वर्गात विचारधारा व विशिष्ट दृष्टिकोन रुजवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य वृत्तपत्रांनी सातत्याने व निष्ठेने, असिधाराव्रत समजून केले आहे. चित्रपट ही खऱ्या अर्थाने आधुनिक लोककला आहे. चित्रपटाचा आस्वाद घेण्यासाठी शिक्षित असण्याची पूर्वअट नाही. तसेच चित्रपट हे दीर्घावधीचे कला-माध्यम आहे. चित्रपटाचे परिष्करण वर्षानुवर्षे करता येऊ शकते. कारण त्याच्या प्रती हव्या त्या वेळेस उपलब्ध होऊ शकतात.

चित्रपट ही खऱ्या अर्थाने २० व्या शतकात विकसित झालेली लोककला असून त्यात कला व शास्त्र यांचा मनोहारी मिलाफ घडून आलेला असतो. भारतीय समाजात, विशेषत: सुशिक्षित व उच्चभ्रू वर्गात चित्रपटांना फारसे महत्त्व न देण्याची वृत्ती आढळून येते. तरीही चित्रपट व वृत्तपत्रे यांचे अतूट साहचर्य भारतीय समाजात सदैव अस्तित्वात होते व आहे. स्वातंत्र्यपूर्व कालावधीत वृत्तपत्रांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात मोलाची कामगिरी बजावली होती. स्वातंत्र्यलढ्यास अभिप्रेत असलेली विचारसरणी व मनोवृत्ती तयार करण्याचे महत्कार्य वृत्तपत्रांनी केले, यात शंका नाही. पत्रकारिता हे व्रत आहे व त्याचे पावित्र्य प्राणपणाने जपले पाहिजे, अशी विचारधारणा असलेले थोर संपादक व पत्रकार आपण प्रत्यही पाहिले आहेत. निर्भीडता व निष्पक्षता अंतर्निहित असलेली पत्रकारिता समाजात जागल्याची भूमिका निभवत असते. हिंदी चित्रपटांमध्येही याचे प्रतिबिंब सातत्याने उमटलेले आहे.



१९५० च्या दशकापर्यंत तरी वृत्तपत्रात छापून आलेल्या बातमीस प्रमाण मानण्याकडे समाजाचा कल होता. अर्थात, सामाजिक व वैचारिक पत्रकारितेचा तो सुवर्णकाळ होता. वृत्तपत्रांना एकाच वेळी प्रचंड आदर व भीती या दोन्ही भावना अनुभवता यायच्या. स्वातंत्र्योत्तर काळात बदलत्या सामाजिक परिस्थितीस अनुसरून पत्रकारांना केंद्रिभूत ठेवून बनलेला पहिला लक्षणीय चित्रपट होता, 'फूटपाथ' (१९५३) हा झिया सरहदी दिग्दर्शित चित्रपट. यात ध्येयनिष्ठ पत्रकाराचा होणारा नैतिक अध:पात व त्याचे तद्दन धंदेवाईक व्यापाऱ्यामध्ये होणारे रूपांतर दिलीपकुमार यांनी कमालीच्या सहजतेने रंगवले होते. चित्रपटाच्या शेवटी परत ध्येयनिष्ठतेची कास अंगीकारणारा 'नोशू शर्मा' पत्रकारितेच्या उदात्त विचारसरणीस अधोरेखित करतो. १९५० चे दशक विशिष्ट प्रतिमा पडद्यावर गडद करणाऱ्या महानायकांचे होते. त्यामुळे चित्रपटांमध्ये पत्रकार हे पात्र फारसे महत्त्वपूर्ण नसायचे. प्रसंगी राज कपूर यांनी 'चोरी चोरी' (१९५६) व देव आनंद यांनी 'सोलहवा साल' (१९५८) या चित्रपटात एकट्या तरुणीस मदत करणाऱ्या वार्ताहरांची भूमिका केली होती. परंतु हे दोन्ही चित्रपट ज्या अमेरिकन चित्रपटांवर आधारित होते त्या 'इट हॅपन्ड वन नाईट' व 'रोमन हॉलिडे' यातील नायक हा वार्ताहर असतो. म्हणूनच भारतीय चित्रपटांमधील नायक हे वार्ताहर दाखवले आहे. अर्थात चित्रपटांमध्ये ते वृत्रपत्रांसाठी काही काम करताना आढळत नाहीत, हे ओघाने आलेच. १९५६ च्या 'सीआयडी' या गुन्हेगारी वळणाच्या चित्रपटाची सुरुवात एका वृत्तपत्राच्या संपादकाच्या घडवून आणलेल्या हत्येने होते. १९५० ते १९७० या दशकात निर्भीड पत्रकारांनी पर्दाफाश केलेले सभ्रांत गुन्हेगार हा एक लोकप्रिय साचा होता. 'काला पानी' (१९५८) या चित्रपटात देव आनंद यांनी खोट्या गुन्ह्याखाली तुरुंगात असलेल्या आपल्या पित्याचे निर्दोषत्व सिद्ध करण्यासाठी मोहीम काढलेल्या वृत्तपत्र वार्ताहराची भूमिका समरसून वठवली होती. तर 'नया दौर' (१९५७) चित्रपटात जॉनी वॉकर यांनी मुंबईहून खेड्यात वार्ताकनासाठी आलेल्या छायाचित्रकार व वार्ताहराची विनोदी भूमिका गाजवली होती. भारतात १९७० च्या दशकात प्रादेशिक भाषेतील वृत्तपत्रे हळूहळू शक्तिशाली बनू लागली होती. त्याबरोबर गावोगावी स्थानिक चटपटीत बातम्या असलेली सायंदैनिकेदेखील लोकप्रिय होती. या सायंदैनिक संदर्भात 'दूरियाँ' (१९७९) चित्रपटात एक विनोदी गीत 'इव्हिनिंग न्यूज' चित्रित झाले होते. वसंत कानेटकर यांच्या लोकप्रिय 'अश्रूंची झाले फुले' नाटकावर आधारित 'मशाल' (१९८४) चित्रपटात, दिलीपकुमार यांनी करारी वृत्तपत्र संपादकाची भूमिका केली होती. परिवर्तन झालेल्या गुंडांच्या भूमिकेत त्यावेळेस नवोदित असलेल्या अनिल कपूरने कमाल केली होती. वार्ताहराच्या भूमिकेतील त्याचा चपखल वावर दाद देण्याजोगाच. 'जाने भी दो यारो' (१९८३) या अंतर्मुख करणाऱ्या राजकीय व्यंग्य चित्रपटात वृत्तपत्रे, राजकारणी व प्रशासन यांचे अंत:स्थ लागेबांधे बोचऱ्या शैलीत उलगडले होते. या चित्रपटात भक्ती बर्वे इनामदार यांनी साकारलेली दै. खबरदारची संपादक शोभा सेन एकदम नमुनेदार..! पण, पत्रकारितेवर बनलेला अतिशय वास्तव व दर्जेदार चित्रपट म्हणजे, गुलजार लिखित व रमेश शर्मा दिग्दर्शित 'न्यू दिल्ली टाईम्स' (१९८६) हा चित्रपट. एका ध्येयनिष्ठ व कुशल पत्रकार-संपादकाने उघडकीला आणलेला भ्रष्टाचार हा विषय असलेला चित्रपट सामाजिक मूल्ये व राजकारणातील दडपशाहीचा खोलवर वेध घेतो. शशी कपूरने अभिनित केलेली विकास पांडे ही संपादकाची भूमिका चिरस्मरणीय. १९८५ साली, विजय तेंडुलकर यांच्या 'कमला' या नाटकावर आधारित त्याच नावाचा हिंदी चित्रपट, जगमोहन मुंदडा यांनी दिग्दर्शित केला होता. एक पत्रकार स्वत:चा उत्कर्ष साधण्यासाठी मध्यप्रदेशमधून एक आदिवासी तरुणी अक्षरश: विकत घेतो, या कथानकावर आधारलेला हा चित्रपट, पत्रकारांच्या मनोवृत्तीचा वेगळ्या अंगाने वेध घेतो. 'मीट जॉन डो' (१९४१) या हॉलिवूडपटावर बेतलेला अतिशय टोकदार व विचार प्रवृत्त करणारा 'मै आझाद हूँ' (१९८९) हा चित्रपट दुर्दैवाने फारसा चर्चेत आला नाही. पण खप वाढवण्यासाठी वृत्तपत्राच्या मालकाने गाठलेले टोक व त्यास साथ देणारी महत्त्वाकांक्षी वार्ताहर हा विषय या चित्रपटात अतिशय चांगल्या पद्धतीने प्रस्तुत केला होता. परिस्थितीने सद्सद्विवेक बुद्धी जागृत झालेला आझाद अमिताभ बच्चन यांनी ताकदीने रंगवला होता. १९८७ च्या 'मिस्टर इंडिया' चित्रपटात अन्नू कपूरने रंगवलेला 'श्री. गायतोंडे' हा संपादक फारच अफलातून होता. 'क्राईम्स ऑफ इंडिया' हे वृत्तपत्राचे नाव सदैव लक्षात राहील. नव्या मनूच्या नवीन चित्रपटांचा ओनामा नव्या सहस्रकात झाला. वृत्तसंकलन, प्रसारण व माध्यमे आमूलाग्र बदलली. नवीन माध्यमे नव्या संधी व नवीन आव्हाने घेऊन आली. दूरचित्रवाणीने हळूहळू सर्वात सशक्त माध्यम म्हणून जनमानस काबीज केले. ध्येयनिष्ठा, विशिष्ट विचारधारा व मतप्रणालीचा पुरस्कार करणारे एकांडे शिलेदार लुप्तप्राय झाले. या वेळेस, स्त्रियांचा वाढता सहभाग नवीन आयाम प्रदान करते जाहले. वृत्तपत्रे व्यावसायिक पद्धतीने, नफाकेंद्रित व्यवसाय प्रारूपास प्रधान ठेवून कार्यरत झाल्या.

(पान ६ वर)

## यशासाठी

डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

# सर सलामत तो पगडी पचास!



**१.** १६५९ साली आजच्याच दिवशी म्हणजे १० नोव्हेंबर रोजी शिवाजी महाराजांनी अफजल खानाला यमसदनास पाठवले. लगेच १८ दिवसांनी पन्हाळा काबीज केला. राजांना नियंत्रित करण्यासाठी औरंगजेबाने पाठवलेला शास्ताखान जवळपास साडेतीन वर्षांपासून पुण्यातून हलत नव्हता. म्हणून शिवाजी महाराजांनी शास्ताखानावर सर्जिकल स्ट्राईक करून त्याची बोटे कापली. 'सर सलामत तो पगडी पचास!' असा विचार करून शास्ताखान पळून दिल्लीला वापस गेला.

जुन्या अनुभवातून शिकून औरंगजेबाने अनुभवी व श्रेष्ठ असे हिंदू सरदार मिर्झाराजे जयसिंग यांना दिलेरखानासोबत प्रचंड सेना देऊन शिवाजी महाराजांवर आक्रमण करण्यास पाठवले. पुरंधरगडाला शत्रूने वेढा घातला. राजे त्यावेळी रायगडावर होते. लागोपाठ चार महिने शत्रूने नासधूस व स्वराज्याच्या प्रजेवर अत्याचार चालू ठेवले. रयतेची व स्वराज्याची होणारी परवड पाहून 'बचेंगे तो और भी लडेंगे' असा विचार करून शिवाजी महाराजांनी मिर्झाराजे जयसिंग यांच्याशी ११ जून १६६५ रोजी तह केला व स्वराज्यातील अनेक किल्ले शत्रूच्या सुपूर्द करावे लागले तसेच किशोरवयातील संभाजी महाराजांना शत्रूकडे ओलीस ठेवावे लागले.

आग्र्याच्या दरबारातील अपमानकारक वागणुकीचा विरोध केला म्हणून औरंगजेबाने १२ मे १६६६ रोजी राजांना कैद केले. तेथे आजारपणाचे सोंग घेऊन मला आता माझे सैनिकही नकोत म्हणून औरंगजेबाला गाफील करून १६ ऑगस्ट १६६६ रोजी कैदेतून निसटले व २ सप्टेंबरला राजगडावर सुखरूप पोहोचले. नंतर मात्र क्रमाक्रमाने तहात दिलेले किल्ले पुन्हा हस्तगत करून ६ जून १६७४ रोजी राज्याभिषेक करून छत्रपती झालेत. म्हणजे शिवाजी महाराजांनीसुद्धा प्रसंगी माघार पत्करली, संतुलित जोखीम घेतली, पण सरतेशेवटी आपले स्वराज्य स्थापनेचे ध्येय पूर्ण केले.

**२.** काही दुष्ट स्वभावाच्या श्रीमंत मुली त्रास देताना तिषाच्या सावळ्या रंगाची, सामान्य दिसण्याची, तिच्या साध्या कपड्यांची थट्टा करायच्या. खेळताना तिच्या तुटक्या बुटांचा उल्लेख करून टोमणे मारायच्या. सर्वात गरीब म्हणून पदोपदी तिला बोलून व कधी शारीरिक इजा करून खूप त्रास द्यायच्या. पण तरीही तिषाने त्यांची तक्रार न करता आपले पूर्ण लक्ष आपल्या खेळावरच केंद्रित केले. खरे तर अशा वेळी त्यांच्याशी भांडायची, अगदी मारामारी करायची तिला इच्छा व्हायची; पण मग तिला आपली बेताची परिस्थिती आठवायची. तिने विचार केला की, आज तुम्ही तुमच्या आईबापांच्या श्रीमंतीच्या जोरावर माजून मला त्रास देत माझ्या गरिबीची थट्टा करीत आहात. पण मी माझ्या मेहनतीच्या जोरावर तुमच्यापेक्षा पुढे जाऊन दाखवीन. या प्रकारे मनाची समजूत घालून ती पुन्हा नवीन जिद्दीने आपल्या ध्येयासाठी झपाटून कामाला लागत असे.

असा काही दिवस संघर्ष केल्यावर तिषा आज खूपच आनंदात होती. कारण तिच्या फुटबॉल कोचने आज कॉलेजच्या मुलींच्या टीमची कप्तान म्हणून तिचे नाव जाहीर केले. तिच्या परिश्रमाचे सार्थक झाले होते. आज तिला तिच्या वडिलांची खूप आठवण येत होती. गेल्याच वर्षी त्यांचा मृत्यू झाला. नि:शुल्क शिक्षण उपलब्ध असूनही घरच्यांना आर्थिक मदतीची गरज असल्याने त्यांनी नोकरीसाठी बालपणीच शिक्षण सोडले होते. त्यांचे अख्खे आयुष्य अतिशय कष्टात गेले. त्यांनी स्वत:च्या प्रकृतीकडे सतत दुर्लक्ष केले.

अखेर आजारात त्यांचा वयाच्या पन्नासाव्या वर्षीच मृत्यू झाला. त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या दिवशी तिषाने आपल्या बाबांना वचन दिले की, ती मोठ्या प्रसिद्ध कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन यशस्वी होईल आणि सर्वच क्षेत्रात त्यांचे नाव मोठे करील. तो प्रसंग आणि तिने वचन दिल्यावर तिच्या बाबांच्या चेहऱ्यावर दिसलेले समाधान तिषा विसरू शकत नव्हती. म्हणूनच त्रास सोसूनही शेवटी तिने टीमची कप्तान होऊनच दाखवले. संध्याकाळी कामावरून आई परतल्यावर तिने आईला ती फुटबॉल टीमची कप्तान झाल्याचे सांगितले. तेवढ्यात दाराची बेल वाजली. तिने दार उघडले आणि तिषाचा चेहरा उतरला. तीन महिन्यांपासून त्यांनी घरभाडे न दिल्यामुळे एक महिन्यात घर रिकामे करण्याची नोटीस घेऊन घरमालक आले होते.

आम्ही काहीतरी व्यवस्था करतो, असे सांगून आईने तात्पुरती सोय केली. पण संकट टळले नव्हते. तिषाचे यावर्षी कॉलेजचे शेवटचे वर्ष होते. तिला कसेही करून आयआयएममध्ये प्रवेश घेऊन वडिलांना दिलेले वचन पूर्ण करायचे होते. तिषाची चुलत बहीण मेघा तिची आदर्श होती. कारण तिच्यासारख्याच कठीण परिस्थितीचा सामना करून मेघाने उत्तम कॉलेजात प्रवेश मिळविला होता. त्यामुळे मेघासारखेच चौफेर यश तिषाला मिळवायचे होते. त्यासाठी तिषाने अभ्यासात मेहनत करून पूर्ण कॉलेजमध्ये प्रथम क्रमांकाने पास व्हायचे ठरवले होते. तसे तिला यशसुद्धा मिळत होते. आतापर्यंत तिचे शिक्षण, शिष्यवृत्तीच्या आधारेच सुरू होते. पण म्हणतात ना, अनेकदा अनेक संकटे सोबतच येतात. तिच्या कॉलेजच्या नवीन नियमांनुसार यावर्षीची शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी तिला कॉलेजच्या इतर स्पर्धेत भाग घेणे आवश्यक आहे, असे सांगण्यात आले. त्यात एकूण १२ प्रकारच्या स्पर्धांपैकी तीन स्पर्धेत उत्तम सहभाग असण्याची अट घालण्यात आली होती.

इकडे घराचे भाडे भरायचे होते, तिकडे शिष्यवृत्ती हातची जाऊ द्यायची नव्हती तसेच उत्तम कॉलेजमध्ये प्रवेश मिळावा म्हणून त्याच्या प्रवेशासाठी स्पर्धा परीक्षेची तयारीसुद्धा करायची होती. आईने प्रयत्न करूनही घरभाड्याची रक्कम गोळा झाली नव्हती. म्हणून मग तिषाने एक पार्टटाईम नोकरी सुरू केली. मात्र आता तिला हे सगळे सांभाळणे कठीण होऊ लागले. झोप अपुरी होऊ लागली. आर्थिक तंगी असल्यामुळे तिला खेळासाठी आवश्यक सकस आहार घेता येत नव्हता. तिकडे नाटकाच्या व गाण्याच्या तालमी सुरू झाल्या. या सगळ्याचा व्हायचा तो परिणाम झाला.

तिषाला वर्गात झोप अनावर होऊ लागली. तिच्या सर्व शिक्षकांना वाटले एवढी चांगली मुलगी अशी का वागतेय? जी आधी कुठल्याही प्रश्नासाठी उत्तर द्यायला अधीर असायची ती आता वर्गात डुलक्या घेतेय! आता तिषाची अभ्यासातील आणि खेळातील गुणवत्ता घसरली. पार्टटाईम नोकरीच्या ठिकाणी तिने चीडचीड केल्यामुळे हातची नोकरी गेली. कॉलेजमध्ये असताना अचानक तिषाचे पोट खूप दुखू लागले. शेवटी चक्कर येऊन ती बेशुद्ध झाली. कॉलेजातील स्टाफने तिला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले.

थोड्याच वेळात आईला कळवल्यामुळे तिची आई पोहोचली. सगळ्या चाचण्या केल्यावर ॲक्यूट स्ट्रेस डिसऑर्डर म्हणजे अतितणावामुळे पोटात अल्सर झाल्याचे निदान झाले. डॉक्टरांनी तिचे समुपदेशन केले. तिला तिच्या आयुष्यातील ताण कमी करायला सांगितले. आईनेसुद्धा तिला समजावले, पण मला बाबांना दिलेले वचन पूर्ण करायचे आहे.

माझे स्वप्न पूर्ण करायचे आहे, असे म्हणून ती आईला चिडून बोलली. शेवटी डॉक्टरांनी आईला बाहेर बोलावून सांगितले की, तिला आता काही बोलून उपयोग नाही. सध्या तिला आरामाची गरज आहे. काही दिवसांनी हॉस्पिटलमधून घरी परतल्यावर तिला सात दिवस बेडरेस्ट सांगितली होती. तरीही झोपल्या-झोपल्या ती अभ्यास करायचा प्रयत्न करीतच होती. म्हणजे एवढा त्रास, अपयश मिळूनही तिषाला आपली स्वप्नं व बाबांना दिलेले वचन पूर्ण करण्याच्या जिद्दीने झपाटले होते. मात्र, तिची प्रकृती तिला साथ देत नव्हती.


खरे तर तिला त्या वयात स्वत:चे व्यवस्थापन करता येत नव्हते. तिच्या दृष्टीने ती पूर्ण प्रयत्न करीतच होती, पण काहीतरी चुकत होते...! एक दिवस तिषाला अचानक बाहेरच्या खोलीतून तिची आदर्श बहीण मेघाचा आवाज ऐकू आला. थोड्याच वेळात तिच्या आईने व्हिलचेअरवर बसलेल्या मेघाला तिषाच्या खोलीत आणले.

मेघाला व्हिलचेअरमध्ये बघून तिषाला धक्काच बसला. मग मेघाने तिला आपली आपबिती कथन करून मेघाला मोठ्या आदर्श कॉलेजमध्ये प्रवेश मिळाल्यानंतर तिने आधी आपल्या प्रकृतीकडे लक्ष न दिल्याचा परिणाम तिला भोगावा लागला. तिला पॅरालिसिसचा अटॅक आला व तिच्या शरीराचा खालचा भाग बधिर झाला. त्यामुळे तिला आता दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागत होते. ती पुढे ठीक होईल असे डॉक्टर म्हणत होते, पण त्यासाठी वाट पाहावी लागणार होती व काळजी घ्यावी लागणार होती. हे सगळं मेघाने तिषाला सांगून अत्यंत महत्त्वाचा संदेश दिला की, जिद्दीने ध्येयपूर्तीसाठी पूर्ण प्रयत्न करायचे वगैरे हे सगळं ठीक! पण प्रकृतीची हेळसांड नाही करायची. आवश्यक त्या तज्ज्ञाला विचारून आहार, व्यायाम, आराम याचे कोष्टक तयार करायचे.

तणाव ठरावीक पातळीच्यावर जाणार नाही, याची काळजी घ्यायची. फक्त बुद्धी न वापरता भावना कशा नियंत्रित ठेवायच्या ते समजून आपले मानसिक स्वास्थ्य सांभाळायचे. कारण मनाला आणि आपल्या इच्छांना मर्यादा नसल्या, तरी शरीराला मर्यादा असतात. त्यासंबंधी शास्त्रीय नैसर्गिक नियम असतात त्यांना समजून संतुलन साधणे अत्यावश्यक आहे. हे सगळं ऐकून 'सर सलामत तो पगडी पचास' हे तत्त्व तिषाला पटले. म्हणजे शत्रूने तलवारीचा वार केल्यावर डोके वाचले, पण पगडी फाटली.

याप्रकारे पगडीचा बळी गेला, पण डोके वाचले; म्हणजे जीव वाचला! मग पगडी खराब झाली म्हणून दु:खी का व्हावे? डोके वाचले ना, मग नंतर पन्नास पगड्या घेता येतील. जीवनात प्रसंगी थोडी माघार घेऊन स्वत:ला सुरक्षित करून धरल्यास नंतर परिस्थितीवर मात करता येते. हे सर्व समजल्यावर सर्वप्रथम तिने तिला आवडणारा फुटबॉलचा खेळातील सहभाग चालू ठेवला; पण कप्तानाची धुरा तिचा मत्सर करणाऱ्या दुसऱ्या मुलीला देण्यास माझी हरकत नाही, असे तिच्या क्रीडा प्रमुखांना कळवले. तिच्या या निर्णयामुळे तिला होणारा मुलींचा जाच कमी झाला तसेच अवांतर जास्त गुण मिळविण्याच्या लोभाने जबरदस्तीने भाग घेतलेल्या नाटक व संगीताच्या यादीतून प्रकृतीचे खरे कारण सांगून आपला सहभाग काढून घेतला. कारण या दोन्ही तालमींसाठी तिला खूप वेळ द्यावा लागल्यामुळेच तिचा ताण वाढला होता. या प्रकारे बुद्धी वापरून तिने आपला तणाव नियंत्रित केल्यावर, लवकरच तिने अभ्यास आणि खेळात पुन्हा आपले वर्चस्व सिद्ध केले.

एकदम मोठ्या कॉलेजमध्ये प्रवेशाच्या दृष्टीने प्रयत्न न करता तिला पूर्ण शिष्यवृत्ती देऊ शकणाऱ्या पण दुसऱ्या क्रमांकाच्या कॉलेजमध्ये प्रवेश सुनिश्चित केला. त्यातून तिला उत्तम यश मिळून अतिशय प्रतिष्ठित कंपनीत चांगल्या पगाराची नोकरी लागली. तिची ही जबरदस्त प्रगती पाहून तिला त्रास देणाऱ्या मुलीसुद्धा चकित झाल्या. या प्रकारे स्वत:च्या ध्येयाला न बदलता मार्गात योग्य ते बदल करून तिषाने यश संपादन केले. आता ती आणि तिची आई अतिशय समाधानकारक आयुष्य जगत आहेत. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत)



## मौनात नांदतो । स्थितप्रज्ञ ।।

करावे चिंतन । साधुनी एकांत ।।
मनाशी निवांत । बोलू थोडे ।।१।।

साधिला जयाने । आत्म्याशी संवाद ।।
तोचि परमानंद । भोगतसे ।।२।।

व्यासंगाचे मुळ । विकारांचा त्याग ।।
विषयांचा भोग । घात करी ।।३।।

देहाच्या सदनी । आत्म्याचा निवास ।।
अनुभूती श्वास । नित्य देई ।।४।।


संसारी राहूनी । वेगळा भासतो ।।
मौनात नांदतो । स्थितप्रज्ञ ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## खेळिया..!

कोण खेळवून जातो ओली अक्षरे मातीची,
दिवा पेटे उजेडाचा स्वप्ने जागवी वातीची!
आभाळाच्या आसवांनी कोण घाली न्हाऊ-माखू
कोण सांगे आपल्याला चला शिवार हे राखू!
आत जागल्या कोंबांना देत आगळीच दृष्टी,
कोण म्हणे खेळ बाळा तुला आनंद ही सृष्टी!
कोण नाचवी चैतन्य रोज सकाळी अंगणी,
देई हिरव्या पानांनी फुफ्फुसाला संजीवनी!
असा कोणता खेळिया त्याला भिन्न भिन्न नावे,
त्याच्या पुजनी भजनी सुरू माणसांत दावे!

शशी त्रिभुवन



## नवे जग

सारे विसरूनी जुने, मागचे भले-बुरे
नव्या जगताकडे पाहावे आशेने डोळे भरून
मनसोक्त पाहात राहावे कशाला हवेत गत आठवणींचे
पुंजके पश्चातापाचे, मनस्तापाचे, खेदाचे, विवंचनेचे,
मानापमानाचे आणाव्या आचरणात नव्या कल्पना,
नवे विचार जेणेकरून होईल अजून स्वास्थ्यपूर्वक
जीणे दोषांचे, अपराधांचे, गुन्ह्यांचे, चुकांचे गाठोडे
सर्वच घेऊन आलेत बरोबर, नाही परिपूर्ण येथे कोणी
कोणातला नका दोष पाहू, करा कौतुक गुणांचे होतील
ते प्रोत्साहित, उल्हसित, करतील अजून नवी सत्कर्मे
सत्यम, शिवम, सुंदरम वदुनी चालत राहू पुढे, पुढे...

अशोक जोशी

# इंधनाचा धडाका; कांदा लसणाचा तडका

> गेल्या काही काळात भारत हा इंधनाचा सर्वात मोठा पुरवठादार बनला आहे. दुसरी महत्त्वाची बातमी म्हणजे भविष्य निर्वाह निधीच्या वेतन तरतुदीत बदलाची शक्यता आहे. त्याच वेळी ऋण काढून सण करण्याच्या वृत्तीत वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशीच आणखी एक लक्षवेधी बातमी म्हणजे कांदालसणाने अलिकडे सामान्यजनांचे टेन्शन वाढवले आहे.

## अर्थोद्योग

महेश देशपांडे

सरत्या आठवड्यातील अर्थविषयक घडामोडींमधून काही महत्त्वाची निरीक्षणे समोर आली. त्यांची नोंद घेणे महत्त्वाचे आहे. सर्वप्रथम म्हणजे भारत हा इंधनाचा सर्वात मोठा पुरवठादार बनला आहे. दुसरी महत्त्वाची बातमी म्हणजे भविष्य निर्वाह निधीच्या वेतन तरतुदीत बदलाची शक्यता आहे. त्याच वेळी ऋण काढून सण करण्याच्या वृत्तीत वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशीच आणखी एक लक्षवेधी बातमी म्हणजे कांदालसणाने अलिकडे सामान्यजनांचे टेन्शन वाढवले आहे.

युक्रेन आणि रशियामध्ये युद्ध सुरू झाल्यापासून भारत युरोपसाठी खूप महत्त्वाचा पुरवठादार बनला आहे. युरोपच्या अर्थव्यवस्थेची सर्वात महत्त्वाची गरज भारतातून भागवली जात आहे. रशियावर निर्बंध लादल्यानंतर इंधनासाठी भारत युरोपची गरज बनत चालला आहे. अहवालानुसार, भारत सध्या युरोपला इंधनाचा सर्वात मोठा पुरवठा करणारा देश बनला आहे. विशेष म्हणजे रशियाकडून स्वस्त तेल विकत घेऊन आणि ते शुद्ध करण्यासाठी युरोपला पाठवून भारतही मोठी कमाई करत आहे. मासिक निरीक्षण अहवालातील माहितीनुसार २०२४ च्या पहिल्या तीन तिमाहींमध्ये भारतातून युरोपीय महासंघाला डिझेलसारख्या इंधनाची निर्यात ५८ टक्क्यांनी वाढली आहे. अशा स्थितीत रशियातून येणाऱ्या कच्च्या तेलाचा मोठा वाटा असून ते शुद्ध करून युरोपला पाठविले जात असल्याचे मानले जाते.

डिसेंबर २०२२ मध्ये युरोपीयन महासंघ आणि जी ७ देशांनी रशियावर निर्बंध लादले आणि कच्च्या तेलाच्या आयातीवर किंमत मर्यादा आणि बंदी लादली. तथापि, रशियन कच्च्या तेलापासून बनवलेल्या परिष्कृत इंधनावर धोरणस्पष्टतेचा अभाव म्हणजे निर्बंध नसलेले देश मोठ्या प्रमाणात रशियन कच्चे तेल आयात करू शकतात आणि निर्बंध असलेल्या देशांना कायदेशीररीत्या विकण्यासाठी ते परिष्कृत उत्पादनांमध्ये रूपांतरित करू शकतात. रशियाने युक्रेनवर केलेल्या हल्ल्यानंतर भारत रशियन कच्च्या तेलाचा दुसरा सर्वात मोठा खरेदीदार बनला आहे. युक्रेन युद्धापूर्वी रशियाकडून भारतात होणारी कच्च्या तेलाची आयात एकूण आयात केलेल्या तेलाच्या एक टक्क्यांहून कमी होती.

युद्धानंतर खरेदी वाढून ती सुमारे ४० टक्के झाली आहे. शुद्धीकरणाच्या नियमांमधील त्रुटींचा फायदा घेत भारत आता युरोपीय महासंघाला तेल उत्पादनांचा सर्वात मोठा निर्यातदार बनला आहे, असे 'सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी अँड क्लीन एअर' (क्रेरा) ने आपल्या ताज्या अहवालात म्हटले आहे. आता एक लक्षवेधी बातमी. संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची सामाजिक सुरक्षा मजबूत करण्यासाठी केंद्र सरकार कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (ईपीएफ) अंतर्गत किमान वेतन मर्यादा सध्याच्या १५ हजार रुपयांवरून २१ हजार रुपयांपर्यंत वाढवू शकते. याशिवाय 'ईपीएफओ'मध्ये सामील होण्यासाठी कोणत्याही कंपनीसाठी २० कर्मचाऱ्यांची संख्या १०१५ पर्यंत कमी केली जाऊ शकते. त्यामुळे अधिकाधिक कंपन्यांना 'ईपीएफओ'च्या कक्षेत आणता येईल.

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अंतर्गत २०१४ मध्ये किमान वेतन मर्यादा शेवटची बदलण्यात आली होती. त्यानंतर किमान वेतन मर्यादा साडेसहा हजार रुपयांवरून १५ हजार रुपये करण्यात आली; मात्र गेल्या १० वर्षांमध्ये या मर्यादेत कोणताही बदल झालेला नाही. सध्याचे कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडविया सर्व प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेत आहेत आणि सरकारचा विश्वास आहे की, कर्मचारी भविष्य निर्वाह निधीसाठी किमान वेतन मर्यादेसह 'ईपीएफओ'मध्ये सामील होण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या संख्येच्या मर्यादेत सुधारणा करणे आवश्यक आहे. किमान वेतन मर्यादा २१ हजार रुपयांपर्यंत वाढवून भविष्य निर्वाह निधीसाठी कर्मचाऱ्यांच्या पगारातून अधिक पैसे कापले जातील आणि कर्मचारी निवृत्ती वेतन योजनेतील (ईपीएस) योगदानदेखील वाढेल. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अंतर्गत, कर्मचारी आणि नियोक्ता या दोघांनीही 'ईपीएफओ'मध्ये मूळ वेतनाच्या १२ टक्के योगदान देणे आवश्यक आहे.



कर्मचाऱ्यांचा १२ टक्के वाटा 'ईपीएफओ' खात्यात जमा केला असल्यास कर्मचाऱ्यांच्या १२ टक्के वाट्यापैकी ८.३३ टक्के हिस्सा 'ईपीएस' (कर्मचारी पेन्शन योजना) मध्ये तर ३.६७ टक्के हिस्सा 'ईपीएफ' खात्यात जमा केला जातो. 'ईपीए'अंतर्गत किमान पगार मर्यादेत वाढ केल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या पगारातून 'ईपीएफ' खात्यात केवळ जास्त रक्कम जमा होणार नाही, तर 'ईपीएस' योगदानही वाढेल. कर्मचारी संघटनांचे सदस्य असलेल्या 'ईपीएफओ'च्या केंद्रीय विश्वस्त मंडळाच्या बैठकीत किमान वेतन मर्यादा अनेक वेळा वाढविण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, बाजारात एक नवा ट्रेंड पाहायला मिळत आहे. सध्या लोक कर्ज घेऊन किंवा उधारीवर खरेदी करत आहेत. यामध्ये एक नवा विक्रम रचला गेला आहे. दिवाळी आणि छटपूजा हे असे दोन मोठे सण आहेत; ज्यात देशातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या उत्तरप्रदेश आणि बिहार या दोन राज्यांमधील लोक मोठ्या प्रमाणात खरेदी करतात. त्यामुळे हे दोन्ही सण अर्थव्यवस्थेसाठीही शुभ मानले जातात; पण यात उधारीवर खरेदी करत नवा विक्रम रचला गेला आहे. यंदा दसऱ्याच्या निमित्ताने लोकांनी सणासुदीची खरेदी सुरू केली. या खरेदीमध्ये उधारीवर किंवा कर्जावर खरेदी करण्याचा नवा विक्रम करण्यात आला आहे.



दिवाळी ३१ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबर रोजी साजरी करण्यात आली. त्याचबरोबर छटचा सणही ५ नोव्हेंबरपासून ८ नोव्हेंबरपर्यंत चालला. 'गोक्विक नेटवर्क'च्या अहवालानुसार गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा क्रेडिट किंवा कर्जावरील ऑनलाईन खरेदी दुप्पट झाली आहे. गेल्या वर्षी ती ३.४९ टक्के होती. यंदा वाढून ती ६.९ टक्के झाली आहे. याचे दोन अर्थ आहेत. एक म्हणजे लोक आता कर्ज किंवा क्रेडिटने आपले छंद किंवा गरजा पूर्ण करत आहेत. दुसरे म्हणजे अर्थव्यवस्थेतील ग्राहकांच्या भावनेमध्येही सुधारणा दिसून येते. दिवाळी आणि छटच्या पृष्ठभूमीवर यंदा प्री-पेड ऑर्डरमध्ये १३ टक्क्यांनी वाढ झाली. यंदा 'कॅश ऑन डिलिव्हरी ऑर्डर'मध्ये आठ टक्क्यांची घट झाली. याचे एक कारण म्हणजे ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सना त्यांच्या पेमेंट आणि रिफंड सिस्टिममध्ये सुधारणा करावी लागेल. आज उधार आणि कर्जावर खरेदी करणेही सोपे झाले आहे. ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर लोकांना 'बाय नाऊ, पे लेटर'चा पर्याय मिळतो. त्याचबरोबर अनेक डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्म लवकर पगार, क्रेडिटलाईन असे इतर पर्यायही देतात. लोक आता क्रेडिट कार्ड आणि डेबिट कार्डवर 'ईएमआय'चा पर्याय घेऊन खरेदी करण्यास प्राधान्य देतात. लोक कर्ज घेऊन किंवा उधारीवर खरेदी करत आहेत; पण याचा अतिरेक होऊ नये, याकडेदेखील लक्ष द्यायला हवे. कारण यात नुकसान होण्याची शक्यता आहे.

या बातम्या चर्चेत असताना कांदा आणि लसणाने ऐन निवडणुकीमध्ये सत्ताधाऱ्यांचे टेन्शन वाढवले. अलिकडेच मुंबईत कांदा आणि लसणाच्या तुटवड्याने मुंबईकरांच्या जेवणाची चव हरवली. कांदा आणि लसणाच्या पेस्टने रोजच्या जेवणाला रंगत येते. ते रुचकर आणि चविष्ट लागते; पण हे महत्वाचे दोन जिन्नसच हरवल्याने मुंबईकरांच्या जेवणाची चव हरवली. कांदा आणि लसणाच्या तुटवड्याने किमती वाढल्या. ऐन निवडणुकीच्या तोंडावर नागरिकांनी दरवाढीवर नाराजी व्यक्त केली. मुंबईतील बाजारात कांदा आणि लसणाचा तुटवडा निर्माण झाला. कांदा ८० रुपये किलोवर तर लसूण ४०० रुपये किलोवर गेला. मुंबईत किरकोळ बाजारात कांदा ६० ते ८० रुपये किलो दराने विकला गेला. कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये कांदा आणि लसणाची आवक कमी झाल्यामुळे तुटवडा जाणवत आहे.

पुढील महिनाभर कांद्याचे आणि तीन-चार महिने लसणाचे वाढ चढेच राहणार आहेत. दिवाळीत नाशिक परिसरात कांद्याची खरेदी-विक्री आठवडाभर बंद होती. परिणामी बाजारात कांद्याचा तुटवडा निर्माण झाला. शेतकऱ्यांकडील उन्हाळी कांदा जवळपास संपला आहे. किरकोळ प्रमाणात दोन ते पाच टक्के उन्हाळी कांदा शेतकऱ्यांकडे शिल्लक आहे.

या सर्वाचा परिणाम म्हणून पुणे, मुंबईसह राजधानी दिल्लीत दर्जेदार कांद्याचे दर ८० रुपयांवर गेले. खरीप हंगामातील नुकताच काढलेला, पाण्याचे प्रमाण जास्त असलेला कांदा ६० रुपये किलो दराने विकला जात आहे. कांद्याचे भाव आणखी महिनाभर वाढत राहण्याची भीती व्यक्त होत आहे. या समस्येवर सरकारला लवकरात लवकर तोडगा काढावा लागणार आहे. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

# 'भारतीय साहित्यशास्त्र' नाट्य काव्य आणि साहित्यशास्त्र शिकवणारा ग्रंथ

**अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील वडनेर गगाई येथे १४ ऑगस्ट १९१० रोजी डॉ. गणेश त्र्यंबक देशपांडे यांचा जन्म झाला. नागपूर विद्यापीठातील संस्कृत विभागात प्राध्यापक आणि विभाग प्रमुख म्हणून कार्यरत होते. भारतीय साहित्यशास्त्र हा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ गणेश देशपांडे यांनी लिहिला. १९५८ मध्ये प्रकाशित या ग्रंथाला १९५९ चा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला आहे. साहित्यशास्त्र आणि व्याकरण यावर आधारित असलेल्या या ग्रंथातून भारतीय साहित्याची नेमकी ओळख करून देण्याचे काम देशपांडे यांनी केले आहे.**

साहित्य शिक्षण

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

प्रा. गणेश त्र्यंबक देशपांडे यांच्या 'भारतीय साहित्यशास्त्र' हा ग्रंथ आपल्याला दोन विभागात असल्याचे दिसून येते. प्रा. देशपांडे यांनी पहिल्या भागामध्ये भरताचार्यांच्या नाट्यशास्त्रापासून जगन्नाथ पंडिताच्या 'रसगंगाधरा'पर्यंतच्या कालखंडाच विचार करत सुमारे दोन हजार वर्षांच्या काळात साहित्यशास्त्राचा विकास कसा झाला, याबाबत भाष्य करताना त्या कालखंडात होऊन गेलेल्या ग्रंथकारांच्या ग्रंथांचा आणि त्या ग्रंथातील विषयांचा चिकित्सक पद्धतीने अतिशय सूक्ष्म असा अभ्यास करून मते मांडलेली दिसतात.

ग्रंथाच्या दुसऱ्या भागात शब्दार्थांचे स्वरूप, अभिधा, लक्षणा व व्यंजना या शक्ति, व्यंग्यार्थ किंवा ध्वनि, रसप्रक्रिया इत्यादी साहित्यशास्त्रातील विषयांचे विवेचन इतर ग्रंथास अनुसरून सविस्तर केले आहे. त्यांतील ३९; रसप्रक्रिया३९; हे प्रकरण भाषा साहित्याच्या अभ्यासाचा सर्वोत्तम असा अविष्कार आहे. प्रा. देशपांडे यांनी साहित्यशास्त्रांतील विविध विषयांचे विवेचन करताना व्याकरण, आणि साहित्यशास्त्राला पुढे कशा शास्त्रांतील संज्ञांचा व सिद्धान्तांचा उपयोग केला आहे. सौंदर्यानुभव, सौंदर्य मीमांसा, सौंदर्य आणि साहित्य याशिवाय भारतीय साहित्यशास्त्र अशा भाषाविषयक ग्रंथामधील पाना-पानावर भाषेचे शिक्षण आणि भाषेचे संदर्भ आलेले असतात त्यातून नेमके शैक्षणिक संदर्भ कोणते आणि कसे? याबाबत खरे तर वर्गीकरण करताच येत नाही. अगदीच औपचारिक शिक्षणाबाबत विचार केला असता ते किंचित सोपे होऊन जाते. एरवी भाषा साहित्याचे आणि सौंदर्याचे प्रत्येक ग्रंथ हे शैक्षणिक ग्रंथच असतात असे मला वाटते.


भारतीय साहित्यशास्त्रामध्ये सुरुवातीला अर्पण पत्रिका लिहिताना संस्कृतचा वापर करत प्रा.देशपांडे यांनी,

आचार्याणां स्वरूपेण शास्त्रविद्याप्रवर्तनम् ।
करोति कापि या तस्याः पादयोरिदमर्पितम्

हा श्लोक उद्बोधित केला आहे. ज्याद्वारे गुरू मुळे विद्या आणि शास्त्र टिकून आहे तसेच खरा विद्यार्थी शरण आला तर तो ज्ञान प्राप्त करू शकतो असे म्हणतात. यावरून शिक्षकाचे महत्त्व आणि खरे शिष्याचे कर्तव्य या दोन्ही बाबी देशपांडे यांच्यासाठी महत्त्वाच्या आहेत हे निश्चित होतेच. अभिधानकोष, छन्दोज्ञान व क्रियाकल्प या कला काव्यक्रियेच्या अंगभूत असून, या तीन कलांचें ज्ञान काव्यनिर्मिती आणि काव्यपरिशीलन या दोहोंकरिताहि आवश्यक आहे. असे कामसूत्राचा टीकाकार यशोधर म्हणतो, असे जेव्हा लेखक सांगतात तेव्हा कलांचे ज्ञान आणि शिक्षण याला कोणताही विषय वर्ज नसतो हे लक्षात घेणे गरजेचे असते.

भारतीय संस्कृतीमध्ये कामशास्त्र या विषयाकडे सुद्धा शिक्षणाचा विषय म्हणून पाहण्यात आले आहे. हे कामसूत्र हा ग्रंथ आणि खजूराहोच्या वास्तू कलेवरून सिद्ध झालेले आहे. आपले मत पुढे नेताना प्रा. देशपांडे म्हणतात, वामनाच्या 'काव्यालंकारसूत्रां' वर 'कामधेनु' नांवाची टीका आहे. त्या टीकेंत चौसष्ट कलांच्या नांवांचा संग्रह करणार्या कारिका भामहाच्या म्हणून दिल्या आहेत. या कारिकांतील कलांची यादी वात्स्यायनाच्या यादीसारखीच आहे. यावरून भारतातील शिक्षण, ज्ञान आणि कला या सर्व बाबी एकमेकात गुंतलेल्या आहेत असे लक्षात येते.

शास्त्र असो की कला यातील ज्ञानाची आरास एकमेकांवर अवलंबून असते हे आपण नेहमी पाहत आलो आहोत. संस्कृतमधील अनेक शिक्षा ग्रंथात काव्य आणि नाटक या कला उदबोधन आणि प्रबोधन करणाऱ्या असल्याचे लेखकाने सांगितले आहे. ज्याला आपण आज सुशिक्षित, सुसंस्कृत गृहस्थ समजतो




तो पूर्वीचा नागरक होय. चातुर्वर्ण्यांपैकी कोणत्याहि वर्णाचा पुरुष सुशिक्षित व सुसंस्कृत असला की त्याला नागरकांची प्रतिष्ठा मिळत असे असे लेखक सांगतात. यावरून भारतात वर्णन व्यवस्था असले तरी शिक्षणाला महत्त्व अधिक होते आणि शिक्षण घेतलेल्या कोणत्याही वर्णातील नागरिकाला प्रतिष्ठा मिळत असे मात्र पुढे अनागोंदी आणि अनाचार यामुळे चातुर्वर्ण व्यवस्थेमध्ये काही घटकांवर विलक्षण अन्याय होत गेले. लेखकाने सांगितल्याप्रमाणे सुशिक्षित नागरिकाच्या घरामध्ये खोलीत एका बाजूला खुंटीवर वीणा टांगलेली असे. यावरून सुशिक्षित माणूस संगीत कला यामध्ये रस घेणारा आणि तिची साधना करणारा असतो त्याचप्रमाणे दुसऱ्या बाजूला एक चित्रफलक ठेवलेला असून त्याजवळच चित्रकर्मांचें सर्व साहित्य असे, असे जेव्हा लेखक म्हणतात तेव्हा सुशिक्षित माणूस चित्रकलेसारख्या कलांमध्येही आनंदाचे क्षण शोधत असतो असे लेखक म्हणतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ३९ बैठकीच्या शेजारींच हाताला येईल असे एखादे पुस्तक दिसून येई. पुस्तक सामान्यत: स्वकृत किंवा परकृत काव्याचे असे. ३९ असे लेखक म्हणतात, तेव्हा सुशिक्षित आणि ज्ञानी माणूस वाचन वेडा असतो तू वाचनाशिवाय राहू शकत नाही त्याचप्रमाणे तो स्वतःच्या निर्मित कविता किंवा दुसर्याने निर्माण केलेले काव्य याचे महत्त्व जाणणारा असतो. एकंदरीत साहित्य अकादमी प्राप्त पुस्तकात मी जे शैक्षणिक संदर्भ शोधले त्यातील सुशिक्षक माणसाचे लक्षण सांगणारे सर्वोत्कृष्ट वक्तव्य म्हणून मी प्रा. देशपांडे यांच्या वरील वाक्याचे उदाहरण देईल.

सुशिक्षित समाज नेमका कसा असावा याचेही वर्णन लेखकाने या ग्रंथामध्ये केले आहे. त्या दृष्टीने भारतीय साहित्यशास्त्रामधील पुढील अवतरण फार महत्त्वाचे आहे असे मला वाटते. घटानिबंधन म्हणजे देवतेच्या यात्रेच्या निमित्ताने एकत्र येणे. पंधरवड्याने किंवा महिन्यांतून एकदा नागरक सरस्वतीमंदिरांत एकत्र जमत. सरस्वती ही नागरकांची विद्या व कला या बाबतींत अधिष्ठात्री देवता. लोक सरस्वती भवनांत जमून तेथे विविध कलांचे कार्यक्रम व स्पर्धा करीत. कलानिपुण वेश्येच्या- कलावंतिणीच्या दिवाणखान्यांतही एखादी वेळी ही सभा बोलावली जाई. तेथे समान वयोविद्येचे व समान अभिरुचीचे नागरिक जमत. येथे विशेषेंकरून काव्य समस्या व कला समस्या चालत.

कलानिपुण वेश्या आणि विदग्ध गणिकासुद्धा या कार्यक्रमांत भाग घेत. या संमेलनांत कलावंतांचा सन्मान करण्यांत येई. एकंदरीत सुशिक्षित समाजाला ज्ञान आणि कला या समोर कोणताही सामाजिक अथवा इतर कोणत्याही प्रकारचा भेदभाव मान्य नव्हता असे लेखकाने वरील विवेचनात सांगितले आहे. सर्व बाबींचा विचार करता एखाद्या कवीने नेमके कसे वागावे? आपल्या रचनाच्या आणि काव्याच्या संदर्भात नेमका कोणता विचार मांडावा, हे सुद्धा लेखकाने पुढील शब्दात सांगितले आहे, कवीने प्रथम स्वत:बद्दलच नीट कल्पना करून घ्यावी. आपल्यावर कितपत संस्कार झाला आहे, कोणत्या भाषेवर आपलें प्रभुत्व आहे, लोकांची रुचि कशांत आहे, लोकांनी कशाचा अभ्यास केला आहे, कोणत्या प्रकारच्या गोष्टींत शिक्षित झाले आहेत.

या सर्व बाबींचा अभ्यास करून आपल्या काव्य निर्मिती मागचे प्रयोजन कवीने समजून घेतले पाहिजे असे लेखक सुचवतात. संस्कृतमध्ये अनेक शिक्षा ग्रंथ लिहिले असून मराठीमध्ये असे शिक्षा ग्रंथ कमी आहेत. आपल्याला त्याचे महत्त्व वाटत नाही, असे सांगून लेखक म्हणतात, काव्य ही रसिक कला म्हणून प्रदर्शित करण्यासाठी त्या काळातील लोक कवित्वाचा अभ्यास करून काव्य निर्मिती करत त्यामुळे कविताला लोकाश्रय आणि राजश्रय प्राप्त होत असे. त्यामुळेच काव्याचा आणि साहित्यशास्त्राचा विकास ज्याला अभ्यासावयाचा असेल तर उत्तरोत्तर प्रामाण्य लक्षांत घ्यावेच लागते. साहित्यशास्त्रावरील संस्कृत ग्रंथांत व्याकरण, न्याय, मीमांसा इत्यादि शास्त्रांतील सिद्धान्तांचा उपयोग पदोपदी करण्यात आला आहे. आपले म्हणणे सिद्ध करावयास त्यांनी त्या- त्या शास्त्रांतील सिद्धान्तांचा केवळ अनुवाद केला आहे. असे असे अनेक महत्त्वाचे मुद्दे लेखकाने आपल्या भारतीय साहित्यशास्त्र या ग्रंथात मांडले आहेत. या सर्वातून भारतीय साहित्यशास्त्रा बाबत अभ्यासपूर्ण भूमिका घेणे असे सुतोवाच ते करताना दिसतात. प्रा. देशपांडे भारतीय भाषा साहित्य बाबत फक्त वक्तव्य करत नाहीत तर भाषा साहित्याचा अभ्यास करत असताना अभ्यासकांना कोणत्या अडचणी येतात त्याबद्दलही चर्चा करताना दिसतात. जसे काही अभ्यासकांनी रससिद्धान्ताची पुनर्व्यवस्था करण्याचा प्रयत्न केला तरी त्या प्रयत्नांतहि त्यांनी शास्त्रीय दृष्टीचा आवश्यक तेवढा काटेकोरपणा बाळगलेला नाही. असे सांगत असताना उदाहरण म्हणून रसविमर्श या ग्रंथांत वीररसाच्या विवेचनांत उत्साह हा स्थायिभाव काढून तेथे अमर्ष हा स्थायी सुचविण्यांत आला आहे. असे ते सोदाहरण सांगतात. याशिवाय भाषा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांची जबाबदारी कोणती हे सुद्धा प्रा. देशपांडे यांनी सांगितले आहे. ग्रंथांतील विचार वाचकांसमोर यथार्थतेने मांडणें हेंच आपले प्रमुख कार्य आहे. ते विचार एकदा अभ्यासकांसमोर आले म्हणजे विचाराच्या आजच्या धारणेंत त्यांची ग्राह्याग्राह्यता कितपत आहे हे आपोआपच ठरेल. असे सुद्धा लेखक आपले मत मांडत असताना सांगतात. (पूर्वार्ध)

# खूब लडी...



बुंदेले हरबोलों के मुंह हमने सुनी कहानी थी खूब लड़ी मर्दानी वह तो झाँसी वाली रानी थी... सुभद्राकुमारी चौहान यांची ही कविता वाचताना पाठीला आपल्या पुत्राला- दामोदरला बांधून घोड्यावर स्वार झालेल्या, हाती तलवार घेतलेल्या झाशीच्या राणीचे चित्र आपल्या डोळ्यासमोर येते. झाशीची राणी म्हणजेच लक्ष्मीबाई गंगाधरपंत नेवाळकर; मोरोपंत आणि भागीरथीबाई तांबे यांची कन्या; तात्या टोपे यांची मानस भगिनी बिजली; नानासाहेब पेशवेंची बालसखी. १९ नोव्हेंबर १८२८ रोजी मोरोपंत तांबेंच्या पत्नी भागीरथीबाई यांच्या पोटी कन्या जन्माला आली; तिचे नाव ठेवले मणिकर्णिका. लाडाने सगळे तिला 'मनू' म्हणत.

मोरोपंत तांबे पेशव्यांच्या पदरी चाकरीला होते. पेशवे ब्रह्मावर्ताला असताना तिथे पेशव्यांसोबत मोरोपंत तांबेही होते. मनूचा जन्म ब्रह्मावर्तातला. मोरोपंत तांबे यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील धावडशी. ते पेशव्याच्या पदरी चाकरीला असल्याने आधी पुण्याला त्यानंतर पेशव्यांसोबत ते काशीला गेले. दरम्यानच्या काळात भागीरथीबाईंचे निधन झाले. चार वर्षांची मनू आईविना पोरकी झाली. मोरोपंत तिची आई आणि वडील दोन्ही झाले. त्यांनी तिला कधी आईची उणीव भासू दिली नाही.

मनूचे खेळगडी होते नानासाहेब पेशवे, तात्या टोपे. तलवार चालवणे, घोडेस्वारी, भालाफेक याची मनूला आवड होती. नानासाहेबांबरोबरच तिनेही नानासाहेबाच्या गुरूकडून शस्त्र चालवण्याचे शिक्षण घेतले. अश्वारोहण करायला शिकली. घोड्यावर तिची मांड पक्की असायची. श्रीमंत बाजीराव पेशवे, नानासाहेब पेशवे, जयाजी शिंदे यांच्याकडून अश्वपरीक्षा करायला शिकली; त्यात पारंगत झाली. नानासाहेबांच्या बरोबर मनूनेही अस्त्र-शस्त्र शिक्षण घेतले. बाजीरावांच्या पदरी असलेल्या बाळंभट देवधर यांच्याकडून मनू कुस्तीचे डावपेच तसेच मल्लखांब शिकली. तिचे मुलगी असणे कुठेही आड आले नाही.

पेशव्यांनीही तिच्या युद्धकला शिकण्याला कधी प्रतिबंध केला नाही की तिचे वडीलमोरोपंतांनी विरोध केला नाही. आपली मुलगी इतर चार सामान्य मुलींपेक्षा वेगळी आहे, याचा त्यांना अभिमान वाटायचा. तात्या टोपेंनी एकदा गमतीने मनूला विचारले, ''बिजली, तुला कुठं राज्य चालवायचे आहे. तू कशाला युद्धाचे डावपेच शिकतेस?'' ते तिला 'बिजली' म्हणत. ती होतीच बिजलीसारखी चपळ आणि तेजस्वी. १८४२ मध्ये मणिकर्णिकेचा विवाह झाशीचे राजे गंगाधरपंत नेवाळकर यांच्याशी झाला. विवाहाचे वेळी गंगाधरपंतांचे वय ३० वर्षे होते. गंगाधररावांनी मणिकर्णिका हे नाव बदलून 'लक्ष्मी' हे नाव ठेवले. लक्ष्मीबाईंना मुलगा झाला, पण दुर्दैवाने तो तीन महिन्यांचा असताना वारला. त्यांनी त्यांचे नातेवाईक वासुदेवराव नेवाळकराचा मुलगा दत्तक घेतला. त्याचे नाव दामोदर ठेवले. गंगाधररावांसह दरबाराचे कामकाज राणी लक्ष्मीबाई पाहात.

१८५३ मध्ये गंगाधररावांचा देहांत झाला. त्यावेळी ईस्ट इंडिया कंपनीशी नेवाळकरांचे मैत्रिपूर्ण संबंध असल्याने आपले संस्थान ब्रिटिश खालसा करणार नाही, असे राणी लक्ष्मीबाईंना वाटले; पण तसे झाले नाही. ब्रिटिश अधिकारी लॉर्ड डलहौसी याने झाशी संस्थान खालसा करून त्यांचे दत्तक विधान बेकायदेशीर ठरवले. राणी लक्ष्मीबाईंच्या राजदरबारात इंग्रज अधिकारी सर व्ह्यू रोज याने झाशी संस्थान खालसा करीत असल्याचे तसेच दत्तक विधान रद्द करीत असल्याचे इंग्रज सरकारचे फर्मान राणी लक्ष्मीबाईंना दाखवले. राणीने ते फर्मान फेटाळून लावले.

'मै मेरी झांसी नहीं दुंगी...' त्यांनी गर्जना केली. इंग्रज सरकार झाशीवर चालून येणार, अशी भीती झाशीच्या जनतेच्या मनात निर्माण झाली. लक्ष्मीबाईंनी जनतेच्या मनात विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. १८५७ चा उठाव झाला. झाशीतही उठाव झाला. बंडखोरांनी इंग्रजांना झाशीतून पळवून लावले. बंडखोरांना राणी लक्ष्मीबाईंनी आपल्याकडे वळवून घेतले. विश्वासातील लोकांना अधिकाराची पदे दिली. तोफांची दुरुस्ती केली. तोफगोळ्यांची निर्मिती सुरू केली. खुदाबक्ष या विश्वासू तोफचीला तोफांच्या देखरेखीचे काम दिले. काळाची पाउले ओळखून राणीने स्त्रियांचे सैन्य उभारले. त्याची प्रमुख होती झलकारी. इंग्रजांनी झाशीच्या किल्ल्यावर हल्ला केला. किल्ल्याचे सर्व दरवाजे बंद करण्यात आले होते, परंतु एका फितुराने किल्ल्याचे दरवाजे उघडले. राणीच्या मंत्रिमंडळाने राणीला सुरक्षितपणे गडातून बाहेर काढले. राणी लक्ष्मीबाई दामोदराला पाठीशी बांधून तटावरून खाली उतरल्या. त्यांचा राजरत्न घोडा सज्ज होता. राणी लक्ष्मीबाई घोड्यावर स्वार झाल्या. झाशीत घनघोर युद्ध सुरू झाले. राणी लक्ष्मीबाई ग्वाल्हेरला असलेल्या नानासाहेब पेशवेंची मदत मिळावी म्हणून ग्वाल्हेरकडे निघाल्या. तात्या टोपे राणी लक्ष्मीबाईंच्या मदतीसाठी निघाले; परंतु ते इंग्रजांच्या वेढ्यात अडकले. ग्वाल्हेरला जाताना इंग्रज सैनिकांनी राणीवर हल्ला केला. राणीभोवती सैनिकांनी कडे केले. झाशीच्या राणीची तलवार विजेसारखी तळपत होती. सतत १५ दिवस हे युद्ध सुरू होते. सैनिकांना परास्त करून ती विजेच्या वेगाने पुढे गेली. तिच्या मागावर असलेल्या ब्रिटिश सैनिकांना हूल देत तर कधी त्यांच्याशी समोरासमोर लढत राणी ग्वाल्हेरला आली. राणी लक्ष्मीबाईंनी ग्वाल्हेरला त्यांच्या विश्वासाच्या एका व्यक्तीकडे दामोदरला सोपवले. दामोदरच्या प्राणाचे रक्षण करण्याची विनंती त्याला केली. त्या व्यक्तीने तसे राणीला वचन दिले. राणीचे उजवे हात खुदाबक्ष युद्धात मारले गेले.

१८ जून १८५८ ला सर व्ह्यू रोज राणीच्या मागावर ग्वाल्हेरपर्यंत पोहोचला. राणीने ग्वाल्हेरला पोहोचेपर्यंत त्यांचा घोडा राजरत्न त्यांचा साथ सोडून गेला. राणीला दुसरा घोडा दिला गेला. आपल्या विश्वासू साथीदारांसोबत राणी भरधाव वेगाने वाटेत येणाऱ्या इंग्रज सैनिकांना कापून काढत पुढे निघाली. राणी दोन्ही हातांनी सपासप तलवार चालवत होती. तिचा मर्दानी पोषाख रक्ताने भिजला होता. ती मर्दानी वेशात होती. वाटेतला एक ओढा ओलांडताना राणीचा घोडा अडला. तो पुढेच जाईना. तेवढ्यात मागून येणाऱ्या एका इंग्रज सैनिकाने राणीवर मागून वार केला. त्याची तलवार राणीच्या कुशीतून आरपार गेली. राणी घोड्यावरून खाली कोसळली. मागून भरवेगात येणारा सर व्ह्यु रोज जखमी राणीला ओलांडून पुढे गेला. पुरुषी वेशात असलेल्या राणीला त्याने ओळखले नाही. राणीबरोबर असलेल्या सहकाऱ्यांनी राणीला जवळच असलेल्या मठात नेले. राणीने तिथे शेवटचा वास सोडला.

१८ जून १८५८ रोजी राणी लक्ष्मीबाई अनंतात विलीन झाली. राजकवी भा. रा. तांबे म्हणतातरे हिंदबांधवा थांब या स्थळी अश्रु दोन ढाळी ही पराक्रमाची ज्योत मावळे इथे झाशीवाली.

ज्योती पुजारी

कथा

मो. बा. देशपांडे

# उत्साहाचा आल्हाददायक काळ

सणासुदीने पुरेपूर भरलेला, उत्सवी काळ सरून नियमित दिनचर्या सुरू झाली असली, तरी हा उत्साहात तीळमात्र खंड पडू न देणारा काळ आहे. हो, आता थंडीचे दिवस सुरू झाले आहेत. हवाहवासा वाटणारा गारवा जाणवू लागला आहे. पावसाची जोरदार बॅटिंग संपल्यानंतर यंदा थंडीची इनिंगही चांगली रंगण्याचा अंदाज व्यक्त होतोय. त्याचबरोबर लग्नसराई सुरू झाल्यामुळे लगबग काही संपणारी नाही. तेव्हा ताजेपणा टिकवून ठेवणाऱ्या या काळाचे सहर्ष स्वागत करायलाच हवे. प्रत्येक ऋतूतील निसर्गसौंदर्य न्याहाळणे, त्यातील वैशिष्ट्ये अनुभवणे आणि त्यानुसार जगण्याच्या शैलीत फरक करणे ही नेहमीच आनंददायी बाब असते. या अर्थाने बघता आताचा काळही संपन्नतेच्या खुणा मिरवणारा आहे.



सृष्टीवर पसरलेली सोनेरी झाक ऐश्वर्यसंपन्न दिसतीये. शेतशिवारात पिकं तयार आहेत. गारवा वाढत असल्यामुळे उठल्यानंतर जमिनीवर पाय टेकवताच अंगभर शिरशिरी येते आणि थंडीची ही लहर नसानसांपर्यंत पोहोचते. बाहेर डोकावून पाहिले असता धुक्याचा दाट थर अगदी खिडकीलगत पोहोचलेला दिसतो. अगदी फर्लांगभर लांबही नजर जाऊ नये इतके दाट हे धुके. सध्या वातावरणातील नानाविध प्रदूषणांमुळे अशा घातक घटकांचे मलिन थर पाहण्याची आपल्याला सवय झाली आहे. मात्र, थंडीच्या सुरुवातीला दिसणारे दाट धुके मनाला सुखावून जाते. पानापानांवर गारठलेले दवबिंदू अवतरलेल्या थंडीची साक्ष देतात. या दाट दुलईला भेदून काही चुकार किरणे जमिनीपर्यंत पोहोचतात; पण ती कमालीची क्षीण असतात. प्रखरता, उष्णता हे शब्दही त्यांच्या आसपास फिरू शकत नाहीत. अगदी डोक्यावर आलेल्या सूर्याचीही प्रखरता जाणवू नये असे हे दिवस. वातावरणात असा बदल जाणवू लागला की हवाहव्याशा काळाच्या आगमनाने मन सुखावते.

पूर्वी दिवाळीच्या सुमारासच कडाक्याची थंडी असायची. पण आता ती थोड्या विलंबाने अवतरते इतकेच. खेरीज तिचे बस्तान बसेपर्यंत दुपारी बऱ्यापैकी उष्माही जाणवतो. मात्र संध्याकाळ पुन्हा एकदा आल्हाददायक होते आणि हिवाळ्याच्या या रम्य काळाचा आनंद घेत, गरमागरम जेवणावर ताव मारत जीव हरवून जातो. वातावरणातील हा बदल आरोग्याला उपकारक असतो. हा गारवा कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी मदत करतो. या वातावरणात पचनसंस्था साथ देत असल्यामुळे आरोग्य सुधारण्यास मदत होते. बाजारामध्ये मिळणाऱ्या ताज्या- रसरशीत भाज्या, रसदार फळे आहारातील रुची वाढवतात. पौष्टिक पदार्थ पोटात गेल्याने कांतीवर तेज दिसू लागते आणि आरोग्याचे धन गवसल्याने वृत्ती आनंदी होतात. म्हणूनच हिवाळा हा अनेकांचा आवडता काळ असतो. थंडीम धला माहोलच उत्सवी असतो. दिवाळी साजरी झाली असली, तरी फटाक्यांचा वास वातावरणात दरवळत असतो.

नव्या कपड्यांची सळसळ कानात घुमत असते. त्यात खास थंडीसाठी म्हणून झालेली स्टाईलिश, ऊबदार कपड्यांची खरेदी आनंदात भर घालत असते. रंगीबेरंगी मफलर, आकर्षक आणि डॅशिंग लूक देणारी जॅकेट्स, शानदार शॉल्स, स्वेटर्स, स्टोल्स आदींच्या वापरामुळे आपला लूकच बदलून जातो. थंडीपासून बचाव करणारी ही ऊबदार प्रावरणे व्यक्तिमत्त्वालाही अनोखी झळाळी देतात. हा बदल अगदी हवाहवासा वाटतो. त्यातच लग्नसराईची लगबग मिसळते आणि बहार उडते. हिवाळ्यातील लग्नकार्ये ही तर अनोखी पर्वणीच ठरते. उन्हाळ्याच्या किचकिचाटात साजऱ्या होणाऱ्या लग्नसमारंभांपेक्षा हिवाळ्यात साजरे होणारे लग्नसमारंभ विशेष खुमासदार ठरतात. आल्हाददायक वातावरणात जमणारी मंडळी समारंभाचा निवांतपणे आनंद लुटू शकतात. म्हणूनच हे दिवस विशेष आनंद देऊन जातात.

आपल्या आरोग्यशास्त्राने हिवाळ्यासाठी खास आहार सांगितला आहे. त्याचे पालन केल्यास वाढत्या थंडीचा त्रास होण्याची तीळमात्र शक्यता उरत नाही. गरमागरम सूप, पानात पडणारी गरम पोळी अथवा भाकरी, या दिवसात आवर्जून केली जाणारी बाजरीची भाकरी, तिळाचा कूट वापरून तयार होणारे रुचकर आणि खमंग पदार्थ, ताटाची डावी बाजू सजवणारी सॅलेड्स, चटकदार उसळी, अन्य तळलेले पदार्थ या सर्वांमुळे थंडीतील भोजनाला एक वेगळीच चव मिळते. एरवी फारसे केले न जाणारे काही पदार्थ खास थंडीतच केले जातात. त्यामुळे जिभेची रुची वाढली नाही तरच नवल. साधी कढी ती काय, पण थंडीत खिचडीसवे गरमागरम कढीची चव अशी काही अफलातून लागते की पोट भरले तरी मन भरत नाही. गरम असो वा तिखट, सगळेच पदार्थ या दिवसात विशेष रुचकर लागतात. थंडी रंगीन आहे. तो रंगांचा महोत्सव आहे. उन्हाळ्यात गडद रंग फारसे खुलून दिसत नाहीत. पावसाळ्यात सगळेच रंग मातकत भासतात, पण थंडीत प्रत्येक रंगाचा सन्मान होतो. कुठलाही भडक कपडा अंगावर छान खुलतो. तो मिरवताना संकोच वाटत नाही. हा रंगांचा महोत्सव लग्नाच्या मंडपात सजतो, फिरायला बाहेर पडणाऱ्या भटक्यांच्या अंगावर शोभतो, गॅदरिंगच्या निमित्ताने स्टेजवर मिरवणाऱ्या लहानग्यांच्या शरीरावर झळकतो आणि या दिवसात पार पडणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांना होणाऱ्या गर्दीतही झळकतो. रंगांची ही नक्षी, हे सामर्थ्य चित्तवृत्तीवर सकारात्मक परिणाम केल्याशिवाय राहात नाही. थंडी आणि व्यायाम हेही नित्याचे समीकरण आहे. एक प्रकारे हा शारीरिक श्रमासाठी, व्यायामासाठी प्रोत्साहित करणारा काळ आहे, असेही आपण म्हणू शकतो. आता कडक उन्हाची तलखी नाही की पावसाची रिपरिप नाही. अशा मोकळ्याढाकळ्या वातावरणात व्यायाम करण्याचा आनंदच काही वेगळा. विशेष म्हणजे दिवस लहान आणि रात्र मोठी असल्याने शरीराला पुरेशी विश्रांती मिळते. ऊबदार दुलईत शांत झोप मिळते आणि सकाळी शरीर प्रसन्न मनाने व्यायामाला सिद्ध होते. मनाची तयारी नसताना शरीराची साथ मिळवणे हे खूप अवघड काम आहे. पण थंडीमध्ये मनाची अवस्था चांगली राहात असल्यामुळे शरीराची ऊर्जा टिकून राहण्यास मदत होते हा मुख्य फायदा आहे. म्हणूनच थंडी हा अनेकांचा मनपसंत ऋतू ठरतो. एकूणच दिवाळीनंतरचे हे दिवस तणावरहित अवस्थेची अनुभूती देतात. (पान ६ वर)

**मराठी संतसाहित्याविश्वामध्ये 'आधुनिक महिपती' म्हणून संतकवी दासगणू यांना ओळखले जाते. संत कथामृत, भक्तलिलामृत, भक्तीसारामृत या संतचिरत्रपर आख्यान संग्रहांसह सुमारे एक लाख ओवी, एवढे प्रचंड साहित्य त्यांच्या नावावर आहे. मराठीतील सर्वाधिक खपाच्या 'श्री गजानन विजय' पोथीचे लेखक म्हणून त्यांचे नाव घरोघर भाविकांमध्ये सुपरिचित आहे. ते रसाळ कीर्तनकार म्हणून अधिक प्रसिद्ध होते. शिर्डीच्या साईबाबा संस्थानच्या साई मंदिरात सलग ४० वर्षे रामनवमी उत्सवात 'श्रीरामजन्माचे' कीर्तन करण्याच्या सेवेचा विक्रम त्यांच्या नावावर आहे.**

लेखांक ४६

# संतकवी दासगणूंच्या साहित्यातील श्रीरामजन्म आख्यान

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५

अयोध्येच्या ब्रिटीश पोलीस खात्यातील एक पोलीस, ते शाहीर आणि शाहीर ते संतकवी असा दासगणूंचा जीवनविकास थक्क करणारा आहे. महाराष्ट्रातील थोर विचारवंत तत्त्वचिंतक कीर्तनकार (वैद्य) प्राचार्य अ. दा. आठवले (स्वामी वरदानंद भारती) दासगणूमहाराजांचे शिष्य होते.

**होऊनिया निष्काम, ध्यावा जानकीजीवन राम।**
**दासगणू म्हणे राम जपावा, देईल तोचि आराम।**

संतकवी दासगणू (इ.स.१८६८ ते १९६२) हे महाराष्ट्रातील आधुनिक संत परंपरेतील अग्रणी संतकवी व कीर्तनकार म्हणून सर्वपरिचित आहेत. त्यांचे मराठी संतसाहित्यातील वैविध्यपूर्ण विपुल योगदान अपूर्व व ऐतिहासिक आहे. त्यांच्या समग्र वाड्मयाचे १० खंड प्रकाशित असून त्यांची कीर्तनोपयोगी संतचरित्रपर आख्याने कथा कीर्तन करणाऱ्या बहुसंख्य कीर्तनकारांची पहिली पसंती असते. संत दासगणुंची कीर्तने म्हणजे ज्ञान,भक्ती, आणि सुरेल श्रवणीय पदांची मेजवानी असे.

थोर संत साईबाबांपासून साहित्यसम्राट न. चि. केळकर, थोर विचारवंत द. वा. पोतदार, प्राचार्य सोनोपंत दांडेकरांपर्यंत अनेक थोर मोठे श्रोते दासगणूंच्या कीर्तनाचे भोक्ते व प्रशंसक होते. सरदार धुरंधर, सरदार तुकोजी (दु.) होळकर, ग्वाल्हेरचे शिंदे अशा अनेक सरदार व संस्थानिकांच्या राजवाड्यांमध्ये दासगणूंची अनेक कीर्तने झालेली आहेत. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे दासगणूंचा कमालीचा निस्पृहपणा, त्यांच्या अंगी असलेल्या गुणसंपदेचा मेरूमणी होता. ते कीर्तनाची एक पै देखिल बिदागी, मानधन घेत नव्हते. त्यांच्या दृष्टिने कीर्तन ही ईश्वराची उपासना आणि भक्ती प्रचाराचे, प्रबोधनाचे प्रभावी साधन होते.

संतकवी 'दासगणू' यांचे पूर्ण नाव गणेश दत्तात्रय सहस्त्रबुद्धे आहे. त्यांचा जन्म सध्याच्या नव नामांतरीत अहिल्यानगर जिल्ह्यात 'अकोळनेर' येथे १८६८ साली झाला. त्यांना प्रदीर्घ ९४ वर्षांचे आयुष्य, भक्ती जीवन लाभले. त्यांचे काका हे ब्रिटीश प्रशासन व्यवस्थेत, त्याकाळी मामलेदार होते. दासगणूंचे 'सहस्त्रबुद्धे' हे घराणे मूळचे कोकणातील रत्नागिरी जवळील 'कोतवडे' येथील असून नोकरी निमित्त



अनेक पिढ्या अहिल्यानगर जिल्ह्यात स्थायिक झालेले होते. दासगणूंचे शिक्षण फारसे झालेले नव्हते. त्यांचा स्वभाव बालपणापासून अत्यंत स्वाभिमानी होता म्हणून ते स्वेच्छेने पोलीस दलात भरती झाले (बक्कल नं.७२७) होते. त्यांना शाहिरी काव्याची उपजत प्रेरणा झाली व त्यांच्या लावण्या, त्याकाळचे एकमेव करमणूकीचे माध्यम असलेल्या 'तमाशा' कलावंतांची प्रथम पसंती होत्या. सारे तमासगीर कलाकार, वादक, पोलीस गणपतरावांना (दासगणूंना) आपले 'अन्नदाता' मानत होते. अशा शृंगारिक लावणीकार-गणपतरावांना त्यांचे गुरू वामनबुवा आणि शिर्डीचे साईबाबा यांनी अध्यात्मिक संतचरित्रकार बनवले. साईबाबांच्या उपदेशाने त्यांच्यात एवढे विलक्षण परिवर्तन झाले की, त्यांनी ब्रिटीश पोलीस खात्याची चाकरी सोडली, एवढेच नव्हे तर 'नेवासे' येथे शेवटचा 'तमाशा' करून आपला 'डफ' सर्वांसमक्ष फोडून टाकला. सर्व लावण्या शृंगारिककाव्य जाळून टाकले. साईबाबांच्या कृपेने 'कीर्तनकार' व 'संतचरित्रकार'असा त्यांचा नावलौकिक झाला. स्वतः साईबाबांनी इ.स.१९१४ साली दासगणूंना द्वारकामाई मशिदीत रामनवमी उत्सवानिमित्त 'रामजन्माचे कीर्तन करण्याची प्रथम संधी दिली. एवढेच नव्हे तर शिर्डीतील संपूर्ण रामनवमी कीर्तनची कायमची जबाबदारी दिली. १९१४ ते २०२४ अशी गेली ११० वर्षे रामजन्म कीर्तनाची सेवा परंपरेने दासगणू शिष्यांद्वारे निष्ठेने- भक्तीभावाने अविरत अखंड चालू आहे. या रामजन्मोत्सवासाठी दासगणूंनी स्वतः 'रामजन्माचे आख्यान' लिहिलेले आहे. श्लोक, आर्या, ओव्या, अभंग, दिंडी, साकी, पदे अशा विविधतेने दासगणूंचे हे रामजन्म आख्यान संपन्न आहे. या रामजन्म कीर्तन आख्यानांशिवाय दासगणूंनी मराठी आर्या छंदामध्ये 'अध्यात्म रामायण' लिहिलेले आहे पण ते अप्रकाशित आहे. तसेच त्यांची राम भक्तीपर अनेक पदे प्रसिद्ध आहेत.

'माझा तू धनी श्रीरामा', 'रामकथारस प्याले भक्त तुझे अनंत आजवरी' असा भाव व्यक्त करीत दासगणूमहाराज खुद्द रामरायांनाच विनवणी करतात की- 'कृपा करूनी मजकरवी रामकथा रसाळ वदवावी.' संतकवी दासगणू स्वतः काव्य रचून, तेच कथा कीर्तनात म्हणत होते. सरस्वती त्यांना सदैव प्रसन्न होती. ते सर्व पंथ संप्रदाय समभावी, समन्वयी होते. त्यांच्या रामकथा आख्यानासह सर्व काव्यामध्ये त्यांच्या हा व्यापक, उदार, सर्व समन्वयी विचारांचे दर्शन घडते. दासगणूंनी श्रीराम जन्म आख्यानाची सुरूवाते रामजन्म पूर्व पौराणिक कथेने केलेली आहे. भगवान विष्णुंचे अहंकारी द्वारपाल- जय आणि विजय यांना राक्षसकुळात रावण- कुंभकर्ण म्हणून जन्म घेण्याचा शाप सनतकुमार शाप देतात असा प्रारंभ करून राम जन्माच्या आनंद सोहळ्याने या मंगलकथेची समाप्ती होते. दासगणूंनी आपले रामजन्म आख्यान साहित्यातील नवरसांनी खुलवलेले आहे.

**ते हे रावण कुंभकर्ण मातले महीतळी पूर्ण।**
**देव बंदीत घालून यज्ञ याग विध्वंसिले।।**

असे वर्णन करून या असूरांच्या नाशासाठी व देवांच्या विमोचनासाठी मी जन्म घेत आहे. अशी पार्श्वभूमी कथन करीत, गर्भवती राणी कौसलेच्या डोहाळ्यांचे वर्णन करताना दासगणू म्हणतात-

**'साह्या करूनी वानरास, रावणाप्रती।**
**वधिन कुंभकर्ण कुठे दावा निश्चिती।**
**त्राटिकेस मर्दुनिया वधिन वालीला।**
**निर्दाळुनी असूर, मुक्त करीन साधुला।।'**

कौसल्येच्या तोंडी समग्र राम अवतार कार्याची संक्षेपी उद्घोष केलेला आहे.

महाराष्ट्रात आज भव्य दिव्य उत्सवी स्वरूपात जे प्रमुख रामनवमी उत्सव साजरे होतात, त्यात शिर्डीच्या साईबाबांनी इ.स.१९११ साली सुरू केलेला रामनवमी उत्सव मुख्य असून या उत्सवात दासगणू परंपरेने होणारे 'रामजन्म कीर्तन' हा मुख्य सोहळा असतो. 'होऊनिया निष्काम ध्यावा जानकीजीवन राम, साईराम।' हे केवळ पद नसून दासगणूंच्या समग्र निष्काम जीवन सूत्राचे दर्शन आहे.

# शब्दाच्या जादूत रमलेला जादूगार



अमृतकुंभ
प्रा. वसंत गिरी
भ्र. ९०११२२९२३२

आज एकविसाव्या शतकात एखाद्या बी. ए. पदवीधारकाला आपल्या पदवीचा उल्लेख करण्यास संकोच वाटावा. ऐकणार्याच्या दृष्टीने तर तो अत्यंत उपेक्षेचा विषय होय. बी. ए. केले म्हणजे नेमके काय दीवे लावले? एवढ्या प्रमाणात त्या पदवीची आणि पदवीधारकाची उपेक्षा. ज्याची अशी उपेक्षा होते. त्यांनी भावी यशाविषयी काय अपेक्षा बाळगाव्यात. म्हणजे काय, तर जवळपास तो सर्व शैक्षणिक उद्योग निरर्थक ठरवून मोकळे होणारे विद्वान तर आज प्रचंड आहेतच पण ती पदवी प्राप्त करणाऱ्या पदवीधारकात तरी कोणता आणि कसला आत्मविश्वास निर्माण होतो? हे सापडणे शक्य आहे का? याचा शोध लावावा लागेल.

१९४४ ला लक्ष्मणराव देशपांडे यांचे चिरंजीव पुरुषोत्तम बी. ए. झाले. त्यानंतर अल्प कालावधीतच मुंबईतील ओरिएंट स्कूल दादर येथे शिक्षक म्हणून ते कार्यरत झाले. अध्यापन कार्यात व्यस्त होण्याबरोबरच सांस्कृतिक कलाकृतीचा मस्त आनंद घेणे हे तर त्यांच्या जीवनातील परमोच्च समाधान होते. मनुष्य जीवन पुलकित करणारे पुलं हे खरे समृद्ध मानवी जीवनाचे शिल्पकार. शाळेच्या स्नेहसंमेलना निमित्ताने त्यांनी मामा वरेरकर लिखित 'सत्तेचे गुलाम' हे नाटक बसविले. त्यातील नायक 'कान्होबा' पुल झाले होते. तर 'क्षमा' या नायिकेची भूमिका त्याच शाळेतील एक रुपगर्विता सुनिता ठाकूर मॅडम सादर करत होत्या. एका प्रसंगात नायक नायिकेच्या पिताश्रीकडे जाऊन हात जोडून म्हणतो, मी तुमची क्षमा मागायला आलो. नायकाने नायिकेच्या पिताश्रींची क्षमा मागून त्यांची क्षमा आपल्या पदरात पाडून घेतली. 'सत्तेचे गुलाम'मधील हा कान्होबा आणि क्षमा आपल्या प्रत्यक्ष जीवनात प्रेमाचे गुलाम झाले. पुल आणि सुनिताबाई यांनी सहजीवनाचा आनंद घ्यायचा असे निश्चत केले.

उभयतांचे सावधान ठरले. रत्नागिरीला ठाकुर वकीलाचे कन्यारत्न सुनिता यांच्याशी नोंदणी पद्धतीने झालेला विवाह 'भाई, व्यक्ती आणि वल्ली' चित्रपटात पाहिला की पुलंचा नोंदणी विवाह कसा झाला असेल? याची कल्पना येते.

दुसऱ्या दिवशी पुलंचा एक परमस्नेही त्यांच्या लग्नासाठी परगाववरुन धावपळ करत दिलेल्या पत्यावर पोहचला. त्याला लग्नाची काहिच तयारी दिसत नव्हती. तो थोडा चकित झाला. आपण लग्नासाठी आलोय हे सांगावे किंवा नाही? अशी त्याची अवस्था पाहून त्याच्या त्या संभ्रमित अवस्थेचे उत्तर पुलंनी दिले. अरे, मित्रा काल वेळ मिळाला म्हणून कालच लग्न उरकून टाकले. पुलंचा हा परिवर्तनवाद त्यालाही क्षणभर मानवणारा नव्हता. पण तो फारसे काही न बोलता पुढे पुलं काय म्हणतात? त्याचीच वाट पाहू लागला. पुलंचे विचार तो जाणून होता. त्यामुळे त्याला पुलंच्या विचारांचा आणि त्यांच्या निर्णयाचा अभिमानच वाटला. मात्र, त्याच्या चेहऱ्यावरील नाराजी पाहून पुलं म्हणाले, आज रात्री आपण स्वरगंगेचा आनंद घेवूत. रात्री पुलं आणि उपस्थितांच्या आवडत्या गाण्याचा कार्यक्रम झाला. स्वरगंगेत सर्व उपस्थित न्हावून निघाले. पुलंचे पहिले नाटक 'तुका म्हणे आता' या नाटकाचे तीन प्रयोग पुण्यनगरीच्या भानुविलास नाट्यगृहात आयोजित केले होते. नाट्यगृहाचे मालक अभ्यंकर व पुलं बाल्कनीत बसून आनंद घेत होते. छतावरील टिनाच्या छिद्रातून सूर्यरकिरण आत आले. अक्षरशः भानूचा विलास सुरु झाला होता. तो पाहून पुलंची समयसूचकता जागृत झाली. लगेच ते अभ्यंकरांना म्हणाले, नाट्यगृहाचे नाव 'भानुविलास' का ठेवले? याचे उत्तर मला मिळाले. अभ्यंकरांनी सुद्धा खेळकरपणे विनोदाचा आस्वाद घेतला आणि भानूचा विलास उत्तम रंगला. नाटकात वसंताचा त्रिवेणी संगम होता. शिंदे, सबनीस, देशपांडे इत्यादी. वसंत सबनीस शिवछत्रपती उभे करणार होते. त्यांची फजिती शब्दात सांगता येत नव्हती, अशी झाली. त्यांना उभे राहून संवाद करणे शक्य नव्हते. त्यामुळे ते बसून बोलू लागले. ते बसून बोलत असल्यामुळे नाटक चालणे शक्य नव्हते. शेवटी नाटकाने बसण्यासाठी सबनीसांना साथ दिली. पुलंची मेहनत येणेप्रमाणे वाया गेली. दुसऱ्या दिवशीही फारसे कोणी फिरकले नाही. (पान ६ वर)

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

(भाग २३)


थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

रवींद्रनाथांच्या कथांचा आढावा आपण घेत आहोत. मागील २१ आणि २२ या भागात आपण त्यांच्या काही लघुकथा पाहिल्या. आजच्या या भागात त्यांची एक दीर्घकथा किंवा जिला लघु कादंबरी असेही म्हणता येईल, अशा नष्टनीड कथेबद्दल जाणून घेण्याचा प्रयत्न करू या...

नष्टनीड ही टागोरांची अतिशय लोकप्रिय कथा आहे. या कादंबरीवर सत्यजित रे यांनी 'चारुलता' या नावाचा सुंदर चित्रपट काढला आहे. १९६४ मध्ये हा चित्रपट आला. या चित्रपटामध्ये तत्कालीन बंगालमधील वातावरण बघायला मिळते. अनेक कलात्मक चित्रपटांची निर्मिती करणार्या सत्यजित रे यांचा हा स्वतःचा अतिशय आवडता असा चित्रपट. या चित्रपटाचे कथानक थोडक्यात असे आहे. भूपती हा एक लिहिण्याची आवड असलेला पत्रकार आहे. पण साहित्यविषयक लेखन त्याला आवडत नाही राजकीय घटनांमध्ये त्याला रस आहे. तो स्वतःचे इंग्रजी वर्तमानपत्र सुरू करतो. खरे तर भूपती हा गर्भश्रीमंत आहे आणि त्याला काही कामधंदा करण्याची आवश्यकता नाही. परंतु आपली आवड म्हणून तो ही पत्रकारिता करीत असतो. या भूपतीचे लग्न चारुलता नावाच्या एका मुलीबरोबर झाले आहे. भूपती आपल्या पत्रकारितेला सुरुवात करतो तेव्हा चारुलता ही नुकतीच यौवनात पदार्पण करीत असते. परंतु आपल्याच नादात असलेल्या या भूपतीला त्याची खबरबात नाही. आपल्या पत्नीच्या आपल्याकडून काही अपेक्षा असतील याचीही त्याला गंधवार्ता नाही.

नात्यातीलच कोणीतरी जेष्ठ व्यक्ती त्याला चारुलतेने आता तारुण्यात पदार्पण केले आहे आणि तू तिच्याकडे लक्ष दे. ती घरी एकटीच असते असे सुचवले. पण त्यानंतरही नेमके काय करायचे हे त्याला कळत नाही किंबहुना त्या गोष्टीकडे तो जाणूनबुजून दुर्लक्ष करतो. त्या भव्य असलेल्या घरामध्ये चारुलता आपला वेळ कसातरी घालवत असते. ती बुद्धिमान आहे तिला वाचनाची आणि लेखनाचीही आवड आहे. परंतु तिच्याकडे लक्ष देणारं कोणी नाही. ती घरी एकटीच असते हे जेव्हा भूपतीच्या लक्षात येतं तेव्हा तो चारुलतेच्या भावाला त्याच्या पत्नीला म्हणजे मंदाला तिथे घेऊन येण्यास सांगतो. खरे तर चारुलतेच्या या तारुण्याच्या काळात तिला गरज आहे ती तिच्या पतीच्या सहवासाची आणि प्रेमाची. परंतु भूपती त्यासाठी अगदी वेगळाच उपाय योजतो. खरं तर हा उपाय मूर्खपणाचा आहे. त्याला वाटते आपल्या मेहुण्याच्या पत्नीची म्हणजे मंदाची चारुलतेला सोबत होईल आणि तिला कंटाळवाणे होणार नाही. ज्या उद्देशाने भूपतीने मंदाला तिथे आणण्यास सांगितले होते तो उद्देश तर बाजूलाच राहिला परंतु कथानकाने एक वेगळेच वळण घेतले असे आपल्याला दिसते.

भूपतीचा एक आतेभाऊ त्याच्याकडे शिक्षणासाठी येऊन राहिलेला असतो. त्याचे नाव अमल. हा अमल साधारणपणे चारुलतेच्या वयाचा असतो. त्याचे कॉलेजात शिक्षण सुरू असते. हा अमल तिला लिहिण्या वाचण्यात मदत करतो. तिला काही गोष्टी शिकवतो परंतु त्याची गुरुदक्षिणा म्हणून तिच्याकडून तो आपले लाड पुरवून घेतो. त्या दोघांमध्ये मैत्रीचे एक अनोखे नाते निर्माण होते. अमलने काही लिहिलेले तिला वाचून दाखवावे, तिने लिहिलेले त्याने वाचावे असे त्यांचे रोज सुरू होते. त्या दोघांचे एक वेगळे जग निर्माण झाले. या जगात त्या दोघांव्यतिरिक्त तिसर्या व्यक्तीला प्रवेश नव्हता.



भूपतीच्या घराच्या मागील बाजूस थोडीशी पडीक जमीन होती. या जमिनीवर एक करमळाच झाड होतं. या जमिनीवर आपण एक सुंदर बाग निर्माण करावी अशी स्वप्न चारुलता आणि अमल पाहत होते. त्यासाठी त्यांचं वेगवेगळं प्लॅनिंग सुरू असायच. त्या दोघांच्या त्या झाडाखाली बसून गप्पा सुरू असायच्या. आपण इथे सुंदर बाग निर्माण करून भूपतीला चकित करायचं असाही त्यांचा विचार होता. नंतर काही कारणाने हा विचार बाजूला पडला आणि त्या दोघांनी आपल्या लेखनाचा एक अंक सुरू करायचा आणि त्यात लिहायचे असे ठरवले. अर्थात हा अंक काल्पनिकच होता. दोघेही एकमेकांना आपले लेखन वाचून दाखवत परंतु एकदा दोघांमधीलच असणारे हे लेखन अमलने बाहेर प्रसिद्ध करायला सुरूवात केली. त्याचबरोबर चारुलतेने लिहिलेले देखील त्याने बाहेर छापून आणले आणि त्या दोघांमध्ये जो अलिखित करार झाला होता तो मोडला. इथेच त्यांच्या संबंधातील पहिली ठिणगी पडली.

हळूहळू अमल बदलू लागला. आपले लेखन तो चारुलतेला वाचून दाखवण्याऐवजी सामान्य कुवतीच्या मंदाला वाचून दाखवू लागला. चारुलतेला चिडवण्यात त्याला आनंद वाटू लागला. तशातच समीक्षकांनी त्याला धक्का दिला. समीक्षकांनी त्याच्या लेखनापेक्षा चारुलतेचे लेखन उजवे आहे असा शेरा दिला. त्यामुळे अमल दुखावला गेला आणि चारुलता आणि अमल यांच्यातील गैरसमजाची दरी रुंदावत गेली. याच दरम्यान भूपतीचा व्यवसाय तोट्यात येऊ लागला. परंतु चारूबरोबर त्याला संवाद साधता येत नव्हता किंवा तिलाही त्याच्याबरोबर मोकळेपणाने वागता बोलता येत नव्हते अशा प्रकारचं वातावरण घरात निर्माण झालं होतं. दोघंही आपलं नवरा- बायकोचे नातं काहीशा औपचारिकपणेच निभावत होते.

अमलला आपल्या चुकांची जाणीव आता होऊ लागली होती. आपल्या वागण्याबद्दल गांभीर्याने तो विचार करू लागला होता आणि त्यातूनच त्याने तिथून दूर जाण्याचा निर्णय घेतला. संधी मिळताच तो परदेशात निघून गेला. जाताना त्याने चारुलतेचा मोकळेपणाने निरोपही घेतला नाही. त्याचे असे जाणे चारुलतेच्या मनाला खूप लागले. ती सतत त्याचाच विचार करू लागली. त्याचवेळी तिचे संस्कारी मन आपण आपल्या पती कर्तव्यात कुठेही कमी पडू नये म्हणूनही धडपडत होते. भूपतीला सुद्धा आपण आपल्या पतीकर्तव्यात कमी पडलो याची जाणीव होऊ लागली होती. पण आता सगळीच गडबड झाली होती.

दोघांच्याही वागण्या बोलण्यात अंतर पडले होते. एक घरटे उध्वस्त झाले होते. एकमेकांना समजून घेऊन दुसरे घरटे उभे करण्याची दोघांचीही धडपड केविलवाणी ठरत होती. चारुने आता आपल्या मनाचा एक वेगळाच कप्पा उघडला होता. त्यातील आनंदात ती रममाण होऊ लागली होती. तिला अंमल बरोबर घालवलेले क्षण आठवत होते. तो आपला निरोप न घेता असा अचानक निघून गेला त्याचे तिला वाईट वाटत होते. त्याने आपल्या जाण्याबद्दल तिला मोकळेपणाने सांगितले असते तर तिला त्याचे काही वाटले नसते. तिची अवस्था उदासवाणी झाली. कामात तिच्या चुका होऊ लागल्या.

भूपतीलाही आता या घरात राहणे नकोसे वाटू लागले. घरातील जीवनरस जणू आटून गेला होता. संबंधात एक प्रकारचा शुष्कपणा आला होता. मैसूरला एक नवीन वर्तमानपत्र सुरू होणार होते. तिकडे संपादक म्हणून जाण्याचे त्याने ठरवले. चारूला हे कळल्यानंतर तिने त्याला विचारले की आता परत कधी येणार? तेव्हा तो म्हणाला, ' तुला जर एकटं वाटलं तर कळव. मी येईन.' अशा रीतीने एक घरटं, एक संसार उध्वस्त झाला होता. या कथेमधील हा विवाहबाह्य संबंधांचा विषय टागोरांनी इतरही काही कथा कादंबऱ्यांमधून हाताळला आहे. आज आपल्याला विवाहबाह्य संबंधांचे काही विशेष वाटत नाही.

आज तर अनेक दूरदर्शन मालिका आणि चित्रपटांमधून या विषयाचेच कथानक दाखवले जाते. परंतु त्या काळात टागोरांनी या विषयाला हात घातला. अर्थातच त्यावेळी त्यामुळे बरीच खळबळ माजली. परंतु यातून काळाच्या पुढे असणारी टागोरांची दूरदृष्टी आपल्याला दिसते. नष्टनीड या कथेतील सर्वच माणसे सुसंस्कृत आणि समंजस आहेत. ती कोणताही टोकाचा निर्णय घेताना आपल्याला दिसत नाहीत. त्यांनी आहे त्या परिस्थितीचा स्वीकार सामंजस्याने केलेला दिसतो आणि त्यातून मार्ग काढण्यासाठी ते शांतपणे बाजूला होतानाही दिसतात.

खरे तर या कथेचा शेवट वेगळ्या प्रकारेही टागोरांना करता आला असता. कथेतील कोणत्यातरी एका पात्राचा शेवट किंवा मृत्यू दाखवता आला असता. भूपतीला आपला नवरेपणा गाजवून बायकोला वठणीवर आणण्याचा प्रयत्न करताना दाखवता आले असते किंवा चारुलतेला आयुष्यभर पश्चातापाच्या आगीत जळताना दाखवता आले असते. परंतु यापैकी काहीच त्यांनी केले नाही. टागोरांचे कथाकार म्हणून वैशिष्ट्य हे की त्यांच्या कथांमध्ये माणसे ही माणूस म्हणून वागतात. ती पुरुष किंवा स्त्री म्हणून वागत नाहीत. माणसांच्या वागण्याबोलण्यातील आणि विचारातील नैसर्गिकता, सहजता त्यांच्या कथांमध्ये आपल्याला आढळते. या कथेत भूपतीचे दूर जाणे हाच त्या क्षणी एक योग्य पर्याय होता. जाताना ती त्याला विचारते की परत केव्हा येणार? तेव्हा तो उत्तरतो, ' तुला एकटं एकटं वाटेल तेव्हा मला पत्र लिही. मी निघून येईन. 'याचा अर्थ असा की दोघांनीही आपल्या संबंधातील सर्व रस्ते कायमस्वरूपी बंद केलेले नाहीत, एकमेकांवर कोणतेही आरोप केले नाहीत आणि आहे ती परिस्थिती शांतपणे स्वीकारली आहे. त्यामुळेच ही कथा अक्षर वाड्मयात गणली गेली आहे.

आपल्या काही कथांमध्ये टागोरांनी विवाहबाह्य संबंध दाखवले परंतु ते दाखवताना कुठेही अश्लीलता किंवा शृंगारिक वर्णने आलेली नाहीत. हे त्यांचे कथाकार म्हणून कौशल्य आहे.

त्यांच्या कथांमधील पात्रे आपल्या वागण्या बोलण्यातून जीवनाच्या पुढच्या टप्प्याला नैसर्गिकपणे सामोरे जात असतात त्यांच्या संबंधाबद्दल चांगले वाईट योग्य किंवा अयोग्य नैतिक किंवा अनैतिक अशा प्रकारचा कोणताही शेरा किंवा शिक्षा टागोर मारत नाहीत त्या संबंधात गुंतलेल्या व्यक्तींची जी होरपळ होताना दाखवली आहे ती त्यांच्या स्वतःच्या वागणुकीमुळे झाली आहे आणि त्या होरपळीच्या यातना ती पात्रे मूकपणे सहन करताना दिसतात. त्यांच्या इतर कथांमध्ये असणारी निसर्गाची पार्श्वभूमी देखील या सगळ्या कथांना विलक्षण परिणामकारकपणे लाभली आहे.

# ग्रहसंकेत

## (रविवार, २४ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२४)

**नारायण जगन्नाथ कारंजकर,** ज्योतिष भास्कर

ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, २४ नोव्हेंबर** - गुरु तेगबहादूर हुतात्मा दिन, नवदुर्गा जत्रा मडकई ✻ **सोमवार, २५ नोव्हेंबर** - श्री महावीर दीक्षोत्सव (जैन) ✻ **मंगळवार, २६ नोव्हेंबर** - उत्पत्ती एकादशी, आळंदी व निर्मळ यात्रा, संविधान दिन ✻ **बुधवार, २७ नोव्हेंबर** - तिथीवासर (स.१०:२७ पर्यंत) देवी माऊली जत्रोत्सव शिरोडा ✻ **गुरुवार, २८ नोव्हेंबर** - प्रदोष, ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी सोहळा आळंदी, महात्मा फुले पुण्यतिथी, दासगणू महाराज पुण्यतिथी पंढरपूर, कार्तिक काला यात्रा आपेगाव ✻ **शुक्रवार, २९ नोव्हेंबर** - शिवरात्री ✻ **शनिवार, ३० नोव्हेंबर**- दर्श अमावास्या सकाळी (१०.३० नंतर), श्री दानम्मादेवी यात्रा गुड्डापूर, कृष्णाजी खिस्ते महाराज पुण्यतिथी पंढरपूर.

**मुहूर्त:-** ✻ **साखरपूडा-** २६, २७ नोव्हेंबर ✻ **बारसे-** २५ नोव्हेंबर (१२पर्यंत), २७ नोव्हेंबर ✻**जावळ-** २७ नोव्हेंबर ✻ **गृहप्रवेश-** २५ (१२ पर्यंत), २७ नोव्हेंबर.

### मेष :- मनासारख्या घटना

आयुष्यातली प्रत्येक सकाळ रोज काही तरी नवीन करण्याची प्रेरणा देते. रविवारी चंद्राचा बुध, गुरूशी होणारा केंद्रयोग आर्थिक प्रगती करणारा आहे. नोकरी, व्यवसायात मनासारख्या घटना घडतील, नव्या कामांना हुरूप येईल. नव्या पर्वात पदार्पण करू शकाल. अपेक्षित घटना घडल्याने समाधान लाभेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. २६,२७

### वृषभ:- सुसंधी लाभतील

ओळखीतून मिळालेली कामं थोडे वेळ टिकते पण कामातून झालेली ओळख जन्मभर राहते. राशीतील गुरूचा चंद्राशी, बुधाशी होणारा केंद्रयोग सुख स्वास्थ वाढविणारा राहिल. नव्या कामांना गती मिळेल. सुसंधीचा लाभ उठवावा. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. २७

### मिथुन:- अपेक्षित घटना

चांगली माणसे योगायोगाने भेटतात आणि हे योगायोग प्रत्येकाच्या आयुष्यात घडत नाहीत. चंद्राशी शुभ ग्रहांशी होणारा केंद्रयोग सुखस्वास्थ मिळवून देणारा आहे. योजलेली कामे मनासारखी होतील. अडचणीवर मात कराल. खर्च वाढले तरी प्राप्तीचे प्रमाणही तसे चांगले राहिल. महत्त्वाच्या घटना घडतील. स्पर्धांमध्ये यश मिळेल. नवे विचार मार्गी लावता येतील. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. २६. २७

### कर्क:- मतभेद टाळावेत

कोणाला नाराज करून अथवा कोणावर नाराज होऊन जगू नका. जीवन क्षणभंगूर आहे. राशीत मंगळ, अष्टमात शनि त्यामुळे प्रतिकुलतेशी सामना करावा लागेल. अपेक्षित संधी लाभतील. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. नव्या विचारांना विचाराने स्वीकारावे. मतभेदाचे प्रसंग टाळावेत. अडचणीतून मार्ग निघेल. दगदग टाळावी. शुभ ता. २७

### सिंह:- कला गुणांचा विकास

पैश्यापासून आलेली खुषी अहंकार निर्माण करेल तर मनाची खुषी संस्कारातून निर्माण होते. बुध, गुरूचा चंद्राशी होणारा केंद्रयोग सुखस्वास्थ वाढविणारा आहे. नव्या कामांना गती मिळेल. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. प्रवासाचे योग आहेत. नव्या संधी लाभतील. अडचणींवर मात कराल. कला गुणांचा विकास होईल. प्रगतीच्या घटना. शुभ ता. २६

### कन्या:- समस्यांवर मात कराल

मनुष्य डिप्रेशनमध्ये तेव्हाच जातो, जेव्हा त्याने कमवलेली गोष्ट त्याच्या डोळ्यासमोर नष्ट होते. मग तो पैसा असो की नातं! भाग्यातील गुरू चंद्राबरोबर बुधाशी केंद्रयोग करणारा आहे. नव्या गोष्टींची सुरूवात आवडीने कराल. सुखस्वास्थ लाभेल. कौटुंबिक जीवनात अपेक्षित प्रगती साधता येईल. नव्या ओळखी लाभप्रद ठरतील. हुशारीने विविध समस्यांवर मात कराल. शुभ ता. २७

### तुला:- सुसंधी लाभतील

संसारात सगळ्यात जास्त जखमा आपलेच लोक करतात. त्या सहनही होत नाहीत, अथवा कोणास सांगताही येत नाहीत. बुध, गुरूशी चंद्राचा होणारा केंद्रयोग आर्थिक प्रगती करणारा आहे. नव्या कामांना गती मिळेल. अडचणींवर मात कराल. सुसंधी लाभतील. अपेक्षित कामे होतील. शुभ ता. २६, २७

### वृश्चिक:- नव्या कामांना गती

कदर करा पत्नीची जी एक साडी पसंत करायला पूर्ण दुकान पालथ करते, तिने तुम्हाला पसंत केलंय. समाधानी असणे हे जीवनात मोठे सुख असते. मनामध्ये जे जे आहे ते ते होत जाईल. नव्या विचारांना चालना मिळेल. नव्या कामांना गती मिळेल. सुसंधींचा लाभ उठवावा. हाती घेतलेली कामे मनासारखी होतील. अपेक्षित कामे होतील. शुभ ता. २७

### धनु:- ओळखी विचाराने स्विकाराव्यात

खुप माणसांची स्वप्ने या एका विचाराने अपूर्ण राहतात. ते म्हणजे लोक काय म्हणतील? राशी स्वामी गुरूचा चंद्राशी होणारा केंद्रयोग आर्थिक प्रगती करणारा आहे. नव्या कामांना गती मिळेल. सुखस्वास्थ लाभेल. फार दगदग करू नका. नव्या ओळखी विचाराने स्विकाराव्यात. अडचणीवर मात कराल. नव्या संधी लाभतील. प्रगती घडेल. शुभ ता. २६

### मकर:- वादाचे प्रसंग टाळावेत

सूर्य हळूहळू उगवतो व प्रकाशित करतो. हळूहळू जो पुढे जातो तो एक दिवस आपले नशिब बदलू शकतो. भागीदारीच्या व्यवसायात वादाचे प्रसंग टाळावेत. नव्या संधी लाभतील. आर्थिक प्रगती चिकाटीने होईल. यांत्रिक क्षेत्र, राजकारण यावर प्रभाव पाडू शकाल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. प्रगती वाढेल. शुभ ता. २७

### कुंभ:- शुभ घटना

सर्वांना एकत्र ठेवण्याची ताकत प्रेमात आहे. तर सर्वांना दूर करण्याची ताकत भ्रमामध्ये आहे. राशीतील शनिमुळे कार्यक्षेत्रात मनासारख्या घटना घडतील. स्थावर बाबतीत शुभ घटना घडतील. आर्थिक स्थितीत समाधानकारक प्रगती साधता येईल. नव्या कामांना गती मिळेल. अपेक्षित संधी लाभतील. अनूकुलता वाढेल. शुभ ता. २७

### मीन:-सुखस्वास्थ लाभेल

जीवनात वेळ सर्वात मोठा गुरू असतो. कारण वेळ जे शिकविते ते दुसरे कोणीच शिकवू शकत नाहीत. राशी स्वामी गुरूचा चंद्राशी होणारा केंद्रयोग कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. नव्या संधी लाभतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. घाईने निर्णय घेऊ नका. प्रगतीच्या घटना घडतील. सुखस्वास्थ लाभेल. चिंता नको. शुभ ता. २६

!! शुभ भवतु !!

पान २ वरून

## हिंदी चित्रपटातील वार्ताहर

मुख्यमंत्र्यांच्या मुलाखतीदरम्यान त्यांना निरुत्तर करणारे प्रश्न विचारून चिडलेल्या मुख्यमंत्र्यांचे एक दिवसाचा मुख्यमंत्री बनण्याचे आव्हान पेलणारा 'नायक' (२००१) चित्रपटातील अनिल कपूर, लक्ष्य (२००४) चित्रपटातील युद्धभूमीवर बेडर वावर करणारी प्रीती झिंटा, पेज ३ चित्रपटातील कोंकणा सेन, 'नो वन किल्ड जेसीका' चित्रपटातील झुंजार पत्रकार राणी मुखर्जी, 'मद्रास कॅफे' या श्रीलंकेतील दहशतवादी चळवळीचा मागोवा घेणाऱ्या चित्रपटातील जीव धोक्यात टाकणारी नर्गिस फाखरी, 'फिर भी दिल है हिंदुस्थानी' चित्रपटातील बोलभांड दूरचित्रवाणी वार्ताहर शाहरुख खान व संयत वार्ताहर जुही चावला, 'नूर' चित्रपटातील आधुनिक वार्ताहर सोनाक्षी सिन्हा, 'रन' (२०१०) या दूरचित्रवाणी वाहिन्यांच्या व्यावसायिक बाबींवर झगझगीत प्रकाश टाकणाऱ्या चित्रपटातील अमिताभ बच्चनने रंगवलेला करारी व तत्त्वनिष्ठ प्रमुख वाहिनी वार्ताहर, 'पीपली लाईव्ह' (२०१०) या चित्रपटातील ब्रेकिंग न्यूज मिळविण्याची धडपड व त्याला तदानुषंगीक दिलेली वळणे, यात नवाजोद्दीन सिद्दिकीने रंगवलेला स्थानिक वार्ताहर राकेश केवळ अप्रतिम..!

'तेरे बिन लादेन' चित्रपटातील लादेनसारख्या दिसणाऱ्या गावंढळ माणसाचा महत्त्वाकांक्षी वार्ताहराने घेतलेला गैरफायदा व साधलेला स्वार्थ, अशा नवनवीन पैलूंना स्पर्शणारा आधुनिक हिंदी चित्रपट एकच बाब वारंवार अधोरेखित करतो 'जोवर आहे मनुष्य, तोवरी फुलेल वार्तांचे इंद्रधनुष्य..!'(लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

पान ४ वरून

## उत्साहाचा अल्हाददायक काळ

कुठल्याही कार्यक्रमामध्ये मध्यंतर असतो ना, तसा असतो हा काळ. सतत वेगावर स्वार होऊन केलेल्या प्रवासात काही काळासाठी मंदावलेला वेग एक प्रकारचा निवांतपणा देऊन जातो. या निवांतपणात खूप काही साधता येते. या दिवसात रंगणाऱ्या, बौद्धिक भूक भागवणाऱ्या कार्यक्रमांचा आस्वाद घेता येतो, सांस्कृतिक कार्यक्रमांची म ेजवानी झोडता येते, वैचारिक कार्यक्रमांना उपस्थित राहून मेंदूची क्षमता वाढवता येते, मुलाबाळांच्या गॅदरिंगचा आनंद अनुभवताना हळूच गतकाळाच्या कुशीत शिरता येते. हा बदल मनस्वी आनंद देणारा आहे. स्वत:साठी जगण्याची प्रेरणा देणारा आहे. आधी उल्लेख केल्याप्रमाणे या ऋतूमध्ये निसर्गात होणारा बदल अनुभवणे हा देखील एक अपूर्व आनंद ठरतो. हे दिवस पानगळीचे. थंडीमध्ये बहुसंख्य वृक्षांची पानगळ सुरू होते. रस्त्यावरून चालताना पानांचा तळाशी विसावलेला तो ढीग चुरचूर वाजतो. काही छोटी छोटी पिवळी पाने हलकेच आपल्यावर वृष्टी करतात. रस्त्याच्या दुतर्फा, टेकड्यांवर, रानात सगळीकडे पानांचा हा निस्तेज पसारा बघायला मिळतो. हलकीशी झुळूक आली तरी एकीकडचा ढीग दुसरीकडे विसावतो. हे दृश्यही सुखावून जाते. दुसरीकडे या दिवसात कुंद, कागडा पानोपानी फुलतात. पाने कमी आणि फुले जास्त अशी त्यांची अवस्था होऊन जाते. अबोलीची मंद छटा लुभावून टाकते. तृणपात्यांवर वेगवेगळे तुरे डोलू लागतात. ते पाहताना डोळे सुखावतात. सृष्टीचे हे पालटलेले रूप एकंदरच वेगळी प्रसन्नता देणारे आहे. नवेपणा, ताजेपणा देणारे आहे. हे दिवस नव्या वर्षाकडे घेऊन जाणारे... एका वर्षाची अखेर करणारे... काही काळातच नव्या वर्षाचे आगमन होईल. मात्र त्याची तयारी याच काळात सुरू होते. हे दिवस नवपरिणित जोडप्यांच्या डोळ्यात स्वप्नांची रांगोळी रेखणारे असतात. प्रतिभावंतांची प्रतिभा जागवणतात आणि कलाकारांच्या सर्जनशीलतेला साद देतात. म्हणूनच ते सुखद, सुमंगल आणि लाघवी आहेत. तेव्हा नेहमीच्या धबडग्यातून बाहेर पडत थोडे विसावू या. या सुंदर काळाचा आनंद लुटू या.



# बागेत, शाळा, महाविद्यालयाच आवारात लावायच्या वनौषधी

**आजीचा बटवा पुन्हा घरोघरी सुरू करण्यासाठी सर्वप्रथम वनौषधींची ओळख जनतेला होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सामान्य रोगावर घरगुती स्वस्त औषधोपचार सांगणेही महत्त्वाचे आहे. आज वनौषधींचे ज्ञान मोठ्या प्रमाणात लुप्तच झाल्यासारखे आहे. त्यामुळे वनौषधी संवर्धन आणि प्रसाराचे कितीही व्यापक स्वरूपात कार्य करण्यात आले तरी ते आज अपुरेच ठरणारे आहे.**

आजीचा बटवा
नारायण कारंजकर
भ्र. ९४२३७५८४०१



गेल्या अर्धशतकात मानवाने स्वार्थासाठी मोठ्या प्रमाणात वनसंपत्तीचा नाश केला. इंधन इमारती उभारणे आदींसाठी झाडे तोडताना वनसंवर्धनाकडेही मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष केले. त्यामुळे पशु-पक्ष्यांचा ऱ्हास तर झालाच, त्याचबरोबर निसर्गाचा समतोलही बिघडला. सर्वत्र उजाड माळराने झाली. पावसाचे प्रमाण घटले, जमिनीची मोठ्या प्रमाणात धूप झाली. त्याचबरोवर प्रदूषणाची समस्याही अधिक भेडसावू लागली. अविचाराने केलेल्या जंगलतोडीचे दुष्परिणाम आज आपणा सर्वांनाच भोगावे लागत आहेत. उशिरा का होईना, पण आता आपणास वृक्षारोपणाचे महत्त्व पटले आहे.

**वनसंवर्धन: राष्ट्रीय कार्य:-**

शासन आज वनसंवर्धनावर लाखो रुपये खर्च करीत आहे. वनसंवर्धनाचे कार्य केवळ सरकारचे नाही, समाजाच्या सर्व स्तरातून या राष्ट्रीय कार्यास सक्रीय सहकार्य मिळणे आवश्यक आहे. जनतेनेच हा वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबविला तरच तो अधिक प्रमाणात फलदायी ठरणार आहे. आज शाळा, महाविद्यालयातून 'वृक्षदिंडी काढून वृक्षारोपण केले जात आहे. विविध सेवाभावी संघटना, स्थानिक स्वराज्य संस्था वृक्षारोपणाचे कार्यक्रम राबवित आहे. शासकीय पातळीवरही हे कार्य अव्याहत चालू आहे. सोलापूर महानगरपालिकेनेही वृक्षारोपण कार्यास अधिक प्राधान्य दिले असून या राष्ट्रीय कार्यास हातभार लावला आहे. विशेष म्हणजे रोटरी, लायन्स, युवक बिरादरी आदि संघटनाबरोबरच सोलापुरात पोलीस खात्यानेही वृक्षारोपणाचे कार्य चालविले आहे. त्यांच्या या कार्याचे स्वागत तर व्हावेच पण, या कार्यास सहकार्यही करणे. हे आपले नैतिक व राष्ट्रीय कर्तव्य आहे.

**वनौषधी लावाव्यात:-**

वनौषधींचा र्हास झाल्याने आयुर्वेदाचीही मोठ्या प्रमाणात उपेक्षा झाली आहे. वनौषधींचे ज्ञान नाही आणि वनौषधी पण नाहीत, त्यामुळे ही प्राचीन भारतीय उपचार पध्दती लोप पावू लागली. जनतेला वनौषधींची माहिती उपलब्ध करून दिली व त्याचबरोबर अशा वनौषधी आपल्या घरच्या, गावाच्या अथवा शहराच्या परिसरात सहजासहजी उपलब्ध झाल्या तर आयुर्वेद प्रसारास मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे. वृक्षारोपणाचे राष्ट्रीय कार्य करीत असताना बागेत व शाळा, महाविद्यालयाचे आवारात लावायच्या वनौषधी शक्यतो आयुर्वेदात महत्त्व पावलेले वृक्ष मोठ्या प्रमाणात लावावेत. केवळ शोभेची झाडेच नकोत.

शासकीय व खाजगी रोपवाटिकात कोणत्या झाडाची रोपे तयार करावीत. त्याबाबत त्या-त्या जिल्ह्यातील जमीन, हवामानाचा विचार करून अशा वनौषधींची लागवड करता येईल. आयुर्वेद महाविद्यालये, वनस्पती शास्त्राचे तज्ञ, वैद्य यांचे त्याबाबत मार्गदर्शन अवश्य मिळेल. वनौषधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्या तर त्यांचा सामान्य रोगावर जनतेला निश्चितच उपयोग करून घेता येईल. ओल्या वनौषधी अधिक गुणकारी असल्याने त्या सहजगत्या मिळाव्यात.

**'वनौषधी उद्याने' व्हावीत :-**

अपुऱ्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करता येत नसले तरी, जी झाडे लावण्यात येतील ती त्या झाडाची उपयुक्तता पाहून प्रामुख्याने लावण्यात यावीत. त्यामुळे वृक्षारोपणाचा उद्देश साध्य होईलच, त्या झाडापासून आर्थिक उत्पन्नही मिळेल आणि त्याचबरोबर आयुर्वेद प्रसाराचे कार्यही होईल. नगरपालिका, महापालिका उद्यानात तसेच शाळा, महाविद्यालयाच्या आवारात कोणती झाडे (वनौषधी) लावावीत ते आता पाहू. अशी झाडे लावल्याने घरोघरी 'आजीबाईचा बटवा' सुरू होण्यास निश्चितच चालना मिळेल. वनौषधी प्रसाराचे कार्य सामान्य माणसाच्या कुवतीबाहेरचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक संस्था, शासनाकडूनच जनतेच्या सहकार्याने ते शक्य आहे. प्रत्येक गावात शक्य झाले नाही तरी निदान नगरपालिका असलेल्या प्रत्येक गावात 'वनौषधी उद्यान' अवश्य उभारावे. हे खर्चाचे काम असले तरी आयुर्वेद प्रसाराचे मोठे कार्य याद्वारे होणार आहे. नियोजनबध्द कार्यक्रम यासाठी राबविले तर ते आज लाख मोलाचे ठरणार आहे.

**नगर पलिका व पालिका बागेत कोणती झाडे लावावीत?**

नगरपालिका व महापालिकेच्या बागेत विविध फुलझाडांबरोबरच विविध झाडे आणि फळझाडे ही लावता येतात. त्यापैकी काहींचा विचार येथे करू.

**१) बाहवा:-** बाहवा ही भारतात सर्वत्र येऊ शकणारी वनौषधी आहे. बाहवा त्वचारोग दूर करणारा व सौम्यरेचक आहे. आमवात, रक्तपित, पोटाचे विकार, ताप यावर तसेच कफविकार, कावीळवर तो प्रभावी गुणकारी आहे. बाहवाचे पंचांग (शेंगा, साल, मूळ पान व फुले) औषधीदृष्ट्या उपयुक्त आहेत. सोलापूर महापालिकेच्या समोर बाहव्याचे अल्हाददायी वृक्ष आहेत.

**२) बकुळ:-** बकुळाचे साल वज्रदंती म्हणून उपयुक्त असून हा वृक्ष भारतात कोठेही येऊ शकतो. बकुळ शीतल, बलवर्धक, दंतहितकारक, रक्तस्तंभक आहे. याची साल, फळ व फळबीज औषधीदृष्ट्या उपयुक्त आहेत. दतविकार, रक्तीआव, रक्तप्रदरावर बकुळ उपयोगी आहेच. पण मुळव्याधीच्या शिक्षा बकुळ बियाचा उपयोग फारच गुणकारी आहे. बकुळ फुलांचे सरबत डांग्या खोकल्यावर उपयोगी आहे.

**३) बेल:** - शिवप्रिय बेलाचे धार्मिक विधीत महत्त्वाचे स्थान आहेच पण आयुर्वेदातही बेलाचे अनेक औषधी उपयोग आहेत. मंदिर परिसराबरोबरच न.पा. च्या बागेत हा वृक्ष अवश्य असावाच.

**४) कडुनिंब:-** कडुनिंब हा मानवाच्या जगातील कल्पवृक्षच होय. हा अत्यंत उपयोगी वृक्ष फक्त भारतातच होतो. कडुनिंब रक्तदोष, पित्त, ज्वर, कफ, व्रण, कुष्ठ, त्वचारोग आदीवर उपयोगी आहे.

कडुनिबाचे पंचांग उपयोगी आहे. कडुनिंबाची पाने एक तोळा, एक तोळा कापूर, एक गुंज हिंग यांची बारीक वाटून गोळी करावी. ती गोळी अर्धा तोळा गुळात मिसळून रोज रात्री घेतल्याने मनुष्य निरोगी राहतो. रस्त्याच्या कडेला शेताच्या बांधाप्रमाणेच न.पा.च्या बागेतही हा कल्पवृक्ष लावावा.

**५) अशोक:-** दक्षिण भारतात होणारा हा वृक्ष ग्राही रक्तस्तंभक आहे. बंगल्याच्या कार्यालयाच्या परिसराची शोभा वाढविणारा असून पांढरी धुपणी, रक्तप्रदर आदि स्त्रियांच्या विकारावर उपयोगी आहे. उंच वाढणारा व डेरेदार असे याचे दोन प्रकार आहेत. हा सावली देणारा वृक्ष आहे.

**६) शिरोध:-** शिरीष हा सर्वत्र होणारा वृक्ष असून फुले, बी, साल व मूळ औषधोदृष्ट्या उपयुक्त आहे. शिरीष त्रिदोषनाशक आहे. रक्तदोष, कुष्ठ, खोकला नाशक आहे. सर्प, मंडूक, आदी सर्व विषावर तसेच धुपणी, व्रण गर्मीचे चट्टे यावर उपयोगी आहे.

**७) चित्रक-** ही वनस्पती सर्वत्र येऊ शकते. मूळ उपयोगी असून दीपक, पाचक, ग्राहक व रसायन हे याचे गुणधर्म आहेत. चित्रकाचे ३-४ फूट उंचीचे झुडूप असते. पांढरा व निळा असे दोन प्रकार आहेत. केस काळे होण्यासाठी चित्रक उपयोगी आहे. विषारी औषध असून अजीर्ण, अपचन, कुष्ठ वातव्याधीवरही चित्रक उपयोगी आहे.

तसेच गोरखचिंच, टाकळ, वायवर्णा, रातांबा, वड, पिंपळ, आदी वनौषधी त्याचप्रमाणे तांबडी कन्हेरी, गुलाब, जास्वंद, आदी फूलझाडे मोठ्या प्रमाणात जागेत लावावीत. आंबा, चिकू, जांभूळ, डाळींब, सीताफळ आदी फळझाडे अवश्य लावावीत.

फळझाडांमुळेच जनतेचा त्रास होण्याची शक्यता असली तरी अशा वनौषधी गावात असणे आवश्यक आहे. न.पा.स त्याद्वारे आर्थिक उत्पन्नही मिळू शकेल.

**शाळा, महाविद्यालयाचे आवारात लावण्याजोग्या वनौषधी:-**

मुला-मुलींना त्यांच्या शालेय जीवनातच वनौषधींची ओळख करून दिली तर ती त्यांना पुढे निश्चितच उपयोगी ठरेल. शाळेसमोर मोठे मैदान असेल तर तेथे वर सांगितलेली झाडे अवश्य लावण्याचा प्रयत्न करावा. मैदानाभोवती अशी झाडे शोभून दिसतील. त्यांची सावलीही मिळेल आणि फावल्या वेळात मुलांना त्या वनौषधींचे ज्ञानही देता येईल.

अपुरी जागा असल्यास १) तुळस २) कोरफड ३) आघाडा ४) ब्राम्ही ५) एरंड ६) रुई (मोदार) ७) लाजाळू ८) गुळवेल ९) गोकर्णी १०) निर्गुडी ११) गवती चहा १२) अडुळसा आदी वनौषधी कुंड्यातून अगर मोकळ्या जागेत लावाव्यात. विविध फुलझाडेही लावावीत, सोलापुरातील सेवासदन प्रशालेत अशी विविध झाडे लावण्यात आलेली आहेत. त्यांची व त्यांच्या औषधी उपयोगाची मुलींना या वयातच अवश्य माहिती करून द्यावी. आजीबाईच्या वटव्यासाठी हे शिक्षण मोलाचे ठरेल.

सोलापूर आयुर्वेद महाविद्यालयाचे आवारात विविध वनौषधी आहेत. अशाच वनौषधी कला, वाणिज्य, शास्त्र अध्यापक आदी महाविद्यालयाचे परिसरात लावाव्यात. निदान आपल्या परिसरात मिळणार्या वनौषधाची, तरी प्रत्येकाने ओळख करून घेणे आवश्यक आहे. महाविद्यालयाचे आवागत न.पा. च्या बागेत लावता येणार्या वनौषधी बरोबरच कुडा (अतिसारवर विशेष उपयोगी) कवठ (पित्त, कावीळ, प्रदररोग, अरुची आदीवर उपयोगी) पारिजातक (ताप, दमा, खोकला, गजकर्णावर उपयोगी आदी वनौषधी लावाव्यात.

करोडो रुपये औषधांच्या निमित्ताने आपण परदेशी पाठवितो. आपल्याकडील वनौषधी परदेशी निर्यात करून, त्यातून बनविलेली महागडी औषधे परत विकत घेतो. वनौषधींची योग्यप्रकारे जनतेला ओळख करून दिली. आणि 'आजीबाईचा बटवा' पुन्हा सुरू करता आला तर त्यातून पुष्कळच पैसा आपणास वाचविता येईल.

पान ५ वरून

## शब्दाच्या जादूत रमलेला जादूगर

जयकरांनी स्वत: १२ तिकिटे काढून पाठवलेल्या एका माणसाने पुलंचा शोध घेवून नाटक उत्तम झाल्याचा अभिप्राय दिला. पण काही क्षणातच तो वेडा असल्याचे समजले. त्यांच्या आनंदावर त्वरित विरजन पडले. तिसऱ्या दिवशी पावसाने हजेरी लावली त्यामुळे पुणेकर बाहेर पडणे शक्य नव्हते. तिनही दिवसाचा हा प्रचंड (?) प्रतिसाद पाहता स्मित हास्य करत पुलंच्या तोंडून उद्गार निघाले, प्रयोग वॉश आऊट झाला! आपल्या अपयशातला आनंद पुलंनी शोधला होता. या नाटकात तुकारामांची अभंगवाणी इंद्रायणीत बुडाल्यावर भाविक ती परत लिहून काढतात. हे प्रखर वास्तव त्यांनी दाखविले होते. अभंगवाणी पाण्यावर तरंगली. ती देवाने बाहेर काढली. असे दाखवले असते तर नाटक तुफान चालले असते.

आज एकविसाव्या शतकात सुद्धा वास्तवावर विश्वास ठेवण्याऐवजी भाकडकथाच लोकांना जास्त मानवतात. भारतीयांची ही मानसिकता वंदन करावी अशीच आहे. नेमका तोच अनुभव पुलंना त्यांच्या पहिल्याच नाटकाच्या पहिल्या प्रयोगापासून आला. तरी त्यांनी त्यांच्या उभ्या आयुष्यात वास्तववाद कधीच सोडला नाही. पुलंचे कथानक असलेला 'दूधभात' या मराठी चित्रपटाच्या सेटवर राम गबाले आणि पुलं असतांना एकदा मुंबईवरुन एक हिंदी चित्रपटनिर्माते पुलंना भेटायला आले. त्यांनी एक प्रश्न पुलंना विचारला, मराठी चित्रपट तयार करण्यासाठी वेळ किती लागतो आणि चित्रपटाचे बजेट काय असते? त्यावर पुलंनी जे कलात्मक पद्धतीने उत्तर दिले. त्यावरुन पुलंना कोट्याधीश का म्हणायचे? याची आपणास कल्पना यावी. पुलं तात्काळ म्हणाले, हिंदी चित्रपटाच्या लंचला जेवढा वेळ लागतो. तेवढ्या वेळात मराठी चित्रपट पूर्ण होतो आणि हिंदी चित्रपटाच्या लंचला जेवढा खर्च होतो, तेवढ्या खर्चात मराठी चित्रपट पूर्ण होतो. यापेक्षा अधिक उत्तम शब्दात, मराठी चित्रपटासाठी लागणारा वेळ आणि खर्च एखाद्या हिंदी बिग बजेट निर्मात्यांना समजावून सांगणे शक्य होते का? याचा विचार सूज्ञ वाचकांनी करावा.

पुलं लंडनला गेल्यावर त्यांच्या आवडीचे पुण्यात मिळणारी विड्याची पाने मिळतं नव्हती. विड्याची पानं खाण्याची त्यांची हौस पूर्ण होत नाही. ती विड्याची पानं त्यांना मिळावी. यासाठी रा. ज. देशमुख यांनी केलेली विशेष व्यवस्था खरचं लक्षात घेण्यासारखी आहे. रा. ज. देशमुखांनी. पुण्यावरून लंडनला पुलंच्या विड्यांचे पानं पाठवण्याची व्यवस्था करणे, त्यांना महत्वाचे वाटले. हे एका लेखकावर प्रकाशकांनी किती प्रेम करावं याचं उत्तम उदाहरण आहे. राजे मनाच्या देशमुखावर पुलंनी 'गणगोत' मध्ये लेख लिहिला. त्यात उल्लेख करतांना ते म्हणतात, देशमुखांच घरं कुठे संपते आणि कंपनी कुठे सुरु होते तेच लक्षात येतं नाही. या शब्दात देशमुखांच्या प्रेमाचा उल्लेख करुन आपल्या गणगोताच्या मनातील जिव्हाळा वाचकांच्या लक्षात त्यांनी आणून दिला. अशा मोठ्या मनाचे आणि विचारांचे गणगोत मिळणे हीच खरी श्रीमंती, हेच त्यांना त्यातून सांगायचे होते. असे गणगोत मिळवणे, ते टिकऊन ठेवण्यासाठी शब्द सामर्थ्यातून त्यांनी केलेली प्रेमाची जादू अजरामर व्हावी. ती अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरावी. हे पुलंनी मराठी माणसांवर केलेले प्रेम आहे. जो त्यांच्या साहित्य भांडारात रमला. तो त्यांच्या गणगोताचाच सदस्य होऊन गेला.

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# 'अनित्य'चा स्वीकार

## सकारात्मकतेचे तत्वज्ञान २४२



कोणताही बदल अंततः तणावांना जन्म देत असतो. ज्ञात असलेल्याचा त्याग आणि अज्ञाताचा स्वीकार हा बदल व्यवस्थापनाचा मार्ग असतो. हा नक्कीच खडतर असतो. पण बदल अपरिहार्यच असल्याने त्यांचा स्वीकार आपली भावी वाटचाल सुकर करतो. तेव्हा बदलाचे भय अथवा बदलांना विरोध असे दृष्टिकोन बाळगण्यापेक्षा बदलाला सामोरे जाणे आणि त्यांचे संभाव्य फायदे हस्तगत करणे अधिक श्रेयस्कर असते. मला हे करायलाच हवे यापेक्षा नवीन येणाऱ्या संधींकडे त्या मला लाभल्या या भिंगातून बघणे म्हणजे आपली ऊर्जा आयुष्याच्या सर्वोत्तम घटकाकडे केंद्रित करण्यासाखे असते.

बदलाचे सकारात्मक अंग नेहेमीच काहीतरी नवं घटित सुचवत असते. या आरंभाचे स्वागत करताना आपली दृष्टी सकारात्मक असावी म्हणजे त्या नव्या नजरेचा आपल्यावर होऊ शकणारा परिणाम आपण अभ्यासू शकतो, भलेही तो बदल आपल्यावर आपल्या इच्छेविरुद्ध लादला गेला असला तरीही! कारण बदलांचे परिणाम आपल्या भविष्यावर होत असतात आणि काही वेळा ते दीर्घकालीन असतात. आयुष्यात सगळं बदलत असतं याच एका वाक्याचा खात्रीलायक स्वीकार करता येतो. हेही दिवस जाती एवढीच ओळखीची वाक्यरचना असते. परिस्थिती क्षणभंगुर असते- वाईटाचे रूपांतर चांगल्यात होऊ शकते आणि आज जे उच्चासनावर असते ते खाली कोसळू शकते याची जाणीव आपल्याला आयुष्यातील चढउतारांचे अस्तित्व मान्य करायला लावते.

बौद्ध तत्वज्ञानानुसार मानवी आयुष्याच्या अस्तित्वाची एक खूण म्हणजे सततचे बदल. पाली भाषेत याला अनित्य (नश्वर, क्षणभंगुर) मानले जाते.

### अनित्य म्हणजे काय?

ज्याला आपण सत्य आणि प्रत्यक्ष मानतो त्याचे खरे स्वरूप अस्थिरता, तात्कालिकता असे असते. आणि हे सत्यच सतत बदलत असताना आयुष्याचे अनेक घटक- नाती, नौकरी, उत्पन्न आपण दृढ, पक्के असे मानण्याची चूक करतो. आणि बदल होताना ही अनिश्चितता कायम तशीच राहील असे मानून चालणे म्हणजे आपल्या वेदना, दुःख, घाव, नाकारले जाणे, निराशा यांना एकप्रकारे इंधन पुरविणे. सत्याचे खरे स्वरूप जेव्हा आपण शोधायला लागतो, आपल्याला सभोवताली सतत बदल होताना आढळतात.

उदा. आपले घर बाह्यतः बळकट, दणकट दिसते पण देखभाल, देखरेख नसली तर प्रत्यक्षात ते नष्टप्राय होण्याची शक्यता अधिक वाढते. मात्र हे अनित्य स्वरूप अस्थायी आणि अंदाज लावण्यास असमर्थता अधोरेखित करते आणि त्यातून चिंता, काळजी यांचा उदभव होतो. मात्र बौद्ध तत्वज्ञान असे मानते की अनित्य अवस्था मानव मुक्तीच्या दिशेने नेते आणि असंख्य शक्यतांकडे अंगुलीनिर्देश करते.

जेव्हा दुःख, वैफल्य आणि इतर परीक्षा घेणाऱ्या प्रसंग येतात तेव्हा अनित्य अवस्थेचे सत्य स्वरूप जाणवते की हेही दिवस जातील. बौद्ध तत्वज्ञानानुसार पंचेंद्रियांमधून आपण जी जगाची अनुभूती घेतो ती स्थिर नसून सारखी बदलत असते. हे विश्वच क्षणभंगुर असते आणि ते परिस्थितीनुसार बदलत असते. निर्माण आणि लय हे निसर्गाचे चक्र आहे, मानवी जीवनात जसे बाल्य, तारुण्य, वार्धक्य हे चक्र आहे, नात्यांमध्ये चढउतार असतात आणि इतिहासही साक्ष असतो संस्कृतीच्या उत्पत्तीच्या आणि लयाचा, तद्वत ही नश्वरता असते.

बौद्ध विचार प्रणाली असं मानते की अनित्य या संकल्पनेबाबत सजगता आढळून येत नाही आणि त्याचे एकमेव कारण म्हणजे विश्वाचे अज्ञान हे न्हाट हान्ह यांनी २०१५ साली मान्य केलं. हे अज्ञान जन्माला येतं आसक्ती मधून, लालसा आणि एखाद्या विचाराला चिकटून राहणे यांमधून त्रास, भोग, व्यथा निर्माण होतात हे २००० सालचे चॉड्रॉन यांचे विधान आहे. निर्वाण ही मनाची मुक्तावस्था असते आणि त्यासाठी मानवी हाव नांवाच्या इंधनाचा पुरवठा बंद करावा लागतो. आत्मज्ञानासाठी निर्वाण आवश्यक असते.

आत्मज्ञानी मन अनित्य आणि अंतिम सत्य या दोन्ही बाजूंना समतोल न्याय देते. त्यांतून सत्याचे पारंपरिक अनुभव येतात, दर्शन घडते. गौतमबुद्धाचे विवेचन कालसापेक्ष आहे आणि अंतिम सत्य म्हणजेच धर्माचे स्रोत हे बौद्धाचे विवेचन होते. ध्यानधारणेतून प्रकट होणाऱ्या विचारसरणीतून मनाची नांगरण होत असते. महायाना बुद्धिस्ट दोन सत्यांच्या संकल्पनेची पाठराखण करतात. आणि हे बुद्धांच्या पाली भाषेतील मूळ प्रवचनांमध्ये समाविष्ट नव्हते. थानासरो भिक्कू यांनी २०२० मध्ये हे मत मांडले.

अर्थात या दोन्ही सत्यांमधला फरक सापेक्ष आणि अंतिम सत्याचे वास्तव मान्य करतो, त्यामध्ये उच्च नीच असा भेदभाव मात्र करीत नाही.

### चार उदात्त सत्ये

दलाई लामांनी १९९८ साली असे विधान केले की धर्मचक्र फिरताना गौतम बुद्धाने आपल्या शिष्यांना चार उदात्त सत्यांचा परिचय करून दिला. अज्ञानाचा चष्मा दूर करून खरं वास्तव दाखविण्याचा प्रयत्न या मार्गाने त्यांनी सुचविला. ध्यानधारणेतून आपण हे अज्ञान बाजूला सारून आपण शहाणीव प्राप्त करू शकतो.

(अ) आयुष्य म्हणजे भोग, व्यथा हेच सत्य आहे

(ब) या भोगांच्या कारणांमागील सत्य शोधणे हेही आयुष्य असते.

(क) दुःखाच्या समाप्तीमागील वैचारिकता

(ड) या समाप्तीसाठी अष्टपदी सुचविण्यात आलेली आहे

या अंतःप्रेरणेतून मनःशांती आणि मानसशास्त्रीय स्वायत्तता लाभते.

### जीवनातील अनित्य अवस्था कशी स्वीकारावी?

वर्तमानाचा संपूर्ण स्वीकार आणि त्याबाबत कृतज्ञता व्यक्त ही पहिली पायरी आहे. पेम चोड्रॉन म्हणतात - जाणारा प्रत्येक क्षण कधीच परतून येत नसतो. गुलज़ार म्हणतात तसे-

**आनेवाला पल जानेवाला हैं**
**हो सके तो इसमें ज़िंदगी बिता दो**
**पल ये जो जानेवाला हैं**

आयुष्य हे क्षणांची परंपरा /साखळी असते, जन्ममृत्यूचे चक्र आहे. या स्वीकारानंतर प्रत्येक क्षण मौल्यवान बनतो. वाढते वय (वार्धक्य) आणि त्यानुसार होणारी झीज, आजारपण, सरतेशेवटी मृत्यू यामुळे होणारे संभाव्य नुकसान किंवा हल्ले हे आयुष्य बनून जाते.

### स्वतःशी करार

आरोग्य संबंधित उपचार घेतल्यानंतर डॉक्टर स्वाभाविकपणे एक प्रश्न विचारतात- आता या उपचारांनी बरे झाल्यावर तुम्ही आपल्या जीवनशैलीत बदल करणार कां? (थोडक्यात उपचारांनी मिळालेले फायदे टिकविण्यासाठी आणि पुन्हा जुन्याच किंवा नव्या काही आरोग्य समस्या उदभवू नयेत म्हणून तुमचा कृती आराखडा काय?). रुग्णाकडून होकारार्थी उत्तर आल्यास- कोणते?

वचन देणे म्हणजे एकप्रकारे बदलांसाठी स्वतःला बद्ध करणे. साधारण असा समज आहे की वचन दिले की ते पाळले जाते. एकेकाळी आपण शपथ घेत असू. आता मात्र प्राण जाए पर वचन ------- वर आपला अधिक भरवसा असतो. आणि बदल होतात. संशोधन म्हणते- बदलांप्रती असलेल्या वचनबद्धतेमुळे यशाची खात्री वाढते. थोडक्यात प्रत्यक्ष बदलाचे भाकीत ही वचनबद्धता ठरविते.

ही ठरविणे स्वतःशी केलेला करार असते. अपेक्षा, नियोजन आणि वर्तन-बदल हे घटक या करारात अंतर्भूत असतात. अल्पकालीन तथा दीर्घकालीन जीवनहेतू ठरविण्यात प्रेरक असलेल्या घटना बदलांकडे अंगुलीनिर्देश करतात. उदा. मी -------- या तारखेपर्यंत हे ------- करणार.

स्वतःच्या नीतीमूल्यांशी फारकत न घेणारी व्यक्ती सकारात्मक प्रवास करीत असते आणि बदलांना सामोरी जात असते. सेलिग्मन यांचे २००५ सालचे आणि फ्रीस यांचे २००६ सालचे संशोधन या विधानाची पुष्टी करीत त्याला मानसिक स्वास्थ्याशी जोडते.

**हा करार आपल्याला ध्येयाप्रती प्रतिबद्धता आणि वाटचाल करायला शिकवतो. आयुष्यात सकारात्मक, परिणामकारक बदल घडवून आणायचे असतील तर खालील उपक्रम मदत करतो-**

------------------------------------ --------------------------

* **तारीख-**
* **नांव -**
* **ध्येय -** ------------------------ ---------------------------

* **साध्य करण्याची तारीख -**
* **हे केल्याने खालील गोष्टी साध्य होतील-** -- ----------------------------------

* **सही-**
* **हे साध्य झाल्यावर मी स्वतःला बक्षीस देईन/ ध्येयपूर्ती या मार्गाने साजरी करीन-**

------------------------------------

येणारा प्रत्येक दिवस आपल्या आयुष्यातील शेवटचा असू शकतो, हे जाणवले की जीवन पूर्णांशाने जगता येते. चोड्रोन म्हणतात-

विलासी, भोगवादी वृत्तीने नाही पण जात्या क्षणाची सजगता बाळगून जगावे.

छोटासा प्रयत्न करून बघावा म्हणजे वर्तमान म्हणजे काय हे समजते-

१) नाकपुडीत येणाऱ्या हवेच्या झुळुकीकडे लक्ष द्या.

२) याबरोबर जाणवणाऱ्या शारीरिक संवेदनेचा अनुभव घ्या.

३) अशीच बाहेर जाणाऱ्या हवेची संवेदना नोंदवा.

### विपश्यना म्हणजे तरी दुसरे काय असते?

या मूलभूत श्वसनक्रियेतच आपल्याला नश्वरतेची चाहूल लागते. हवा आत येते, हवा बाहेर पडते. ती जर रोखून धरायचा प्रयत्न केला तर जीवनांत निश्चित. या छोट्याशा कृतीत क्षणभंगुरता स्वीकारायलाच हवी हा संदेश आहे.

आपले अस्तित्वच अनिश्चित असेल तर चिंता, काळजी कशाची? श्वासाच्या प्रत्येक आवर्तात मनानुभूती असते आणि अनित्य अवस्थेची सूचना असते. समंजस माणसांना मृत्यूची ही सत्यता पटलेली असते म्हणून ते कोठल्याही विवादात पडत नाही. कारण भांडणे, झगडे अर्थहीन असतात. ही जाणीवच मानवी नातेबंधे सुधारते.

### आयुष्याची आखणी-

हाईस आणि स्मिथ यांचे २००५ चे सर्वेक्षण असे सांगते की मानसशास्त्रीय लवचिकता अंगी बाणवली तर स्वीकृती व बांधिलकी या संकल्पनेनुसार आयुष्याची आखणी सुलभ होते.

आयुष्यात वाट्याला येणारे दुःख, व्यथा, भोग अपरिहार्य असतात पण स्वीकृतीची महती मानली, आपण बदलाला विरोध केला नाही आणि टाळाटाळ करण्याची रणनीती टाळली तर बरीच सुखकर वाटचाल शक्य होते. स्वीकृती व बांधिलकी ही उपचारपद्धती स्वतःवर उपाय शोधण्यासाठी वापरता येते- विशेषतः आयुष्यातील अपरिहार्य चढउतारांवर! त्यातून मानवी जीवनात स्थितिस्थापकत्व जन्माला येते.

### अनित्य अवस्थेबद्दलची पाच महत्वाची अवतरणे-

(१) अनित्य म्हणजे ऐहिक विचारांचा त्याग, काहीतरी होण्याच्या ध्यासाचा त्याग, अज्ञानाचा त्याग आणि सरतेशेवटी मी पणाचा त्याग

(२) अनित्य म्हणजे दुःख, असमाधान, स्व-हीन

(३) अनित्य अवस्थेमुळे आपण यातना भोगत नाही.

आपल्याला त्रास होतो अशा गोष्टींच्या मागे धावण्याने ज्या क्षणभंगुर असतात पण आपणास त्या शाश्वत हव्या असतात.

(४) खरंतर नश्वरतेमध्ये समलय सुसंवाद असतो. त्याविरुद्ध लढा थांबविला की आपण शाश्वताशी ऐक्य साधतो.

(५) पारंपरिक जपानी सौंदर्यशास्त्रात वाबी-साबी जीवन नामक संकल्पना आहे.

चेरी ब्लॉसम अनित्य आहे म्हणून सुंदर आहे. हे क्षणभंगुरता आणि अपूर्णतेच्या स्वीकृतीवर केंद्रित असलेले सत्य आहे.

मराठीतील एका गाजलेल्या गीताच्या ओळींनी शेवट करू या-

गोडी अपूर्णतेची लावील वेड जीवा!

विश्वसंचार
मल्हार कृष्ण गोखले

# उडाले ससाणे, एकवटले तुर्क





ते पहा शहर अस्ताना. कझाकस्तान देशाची राजधानी. शहरालगत एका खूपच विस्तीर्ण मैदानावर खूपच गडबड, गोंधळ, धावपळ चालू आहे. मात्र त्या गोंधळाला एक शिस्त आहे. घोडे वेड्यावाकड्या आणि तरीही शिस्तबद्ध उड्या मारत आहेत. कारण त्यांचे लगाम ज्यांच्या हातात आहेत ते घोडेस्वार फारच निष्णात आहेत. घोड्याला वाटेल तसा वळवून ते बकऱ्याची शिकार शत्रूकडून आपल्या ताब्यात घेण्याचा निकराचा प्रयत्न करत आहेत.

अरे, पण हे काय? तो मेलेला बकरा रबराचा बनवलेला वाटतोय. खरा वाटत नाहीये. आणि इकडे ही कसली बेफाम दंगल सुरू आहे? बाप रे! दोन चपळ आणि दांडग्या बायका घोड्यांवरून दौडत एका रिंगणात आल्या आहेत नि घोड्यावर बसल्याबसल्याच त्या चक्क एकमेकींशी कुस्ती खेळत आहेत. एकमेकींना घोड्यावरून खाली पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र हे करताना त्या शहरी बायकांच्या नळावरच्या सुप्रसिद्ध भांडणांप्रमाणे ना एकमेकींच्या झिंजा उपटत आहेत, ना एकमेकींच्या बेचाळीस पिढ्या उद्धरत आहेत.

जीव खाऊन भांडणाऱ्या दोन बायका अगदी गप्प राहून भांडतायत, हे एक आश्चर्यच. अरे, ती पहा बाजूच्या रिंगणात आणखी एक महिला घोड्यावरून दौडत आली. रिंगणात येताक्षणी तिने आपल्या धनुष्याची प्रत्यंचा ताणली आणि दौडत्या घोड्यावरून सरासर तीन बाण सोडून अचूक लक्ष्य टिपले. अरे, त्या पलीकडच्या रिंगणात पहा; मुघल पेंटिंगमध्ये तो पोट सुटलेला अकबर बादशहा दाखवतात ना, उजव्या हातात शिकारी ससाणा वगैरे घेऊन उभा असलेला; तसे बरेच जवान पोऱ्ये तिथे उभे आहेत. काहींच्या हातांवर किंवा खांद्यावर गरुड आहे.

काहींच्या हातांवर ससाणा आहे; तर काहींच्या हातांवर बहिरी ससाणा आहे. गरुड किंवा साधा ससाणा यांच्यापेक्षाही बहिरी ससाणा हा जास्त तरबेज शिकारी पक्षी असतो. हे सगळे पक्षी आणि त्यांचे मालक पोऱ्ये वाट पाहतायत पंचांच्या शिट्टीची. होय, हा सगळा गोंधळ शिस्तीत चाललाय कारण हे मैदान आहे 'वर्ल्ड नोमॅड गेम्स-२०२४' या क्रीडा स्पर्धेचे.

सप्टेंबर २०२४ मध्ये ही स्पर्धा कझाकस्तानची राजधानी अस्ताना येथे पार पडली. यात आपला भारत देशसुद्धा सहभागी झाला होता आणि एक सुवर्ण, पाच कांस्य अशी एकूण सहा पदकांची कमाई आपण इथे केली. आपल्याला याचा पत्ताच नाही. कारण आपल्या प्रसार माध्यमांना दुर्दैवाने क्रिकेटखेरीज दुसरे काही दिसतच नाही. मार्च २०२४ मध्ये आयपीएल क्रिकेट स्पर्धा झाल्या.

जुलै २०२४ मध्ये प्रथम ऑलिम्पिक आणि मग पॅराऑलिम्पिक स्पर्धा पार पाडल्या. त्यामुळे सप्टेंबर २०२४ मधल्या 'वर्ल्ड नोमॅड गेम्स'कडे माध्यमांनी म्हणावे तसे लक्ष दिले नाही. भारताच्या उत्तरेला हिमालयाच्या पलीकडे चीन आहे. चीनच्याही उत्तरेला मंगोलिया हा देश आहे. या मंगोलियापासून पश्चिमेकडे रशिया-कझाकस्तान ते युरोपात युक्रेनपर्यंतच्या प्रदेशाला 'स्टेप्स' असे म्हणतात. या प्रदेशात मैलोन्मैल नुसते गवत किंवा खुरटी झुडपे उगवतात. या प्रदेशात शतकानुशतके अनेक टोळीवाले लोक राहतात. जमीन शेतीयोग्य नसल्यामुळे हे लोक सतत भटकत असतात. त्यांच्या 'भटके'पणातही काही प्रकार आहेत. काही टोळ्या शिकार आणि कंदमुळे यावर जगतात तर काही टोळ्या शेळ्या-मेंढ्यांचे मोठमोठे कळप बाळगतात. काही टोळ्या उत्तम लोहारकाम करतात तर काही टोळ्या कॅस्पियन समुद्रात नि काळ्या समुद्रात मच्छिमारीसुद्धा करतात. या भटक्या टोळीवाल्यांना युरोपात 'नोमॅड' असे म्हटले जाते. साधारणपणे सगळेच भटके लोक उत्तम शिकारी, उत्तम घोडेस्वार, उत्तम तिरंदाज आणि पक्के लढवय्ये असतात. शतकानुशतकांचा त्यांचा जीवनक्रमच असा आहे की, सतत संघर्ष करूनच ते जगत आले आहेत. ज्यांच्या नावाच्या शेवटी 'स्तान' हे उपपद लावले जाते, असे सात देश आजमितीला जगात आहेत. पाकिस्तान, अफगाणिस्तान, ताजिकिस्तान, किरगिजस्तान, उझबेकिस्तान, तुर्कमेनिस्तान आणि कझाकस्तान.

आता गंमत पहा हं, यात हिंदुस्तान नाही. कारण इंग्रजांच्या काळात ते आपल्याला हिंदुस्तान किंवा इंडिया म्हणायचे. स्वातंत्र्यानंतर आपणच हिंदुस्तानऐवजी 'इंडिया दॅट इज भारत' असे नाव घेतले. आता पाकिस्तान आणि फगाणिस्तान हे देश मूळचे भारताचेच प्रदेश आहेत. तिथल्या आजच्या रहिवाशांनी कितीही हुशाऱ्या मारल्या, तरी ते मूळचे हिंदू आहेत, हे सर्वांनाच माहीत आहे. परंतु हे उरलेले जे पाच देश आहेत, तिथले रहिवासी हे तुर्क वंशाचे आहेत. पण मग त्यांच्या देशांच्या नावात 'स्तान' हा 'स्थान' म्हणजे ठिकाण अशा अर्थाचा संस्कृत शब्द कुठून आला? छे, छे! तो संस्कृतचा अपभ्रंश शब्द नव्हेच मुळी.

स्तान हा फारसी भाषेतला शब्द आहे. इंग्रज सरकार भारताला हिंदू 'स्तान' म्हणत असे, हिंदू 'स्थान' नव्हे. कारण त्यांनी भारत हिंदूंकडून नव्हे, तर मुघलांकडून जिंकून घेतला होता आणि मुघली कागदपत्रांत भारताला हिंदू 'स्तान' म्हटले जात असे. नुसत्या एका शब्दावरून इंग्रजांनी फारसी भाषा संस्कृतपेक्षा प्राचीन कशी ठरवली, हा अतिशय सुक्ष्म नॅरेटिव्ह लक्षात आला का? त्याचप्रमाणे, अरे हिंदू राष्ट्रीय नेत्यांनो, जास्त गडबड करू नका; आम्ही भारत तुमच्याकडून नव्हे, तर मुघलांकडून जिंकून घेतला, हा इंग्रजी विकृत दावा लक्षात आला का? असो. तर, या पाच तुर्कवंशीय राष्ट्रांमध्ये कझाकस्तान हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठा, तर ताजिकिस्तान हा सर्वात छोटा देश आहे. या देशांसह शेजारचे चीन, मंगोलिया हे आशियाई देश नि रशिया अझरबैजान, हंगेरी, सायप्रस या युरोपीय देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर तुर्कवंशीय लोक राहतात. त्यांच्यापैकी अनेक जण भटकेसुद्धा आहेत. उदा. रशियातले तार्तार किंवा तातार लोक पहा. काही तार्तार टोळ्या आता एका जागी स्थिरावून शेती किंवा तत्सम स्थिर उद्योगधंदा करत आहेत, तर काही तार्तार टोळ्या आजही भटके जीवन जगत आहेत. या भटक्या टोळीवाल्यांचे स्वतःचे असे काही खास खेळ, क्रीडा प्रकार आहेत. बहुतेक प्रकार त्यांच्या दैनंदिन आयुष्यासारखे लढाईचे, शिकारीचे, आडदांड दांडगाईचे आहेत. किरगिजस्तानचे राष्ट्राध्यक्ष अल्माझबेक आलमबायेव्ह यांना कल्पना सुचली की, केवळ या भटक्यांच्या खेळांची एक जागतिक स्पर्धा भरवावी. २०१४ साली त्यांनी स्वतःच्याच देशात तशी स्पर्धा भरवली. तिला चांगला प्रतिसाद मिळाला. फक्त मध्य आशियाच नव्हे, तर युरोप आणि अमेरिकेतल्या भटक्या जमातींचे खेळाडूही त्या-त्या देशांनी आवर्जून पाठवले. मग २०१६, २०१८ अशा दर दोन वर्षांनी भरवलेल्या स्पर्धा पार पडल्या. २०२० साली कोविडमुळे सगळाच कारभार ठप्प होता. २०२२ साली चौथी क्रीडा स्पर्धा तुर्कस्तान देशाने आपल्याकडे घेतली.

आता २०२४ ला पार पडलेल्या पाचव्या स्पर्धेत भारत प्रथमच सहभागी झाला होता. निदान यावेळी तरी लडाख आणि नागालँड या दोनच प्रांतातल्या भटक्या जमातीच्या खेळाडूंना भारत पाठवू शकला. २०२६ ला ही संख्या नक्कीच वाढलेली दिसेल. आता आपण जरा तुर्कस्तान देशाची गंमत पाहू. तुर्कस्तान या देशाला आपण केमाल पाशाचा देश म्हणून ओळखतो. केमालने तुर्कस्तानला मध्ययुगीन मुसलमानी बोकडदाढ्या, फेज टोप्या, घुर्रट घाण वास मारणारे बुरखे यांच्या जंजाळातून मोकळे करून एकदम अद्ययावत युरोपीय बनवले, हे आपल्याला माहीत असते. पण आपण ज्याला तुर्कस्तान म्हणतो, तो देश स्वतःला 'टर्की' म्हणवतो आणि मध्य आशियातल्या वर उल्लेख केलेल्या पाच तुर्कवंशीय देशांचा उल्लेख 'तुर्कस्तान' या सामान्य शब्दाने करतो. कारण हे मध्य आशियाई देश ही तुर्कवंशीय टोळ्यांची मूळ भूमी होती. इसवी सनाच्या आठव्या-नवव्या शतकापर्यंत हे लोक चीनच्या सम्राटाचे अंकित होते. साधारण नवव्या शतकात अरबांनी त्यांना जिंकले आणि मुसलमान बनवले. मग त्यांच्या अनेक टोळ्यांपैकी सेल्जुक तुर्क नावाची टोळी कॅस्पियन समुद्र ओलांडून अनातोलिया या प्रदेशात आली. तिथल्या ग्रीकांना आणि रोमनांना त्यांनी पिटाळून लावले. पुढे हे सेल्जुक तुर्क अनातोलियातच स्थिरावले. त्यांनी त्यांचे मालक असणाऱ्या अरबांचाही पराभव केला आणि इस्लामचे सर्वोच्च पद जे खलिफा ते बगदादहून अनातोलियाच्या इस्तम्बूलमध्ये खेचून आणले. हे तुर्क साम्राज्य ७०० वर्षे टिकले. त्यामुळे जगाला अनातोलिया हाच मूळ तुर्कस्तान वाटू लागला. याउलट मध्य आशियातले मूळ तुर्कवंशीय देश हळूहळू रशियाच्या झार सम्राटांनी गिळंकृत केले. झारशाही संपल्यावर ते देश आपोआपच सोव्हिएत रशियाचे अंकित देश झाले. १९९१ साली सोव्हिएत साम्राज्य कोसळल्यावर त्यांनी मोकळा श्वास घेतला. २००६ साली कझाकस्तानचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष नूरसुलतान नजरबायेव्ह यांच्या डोक्यात आले की, अरबवंशीय देशांची एक संघटना आहे; मग तुर्कवंशीय देशांची का नसावी? त्यांनी त्यानुसार हालचाली सुरू केल्या आणि २००९ साली 'ऑर्गनायझेशन ऑफ टर्किक स्टेटस उर्फ ओ. टी. एस.' ही संघटना अस्तित्वात आली. तिच्यात मध्य आशियातल्या पाच देशांसह अझरबैजान, हंगेरी, तुर्कस्तान आणि उत्तर सायप्रस एवढे देश आहेत. या देशांचे मुख्य उद्दिष्ट हे आहे की, गेली किमान अडीचशे वर्षे त्यांच्या देशावर रशियाचा (प्रथम झार आणि मग सोव्हिएत) जो प्रचंड प्रभाव आहे, तो दूर करणे आणि रसीप तय्यीप एर्दोगन यांच्या टर्की देशाशी संबंध वाढवणे. 'वर्ल्ड नोमॅड गेम्स' स्पर्धेला हा देखील एक पैलू आहे. पण गंमत अशी आहे की, एखादा किरगीझ व्यापारी नि उझबेक व्यापारी धंद्याच्या वाटाघाटी करायला बसले, तर त्यांना स्व-भाषेखेरीज ना तुर्की येते, ना इंग्लिश येते; रशियन मात्र उत्तम येते. मग ते व्यवहार त्याच भाषेत करणार ना! ते कसेही असले तरी मध्य आशिया टर्कीशी संबंध वाढवतोय, हे निश्चित.

(लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)



पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

# दिल्लीतील प्रदूषणाला शेतकरीच जबाबदार?

**दिल्लीतील प्रदूषणाला पंजाब, हरयाणातील शेतकरीच जबाबदार आहेत, असे सर्वोच्च न्यायालयाच्या टिप्पण्यावरून वाटण्याची शक्यता आहे. 'इस्रो'च्या अहवालाचा आधार त्यासाठी घेतला जात आहे; परंतु प्रदूषणाला केवळ पिकांचे काड जाळणे कारणीभूत नसून शहरवासीयही दोषी आहेत, हे वेग-वेगळ्या अहवालांवरून स्पष्ट होते. त्यामुळे प्रदूषणाचे खापर शेतकऱ्यांच्या माथी फोडल्यास जखम मांडीला आणि मलम शेंडीला असा प्रकार होईल.**



दिल्ली-एनसीआरमध्ये हवेची गुणवत्ता पुन्हा खालावली आहे. दरवर्षी ऑक्टोबरनोव्हेंबरमध्ये पंजाब, हरयाणा आणि उत्तरप्रदेशमधील शेतकऱ्यांनी रान जाळल्यामुळे प्रदूषणात वाढ होते. शेतकऱ्यांकडून पिकांचे काड (पराली) जाळणे हे या प्रदूषणाचे प्रमुख कारण मानले जाते; परंतु हे अर्धसत्य आहे. या प्रदूषणाला शेतकरी कारणीभूत असल्याचा आभास काही लोक निर्माण करीत आहेत. पराली जाळल्याने धूर होतो, प्रदूषण होते हे सत्य असले, तरी एकूण प्रदूषणात त्याचे प्रमाण किती याचा विचार करायला हवा. या प्रदूषणासाठी पराली जाळण्याची प्रक्रिया कारणीभूत मानता येणार नाही.

हल्ली प्रदूषण वाढून हवेची गुणवत्ता खराब करणारी अनेक कारणे सांगितली जातात. सर्वोच्च न्यायालयाने पंजाब आणि हरयाणा सरकारची कानउघाडणी केली. शेतकऱ्यांना पराली जाळण्यापासून रोखण्यात सरकारला आलेल्या अपयशाची, त्याच्या राजकारणाची दखल सर्वोच्च न्यायालयाने अलिकडे घेतली. या मुद्यावरून मुख्य सचिव, मुख्यमंत्र्यांना फटकारले. खरिपाची पिके काढल्यानंतर त्याचे काड जाळून शेतकरी रबीसाठी जमीन तयार करीत असतो.

काड जाळण्यामुळे प्रदूषण वाढते; त्याबरोबरच जमीन भाजून निघते. त्यातील परोपजीवी किडे मरतात. जमिनीची सुपिकता कमी होते. हे सारे खरे असले, तरी या विषयी जागृती करून शेतकऱ्यांना योग्य पर्याय दिला जात नाही. वास्तविक, या काडाचा वापर करून सहवीजनिर्मिती, खते तयार करणे शक्य असताना तीन राज्यातील सरकारांनी काय प्रयत्न केले, हे कधीच पुढे येत नाही. या समस्येवर कोणताही व्यावहारिक उपाय शेतकऱ्यांसमोर मांडला जात नाही. शेतकऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे प्रदूषणाची समस्या वाढते, हे खरे आहे. पण, या प्रकरणी फक्त शेतकऱ्यांनाच का दोषी धरायचे? अनेक शहरांमध्ये कोणत्याही कारणावरून फटाके फोडण्यात येतात. त्यावरून आपण पर्यावरण आणि प्रदूषणासारख्या प्रश्नांवर किती बेफिकीर आहोत, हे दिसून येते.

पूर्वी दिवाळीच्या काळात फटाके फोडले जात. आता कोणतेही कारण फटाके फोडण्यासाठी पुरेसे असते. त्यातून आपण आपला बेफिकीरपणा आणि बेजबाबदार वर्तन दाखवत नाही का? एकूणच, प्रदूषणाच्या बाबतीत दिल्ली-एनसीआर आणि देशातील अनेक शहरांसाठी आगामी काळ चांगला नाही, हे लक्षात येते. हवेतील प्रदूषण वाढल्याने रुग्णांच्या श्वसनाच्या समस्या वाढतात. हवेचे प्रदूषण वाढले की सरकार सक्रिय होते; पण प्रदूषण कमी होताच पुन्हा झोपी जाते. म्हणूनच वायू प्रदूषण कमी करण्याच्या उपाययोजनांवर वर्षभर सक्रियपणे काम केले पाहिजे. कोणतेही तंत्रज्ञान प्रदूषण कमी करण्यास मदत करू शकते; परंतु ते पूर्णपणे नष्ट करू शकत नाही. काही वेळा हवामानातील बदलही या प्रदूषणाला कारणीभूत ठरतात. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणारे हे प्रदूषण कमी करण्यासाठी दरवर्षी धोरणे आखली जातात; मात्र त्यांची योग्य अंमलबजावणी होत नसल्याने त्याचा परिणाम भयावह राहतो.

सरकारी धोरणांची योग्य अंमलबजावणी करून जनतेला पूर्ण जाणीव करून दिली जात नाही, तोपर्यंत वायू प्रदूषण पूर्णपणे नष्ट होऊ शकत नाही. धूळ, धुरापासून तयार होणारे धुके आपल्यासाठी अनेक समस्या निर्माण करतात. इंधन जळल्यानंतर वातावरणातील प्रदूषक किंवा हवेतील वायू सूर्यप्रकाश आणि वातावरणातील उष्णतेशी संयोग पावतात तेव्हा धुके तयार होते. दरवर्षी या मोसमात धुक्यामुळे प्रदूषणाची पातळी वाढते. प्रदूषणाला बांधकामे आणि वाहनांचा धूरही कारणीभूत आहे.

वाहनांच्या धुरात कार्बन मोनॉक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड, हायड्रोकार्बन्स आणि निलंबित कण यासारखे घातक घटक आणि वायू असतात. ते आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक असतात. कार्बन मोनॉक्साईड श्वासाद्वारे शरीरात पोहोचतो, तेव्हा हिमोग्लोबीनशी संयोग होऊन कार्बोक्सी हिमोग्लोबीन नावाचा घटक तयार होतो. याघटकामुळे शरीरात ऑक्सिजनच्या पुरवठ्यात अडथळे येतात. नायट्रोजन मोनो ऑक्साईड आणि नायट्रोजन डाय ऑक्साईडदेखील कमी धोकादायक नाहीत. कार्बन मोनॉक्साईडप्रमाणे नायट्रोजन मोनॉक्साईड हे हिमोग्लोबीनशी संयोग होऊन शरीरातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी करते. त्याचप्रमाणे नायट्रोजन डाय ऑक्साईड फुफ्फुसासाठी अत्यंत घातक ठरते. त्याच्या अतिरेकामुळे दमा आणि ब्राँकायटिससारख्या आजारांचा धोका वाढतो.

वातावरणातील हायड्रोकार्बन्सचे प्रमाण कर्करोगासारख्या आजारांना कारणीभूत आहे. हायड्रोकार्बन वनस्पतींसाठी हानिकारक असतात. आज कुणालाही पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा विचार करायला वेळ नाही, हे वास्तव आहे. प्राचीन काळी पर्यावरणाच्या प्रत्येक घटकाला देवाचा दर्जा देण्यात आला होता. त्यामुळेच पर्यावरणातील प्रत्येक घटकाचा आदर केला जायचा; परंतु नव्या युगात पर्यावरणातील घटकांकडे वस्तू म्हणून पाहिले जाऊ लागले आणि आपण त्यांना केवळ उपभोगाची वस्तू मानू लागलो. पोकळ आदर्शवादाने वायू प्रदूषणाचा प्रश्न सुटू शकतो का, हा खरा प्रश्न आहे. आता हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी गांभीर्याने काम करण्याची वेळ आली आहे.

एक अमेरिकन नागरिक दरवर्षी १४.५ टन कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जित करतो. त्या तुलनेत एक भारतीय वर्षाला सरासरी २.९ टन कार्बन उत्सर्जित करतो. श्रीमंत वर्ग आपली वाहने, एसी, फ्रीज, संगणक इत्यादींमधून जेवढे कार्बन उत्सर्जित करतो, ते ठरावीक कालावधीत पेंढा जाळून उत्सर्जित होणाऱ्या कार्बनच्या प्रमाणात जास्त असते; पण दिल्लीमध्ये वाढत्या धुक्याचा संपूर्ण दोष शेतकऱ्यांवर टाकला जातो. दिल्लीतील वायू प्रदूषणाशी संबंधित प्रकरणावर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले की, वायू प्रदूषणाच्या बाबतीत शेतकऱ्यांना खलनायक बनवले जात आहे, ही मोठी विडंबना आहे; पण आपण शेतकऱ्यांना तुम्ही असे का करत आहात, असे विचारत नाही. दिवाळीचा सण कोट्यवधी घरांमध्ये समृद्धी वाढवतो; पण शेवटी तो धूम धडाक्यात साजरा केल्याने होणाऱ्या प्रदूषणाचा फटका शेतकरी, मजूर आणि इतर छोट्या कामगारांना सहन करावा लागतो. कारण सणासुदीनंतर राजधानीला वेसण घालणाऱ्या घातक धुक्यासाठी या लोकांना जबाबदार धरले जाते. स्वच्छ वातावरणासाठी न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकांमध्येही या असहाय्य वर्गाला लक्ष्य करण्याचा उद्देश आहे.

जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेला भारत हा जगातील आठव्या क्रमांकाचा प्रदूषित देश आहे. जगातील ३० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी २२ शहरे भारतात आहेत. शेतकऱ्यांना आर्थिक मदत देऊन पंजाब, हरयाणाकडून काही प्रमाणात काड जाळण्याच्या समस्येला आळा घालण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा प्रयत्न आहे. दंड आकारणे किंवा किमान आधारभूत किमतीवर पीक खरेदी न करणे ही या समस्येसाठी प्रत्यक्ष किंवा पूर्णपणे जबाबदार नसलेल्या शेतकऱ्याला केली जाणारी शिक्षा आहे. उद्योग आणि वाहनांमधून निघणारा धूरही वातावरण प्रदूषित करतो. पुढील पिकासाठी पेरणीसाठी शेत तयार करावे लागत असल्याने शेतकऱ्यांना भाताचे देठ जाळावे लागत आहेत; पण छंद म्हणून किंवा खोट्या प्रतिष्ठेसाठी मोठ्या प्रमाणात वाहने रस्त्यावर चालवली जातात.

नेत्यांच्या रॅली आणि रोड शोमध्ये हजारो वाहनांचा विनाकारण वापर केला जातो. श्रीमंतांच्या या प्रदूषणाशी संबंधित डेटा एकूण प्रदूषणाच्या आकडेवारीत जोडण्याचे टाळले जाते. शीतपेय आणि बाटलीबंद पाण्याचे उत्पादन करणाऱ्या कंपन्याही वायू प्रदूषणात मोठा हातभार लावतात. प्लॅस्टिकच्या बाटल्यांची प्रभावी विल्हेवाट लावण्यासाठी या कंपन्यांकडे कोणताही उपाय नाही. ड्रेनेजमध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या या बाटल्यांमुळे जलप्रदूषणही वाढते. कचऱ्यासोबत या बाटल्याही जाळल्या जातात, जे वायू प्रदूषणाचे प्रमुख कारण आहे. दिल्लीतील सर्व झोपडपट्टी भागात मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिक जाळले जाते; परंतु वाढत्या प्रदूषणाच्या घटकांमध्ये ते अधोरेखित केले जात नाही. संगणक, टॅब्लेट, मोबाईल आणि इतर उपकरणांमधून उत्सर्जित होणाऱ्या प्रदूषणाचा समावेश असलेल्या ईकचऱ्याकडेही दुर्लक्ष केले जाते. या संदर्भात फक्त शेतकऱ्याला कायद्याचा दंडुका मारला जातो. कोणत्याही मानवी समस्येचे निराकरण परस्पर समन्वयातूनच होऊ शकते. जीवाश्म इंधनातून उत्सर्जित होणाऱ्या वायूंनी जगभरातील वातावरणात उच्च पातळी गाठली आहे. २०२२ मध्ये जागतिक हवामान संघटनेने प्रसिद्ध केलेल्या अहवालामध्ये कार्बन डाय ऑक्साईडची सरासरी पातळी ४१७.९ पीपीएम नोंदविली गेली. पूर्व-औद्योगिक युगाच्या तुलनेत कार्बनचे प्रमाण ५० टक्क्यांनी वाढले आहे.

मिथेन आणि नायट्रस ऑक्साईडचे प्रमाणही वाढले आहे. विकसित देशांनी कार्बन कमी करण्याच्या उपायांच्या अंमलबजावणीशी संबंधित बजेटमध्ये मोठ्या प्रमाणात कपात केली आहे. त्यामुळेही जगात कार्बन उत्सर्जन वाढत आहे. भारतात वायू प्रदूषणामुळे दररोज ५३९ मुलांचा मृत्यू होतो. या संकटाला मुख्यत: विकसित देश कारणीभूत असताना विकसनशील देशांवर दोष टाकला जातो. विकसित देशांनी १९५० ते २०२२ दरम्यान वातावरणात १.५ ट्रिलियन टन कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जित केला. यापैकी ९० टक्के देश युरोप आणि उत्तर अमेरिकेत आहेत. (लेखक पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)

---

# ट्रम्पशाहीमुळे ट्रुडो जात्यात



**कॅनडामध्ये खलिस्तानी अतिरेकी असल्याचे मान्य करताना भारताच्या भूमिकेवर टीका करण्याची दुटप्पी नीती कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी अंगीकारली. आता मात्र ट्रम्पशाही आल्यामुळे ते चिंतित आहेत. कॅनडाची अर्थव्यवस्था संकटात असून प्रचंड बेरोजगारी आणि महागाईमुळे जनतेमध्ये असंतोष आहे. या मुद्यांवरून लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी भारतविरोधी मोहिमेला बळ देणाऱ्या ट्रुडोंची भाषा बदलली आहे.**

परराष्ट्रकारण

प्रा. डॉ. विजयकुमार पोटे

अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प यांच्या विजयाचे जगावर काय परिणाम होतील, याची चर्चा अजून थांबलेली नसतानाच ट्रम्प आणि त्यांच्या निवडणुकीतील पाठीराखे एलन मस्क यांनी केलेल्या वक्तव्याचे आता कॅनडात पडसाद उमटायला लागले आहेत. आतापर्यंत खलिस्तानी अतिरेक्यांना पाठीशी घालणाऱ्या आणि भारताविषयी सातत्याने फुत्कार करणारे कॅनडाच्या पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांची भाषा दोनच दिवसांत बदलली आहे. अर्थात, भाषा बदलली, तरी मूळ स्वभाव थोडाच बदलतो?

एकीकडे कॅनडामध्ये खलिस्तानी अतिरेकी असल्याचे मान्य करायचे आणि त्याच वेळी भारताच्या भूमिकेवर टीका करायची, ही दुटप्पी नीती झाली; परंतु असे असले, तरी ट्रम्प आणि मस्क यांच्या इशाऱ्यामुळे जस्टिन ट्रुडो आणि त्यांचे समर्थक चांगलेच चिंतित आहेत. एक तर कॅनडाची अर्थव्यवस्था संकटात आहे. तिथे बेरोजगारी प्रचंड वाढली आहे.

महागाईने कळस गाठला आहे. अशा परिस्थितीमध्ये देशांतर्गत प्रश्नांवरून लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी जस्टिन ट्रुडो भारतविरोधी मोहिमेला बळ देत होते. ट्रम्प यांच्या विजयामुळे जगभरातील अनेक देश आनंदी असतानाच अनेक देशांमध्ये तणाव स्पष्टपणे दिसून येत आहे.

अमेरिकेच्या शेजारी देश कॅनडामध्येही असाच तणाव दिसून येत आहे. ट्रुडो इतके चिंतित आहेत की, त्यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळाबद्दल चिंता दूर करण्यासाठी कॅनडाअमेरिका संबंधांवर विशेष कॅबिनेट समितीची पुनर्स्थापना केली. कॅनडा लवकरच निवडणुकीला सामोरे जात आहे. या निवडणुकीत जस्टिन ट्रुडो यांचे काही खरे नाही, अशी चर्चा सुरू असतानाच मस्क यांनी आता जस्टिन ट्रुडो यांची अखेर आहे, असे वक्तव्य केल्याने कॅनडातील सत्ताधारी पक्ष आणखी चिंतेत पडला आहे.

कॅनडाने स्थापन केलेल्या विशेष मंत्रिमंडळ समितीचे अध्यक्षपद देशाच्या उपपंतप्रधान क्रिस्टिया फ्रीलँड यांना देण्यात आले आहे. त्या देशाच्या अर्थमंत्रीही आहेत. या समितीमध्ये परराष्ट्र व्यवहार, सार्वजनिक सुरक्षा आणि उद्योगमंत्र्यांसह इतर उच्चपदस्थ अधिकारीही असतील. ट्रम्प यांच्या विजयानंतर कॅबिनेट समिती कॅनडा-अमेरिकेच्या महत्त्वाच्या मुद्यांवर लक्ष केंद्रित करेल, असे ट्रुडो यांच्या कार्यालयाने सांगितले. कॅनडा हा जगातील व्यापारावर सर्वाधिक अवलंबून असलेला देश आहे. कॅनडाची ७५ टक्के निर्यात अमेरिकेमध्ये होते. ट्रम्प हे 'नॉर्थ अमेरिकन फ्री ट्रेड ॲग्रीमेंट' वर फेरविचार करण्याच्या हालचाली आणि ऑटो सेक्टरवर २५ टक्के शुल्क लावण्याचा विचार करत असल्याच्या अहवालाने कॅनडाच्या सरकारच्या पोटात भीतीचा गोळा आला आहे. फ्रीलँड यांनी 'ट्रम्प आणि त्यांच्या टीमसोबत आमचे घट्ट नाते आहे. कॅनडा आणि अमेरिका यांच्यातील संबंध खूप चांगले आहेत' असे सांगितले असले,तरी ट्रम्प यांनी जस्टिन ट्रुडो यांना अनेकदा फटकारले आहे.

कॅनडाने २०२३ मध्ये आपल्या लष्करी बजेटवर जीडीपीच्या १.३३ टक्के खर्च केला आहे. यासंदर्भात दोन टक्के रक्कम खर्च करण्याची गरज आहे. दररोज चार लाख कॅनेडियन जगातील सर्वात लांब आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडतात आणि सुमारे आठ लाख कॅनेडियन अमेरिकेत राहतात. ट्रम्प पुन्हा एकदा सत्तेवर आल्याने अनेक देशांची चिंता वाढली आहे. या यादीमध्ये कॅनडा पहिल्या क्रमांकावर आहे. यापूर्वी खलिस्तान्यांच्या समर्थनार्थ बोलून कंटाळलेल्या ट्रुडो यांचा खलिस्तानी आणि इतर शीख वेगळे आहेत, यावर विश्वास बसत नव्हता.

अलिकडे मात्र त्यांनी खुल्या व्यासपीठावर हे सत्य स्वीकारले. खलिस्तान समर्थक फुटीरतावादी संपूर्ण शीख समुदायाचे प्रतिनिधित्व करत नाहीत, असे ते अलिकडेच म्हणाले. जस्टिन ट्रुडो यांनी ट्रम्प यांचे अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीतील विजयाबद्दल अभिनंदन केले आणि कॅनडा आणि अमेरिका यांच्यातील मैत्रीबद्दल बोलले; परंतु त्यांच्या मनातील चिंता कायम आहे. या दोन्ही नेत्यांमधील संबंध अनेकदा तणावाचे राहिले आहेत. दोघेही सार्वजनिक ठिकाणी एकमेकांवर चिखलफेक करत आहेत. दोन महिन्यांपूर्वी, सप्टेंबरमध्ये, ट्रम्प यांनी एका पुस्तकातून जस्टिन ट्रुडो यांच्याबद्दल अफवा पसरवल्या होत्या. त्यात ते क्युबाचे दिवंगत हुकूमशहा फिडेल कॅस्ट्रो यांचे पुत्र आहेत, असे म्हटले होते. जस्टिन ट्रुडो आणि उपपंतप्रधान क्रिस्टिया फ्रीलँड यांच्या विधानांवरून कॅनडाच्या गोंधळाचा सहज अंदाज लावला जाऊ शकतो. ट्रम्प व्हाईट हाऊसमध्ये परतल्याने त्यावर कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही, अशी ग्वाही या दोघांनी दिली असली, तरी त्यात आत्मविश्वासाचा आणि खात्रीचा अभाव होता.

अमेरिकेला खूश ठेवणे ही कॅनडाची मोठी मजबुरी आहे. आपल्या एकूण निर्यातीच्या अंदाजे ७५ टक्के निर्यात अमेरिकेला करत असल्याने त्या देशाशी पंगा घेण्याचा प्रयत्न केला, तर कॅनडा पूर्णपणे उद्ध्वस्त होऊ शकतो. दुसरीकडे खलिस्तानी दहशतवादी निज्जर याच्या हत्येमुळे भारत आणि कॅनडाचे संबंध बिघडले होते. निज्जर यांच्या हत्येला भारत जबाबदार असल्याचा आरोप कॅनडाने सुरुवातीपासूनच केला आहे; मात्र, भारत सरकारने सुरुवातीपासूनच कॅनडाचा हा आरोप निराधार असल्याचे म्हटले.

ट्रम्प यांच्या धोरणाचा कॅनडाचे हवामान, व्यापार, सुरक्षा आणि इमिग्रेशन यावर परिणाम होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त करण्यात आली. उपपंतप्रधान फ्रीलँड यांनी पत्रकारांना सांगितले की, बरेच कॅनेडियन काळजीत आहेत आणि मी कॅनडियन लोकांना खात्रीने सांगू इच्छिते की, कॅनडा पूर्णपणे ठीक होईल.

अमेरिकेसोबत आमचे मजबूत संबंध आहेत. ट्रम्प आणि त्यांच्या टीमसोबत आमचे घट्ट नाते आहे. अर्थात त्यांच्या या वक्तव्यावर अमेरिकन अब्जाधीश मस्क यांनी लगेच पाणी फेरले. जस्टिन ट्रुडो या वेळी निवडणुकीत हरणार आहेत, असे ते म्हणाले. मस्क आणि ट्रम्प यांची भूमिका लक्षात घेता ट्रुडो यांच्यासाठी येणारे दिवस चांगले नाहीत, असा त्याचा अर्थ आहे. त्याच वेळी भारत आणि कॅनडामधील वाद इतका वाढला आहे की, दोन्ही बाजूंच्या राजनैतिक अधिकाऱ्यांना माघारी बोलावण्यात आले आहे. मस्क यांच्यासारख्या बलाढ्य व्यक्तीने ट्रुडोबद्दल असे काही बोलणे, हा एक धक्का आहे.

आधी ट्विटर विकत घेऊन आणि आता ट्रम्प यांना अमेरिकेचे अध्यक्ष बनवून त्यांनी स्वत:ला सिद्ध केले आहे. यामुळेच मस्क यांनी जस्टिन ट्रुडो यांच्या पराभवाची भविष्यवाणी केल्यापासून भारतात 'सोशल मीडिया'वर ट्रुडो यांची खिल्ली उडवली जात आहे; मात्र मस्क काय म्हणाले हा विनोदाचा विषय नाही. जगभरातील सरकारे बनवण्यात आणि पाडण्यात शक्तिशाली देशांची खूप महत्त्वाची भूमिका असते. बांगलादेशमधील हसिना सरकार कसे पाडले गेले हे आपण पाहिले. यामागे अमेरिकेचा हात होता हे सर्वांना माहीत आहे. कॅनडाची परिस्थिती बांगलादेशसारखी नसली, तरी फारशी चांगलीही नाही. ट्रुडो यांनी निज्जर हत्याकांडातून भारताशी वैर पत्करले. त्यामुळे भारताने कॅनडातील वाणिज्य दूतावास बंद केले. जगभरातील बलाढ्य देश अनेक देशांमध्ये आपल्या फायद्यासाठी सरकारे बनवत आहेत. पाकिस्तान, बांगलादेशसारखे छोटे आणि कमकुवत देश असोत किंवा कॅनडासारखे मोठे देश; मोठ्या देशांच्या प्रभावामुळेच येथे प्रमुख निवडून आले आहेत. कॅनडामध्ये जस्टिन ट्रुडो यांच्यावर आपले सरकार स्थापन करण्यासाठी चीनची मदत घेतल्याचा आरोप आहे. जस्टिन यांच्या विजयात चीनची भूमिका असल्याचा आरोप कॅनडातील विरोधक सातत्याने करीत आहेत. एवढेच नाही, तर ट्रुडो यांना कॅनडात निवडून आणण्यामागे चीनच्या भूमिकेबाबत एक चौकशी समितीही स्थापन करण्यात आली आहे.

अध्यक्ष झाल्यानंतर ट्रम्प यांना शेजारी चीन समर्थित कोणतीही व्यक्ती इतकी मजबूत रहावी, असे अमेरिकेला वाटणार नाही. मस्क आणि ट्रम्प ज्या प्रकारे कॅनडाचे पंतप्रधान ट्रुडो यांचा तिरस्कार करतात, त्यावरून दिसते की ट्रुडो पुन्हा सत्तेवर येणार नाहीत. ट्रम्प यांनी ट्रुडो यांना डाव्या विचारसरणीचे वेडे म्हणत त्यांची खिल्ली उडवली. कॅनडातील लोक आधीच ट्रुडो यांना कंटाळले आहेत. ते पंतप्रधानांवर खूप नाराज आहेत, याचे मुख्य कारण तेथील ढासळलेली अर्थव्यवस्था आहे. कोरोना महामारीनंतर जगाची परिस्थिती बिकट झाली आहे. युक्रेनवर रशियाच्या हल्ल्यामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंव्यतिरिक्त विजेचे दर गगनाला भिडले आहेत.

घरांच्या किमती वाढल्या असून परवडणारे घर मिळणे कठीण झाले आहे. नोकऱ्यांसाठी रांगा वाढत आहेत. आठवडाभर चाललेल्या रेल्वे कर्मचाऱ्यांच्या संपाने कॅनडा ठप्प झाला होता. कॅनडा ही जगातील नवव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. २०२२ मध्ये तिचा जीडीपी २.२ ट्रिलियन होता. कॅनडाचा विकास दर ०.५ टक्क्यांच्या खाली आहे. यावरून या देशाची सध्याची स्थिती काय असेल हे समजू शकते. मतदारांची नाराजी पाहून किमान चार मंत्र्यांनी पुढची निवडणूक लढवणार नसल्याचे म्हटले आहे. काही खासदारांनाही पराभवाच्या भीतीने निवडणूक लढवायची नाही. यावरून ट्रुडो यांची स्थिती लक्षात यायला हरकत नाही.